

परशुरामाच्या सावलीतील
कोवळी उन्हे !

# माणूस

शनिवार
२७ नोव्हेंबर १९७१
पन्नास पैसे



# माणूस

दशकपूर्तिनिमित्त

# रुपया पुस्तक योजना

## माणूसची ५ वर्षांची
## १०० रुपये वर्गणी भरल्यास

| | | |
|---|---|---|
| राजा शिवछत्रपती* | ब. मो. पुरंदरे | ३०–०० |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३–०० |
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | ३–०० |
| कधी आणि कोठेतरी | डॉ. सुधीर फडके | १२–०० |
| रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| शतपावली | रवींद्र पिंगे | १२–०० |
| पूर्णिया | अनिल अवचट | ६–०० |
| श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५–०० |

## ही दहा दर्जेदार पुस्तके
## प्रत्येकी एक रुपयास मिळतील

योजनेच्या सविस्तर तपशीलासाठी कव्हर पान तीन पहा.

* पाचवी प्रतिष्ठान आवृत्ती

| माणूस | शनिवार | २७ नोव्हेंबर १९७१ | पन्नास पैसे |
| --- | --- | --- | --- |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | सव्वीस | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार...**

◻ आपला १३ नोव्हेंबर १९७१ चा माणूस अंक वाचण्यात आला. त्यात आपण दिलेला जयप्रकाश यांचा, सदाशिव बागाईतकर यांनी भाषांतरित केलेला 'बंगला देश आणि भारताचे भवितव्य' हा लेख वाचण्यात आला. लेख सुंदर आहे पण आपल्या आधी तो 'लोकसत्ता'मध्ये प्रसिद्ध झाला. (दि. ११।११।७१). या वर्तमानपत्रात जो लेख पूर्वीच छापण्यात आला तोच लेख पुन्हा छापावा हे आपल्याकडून अपेक्षित नव्हते. अद्याप 'माणूस'च्या Standard बद्दल लोकांना विश्वास आहे. तो कायम ठेवावा हीच सदिच्छा.

**१४ नोव्हेंबर, १९७१** **विजयकुमार व. ह. भवार**, परभणी

[ भाषांतरकाराने 'माणूस' व्यतिरिक्त हा लेख कुठेही न पाठविण्याचे आश्वासन दिले होते. हे आश्वासन पाळले गेले नाही. आपली तक्रार रास्त आहे – सं. ]

◻ माणूसचा दिवाळी अंक हाती आला. त्यातील डॉ. सुधीर फडके यांचे आत्मचरित्र वाचले. आजपर्यंत अनेक चरित्रे आणि आत्मचरित्रे वाचली. पण या चरित्राला विलक्षण धार आहे. सामान्यात असामान्यत्व आहे. त्याच्या अकृत्रिमतेत सहज वाहणाऱ्या खडकातल्या पाझराची गोडी आहे. केवढे अनुभवसमृद्ध जीवन ! हे जीवन कादंबरीपेक्षाही कादंबरीमय आहे. आपण त्यांना लिहायला उद्युक्त केलेत. त्यांनी मोकळेपणी लिहिले याला जितके श्रेय आहे, तितकेच आपण त्यांना 'लिहिते' केले याला आहे. यामुळे लेखक व प्रकाशक उभयतांचे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

मन:पूर्वक अभिनंदन.

तोंडाला मधाचे बोट लावून ठेवलेत. आता पुस्तकाची आतुरतेने वाट पाहणे आले. असेच संकल्प आपल्या हातून पार पडोत ही शुभेच्छा.

२७ ऑक्टोबर, १९७१ सुलोचना लिमये, पुणे

## भारताला सिझोफ्रेनिया झाला आहे काय? : एक नोंद

या प्रश्नाला प्रा. (सौ. नलिनी पंडित यांचे उत्तर एकंदरीत 'नाही', असेच आहे. मात्र तपशीलात शिरल्यानंतर त्या, भारतीय मध्यम वर्गीयांवर, ह्या दुलगपणाचा ठपका ठेवायला मागेपुढे पाहात नाहीत. भारतीय नेतृत्व 'मध्यमवर्गीय आहे, असं त्यांना म्हणावयाचे आहे काय? मूलभूत प्रश्न उद्‌भवतो तो हा, की भारतीय 'मध्यम वर्ग' म्हणजे नक्की कुठला वर्ग? तोच क्रांतिकारी वर्ग असू शकतो काय? असतो काय?

त्याच न्यायाने पुढे गेले म्हणजे भारतीय विचारवंतांचा वर्गही मध्यम वर्गच की काय! कारण, त्या भारतीय विचारवंतांवरही घसरल्या आहेत. कै. नेहरूंनी स्वातंत्र्याच्या अमूर्त कल्पनेत नवीन मूल्यांचा आशय ओतण्याचा प्रयत्न केला तथापी व्यवहारपंडितांनी त्यांना अपयश दिले वगैरे वगैरे; ह्याचा इत्यर्थ असा होतो का की, भारतीय विचारवंतांप्रमाणे भारतीय नेतृत्व (स्वातंत्र्यपूर्व-कालीन व स्वातंत्र्योत्तरही) देखील मध्यमवर्गीयच आहे?

त्यांच्या एका मुद्द्याशी मात्र सहमत व्हायला हरकत दिसत नाही. भारतीय सांस्कृतिक परंपराच एका अर्थाने परस्परविरोधी द्वंद्वावर आधारलेली आहे, हा तो मुद्दा होय. पण त्याचा क्रम व या विचाराची सरणी लावताना, त्याचा विस्तार करताना मात्र, बाईंनी, भारतीय मध्यम वर्ग म्हणजे नक्की कुठला वर्ग हे आधी सांगावयाला हवे होते. नाहीपेक्षा त्याचा अर्थ एवढाच, की भारतीय विचारवंत जनतेपासून विचाराने फार दूर गेले. Ivory Towers वरून त्यांचा विचार होत राहिला. ध्येयवादी नेतृत्वाला व्यवहारपंडितांचा गराडा पडला व त्याला दगा बसला. व्यवहाराच्या कठोर व निबर भूमीवर त्यांचे 'पुष्पक' विमान आदळले. ध्येयवादी नेतृत्व स्वप्न रंजनात्मक ठरले. हा युटोपियाच (Utopia) नव्हे काय? 'ज्याचे हितसंबंध समाजवादाशी सुसंगत आहेत अशा दलित वर्गातून स्वतंत्रबाण्याचे नवे ध्येयवादी नेतृत्व उदयाला आले पाहिजे असा बाईंचा आशावाद! भोवतालची परिस्थिती तसं सांगत नाही. शंभरात एक Element तसा आढळेलही! पण तोपर्यंत जनतेचं काय? या संदर्भात म्हणता येईल की, रावसाहेब पटवर्धनांचा भ्रमनिरास झाला. भूमिपूत्र स्वामिजींचा खून झाला. श्री. बाबा आमटे सांगत फिरताहेत, पण या दुर्दैवी देशाला त्याचं काय होय? संकल्प आणि सिद्धी, घोषणा आणि कृती

यांच्यातील ही तफावत जोवर कायम आहे तोवर भारताला सिझोफ्रेनिया झाला काय अगर न झाला काय, आम्ही सारेच (Morbid Psychology) मध्ये आहोत, एवढे मात्र नक्की! पर्वत-पायथ्याच्या दरीत असलेली जनता, पर्वत-माथ्यावर असलेले विचारवंत नेते, शिखरावर चाललेला गोंगाट व जनतेच्या मनात उद्भूत झालेला गोंधळ, हे सारेच दृश्य अपूर्व, लोकविलक्षण! कधी कधी वाटते, हे सारंच मानवी स्वभावधर्माच्या विरुद्ध तर नाही ना? कुणी सांगावं? अन्यथा या प्रश्नाचे उत्तर सापडत नाही.

याउलट डॉ. स. द. पुणेकर यांचे विचार परखड वाटले. परखड असले तरी ग्राह्य! Hypocring व Emotional instability अतिशय वेगाने वाढते आहे. नैतिक मूल्यांचा व शैक्षणिक मूल्यांचा ऱ्हास दिसतो आहे ना? का, तेही खोटे? प्रश्न असा आहे की, लोकशाही मूल्याला सत्याचं वावडे आहे काय? डॉ. राम मनोहर केवळ विक्षिप्त? काय, म्हणायचंय् काय?

डॉ. सु. दं. नाच पोषक तथापी अतिशय मुद्देसूद व काटेकोर रीतीने स. ह. देशपांडे 'विचारांची अस्पष्टता', हा मुद्दा मोठा रेखीवपणे मांडतात. विशेषतः 'लोक-जीवनाच्या निरीक्षणांतून विचारांचे पोषण आणि अधिक रेखीव विचारांतून लोक-जीवनाचे नियमन अशी परस्पर संजीवक प्रक्रिया येथे झाली नाही', हा त्यांचा विचार मननीय वाटला. 'सयन्वय् या अनिष्ट प्रवृत्तीचे थोतांड त्यांनी उल्लेखिले हे बरे झाले!'

दुर्गाबाई भागवत एकदा असं नि एकदा तसं म्हणण्यात सारा वेळ गमावताना दिसतात. ध्येय-आचार यांतील अंतर वाढते आहे असं एकदा कबूल, तर लगेच पलटी खाऊन, देशाला प्रगतीचा मार्ग पुऱ्या झेपेने आक्रमित करता येणार नाही हे एक उघड सत्य! हे ढोबळ सत्य स्वीकारून बाई, स्वार्थाचा विचार शक्यतो दूर लोटण्याचा उपदेश करतात. अरे, त्यामुळेच तर–ती (लोकशाही) तुमच्यावर रुसली आहे. भारताची एकंदर परिस्थिती समाधानाची आहे, आबादानीची आहे असं बाईंना वाटतं. लोकशाहीची येथल्या सामान्य नागरिकाला जाण आहे, पण ती तथाकथित जाण, कार्याच्या दृष्टीने सफल होण्याइतकी आज समर्थ नाही एवढंच! (पलटी खाऊन)

अन् लगेच, 'राजकीय सत्तेचं लोकशाही समर्थ करण्याच्या दृष्टीनं नियमन झाल्याखेरीज या देशातील विचारांना आणि कृतींना स्थैर्य लाभणे कठीण आहे,' हा बाईंचा विचार! विचार स्तुत्य आहे, बाई सुजाण आहेत, सूज्ञ आहेत, एवढेच नव्हे तर विद्वानही आहेत. पण तरीही त्यांना या देशाचे भवितव्य दारुण वाटत नाही, त्याला काय इलाज? आहे. त्यालाही इलाज आहे व तो विद्यार्थ्यांच्या हाती सुरक्षित आहे.

बाई म्हणतात, राजसत्ता प्रमत्त असली तरी दुर्बळ आहे. त्यामुळे त्यात शासना-

पेक्षा स्मगलर्सचा प्रभाव शासनव्यवस्थेवर व दैनंदिन जीवनावर अधिक पडतो आहे. बाई खरं बोलल्या ! आता 'स्वार्थासाठी दुबळेपणाने परिस्थितीशी तडजोड मुळीच करायची नाही, ' हे ठरले ! आणखी कशाकशाचं विकेंद्रिकरण करायचंय् बाई ? सांगून टाका एकदा !

याउलट अशोक शहाणे आपलेच ओठ आपलेच दात करकरा चावीत आहेत. सगळंच हुकलं. सगळंच मुसळ केरात ! छे: छे: ताळमेळच नाही. शहाणेसाहेब, तुमचं अगदी सगळं बरोब्बर आहे हो ! पण लक्षात कोण घेतो ? इतक्या कडवटपणाने, इतक्या उपहासानं, इतक्या सिनिक् पद्धतीने, काही वेळ Review घेऊन, काही वेळ मर्ढेकरी काव्यात्म शैलीने आपण ऐतिहासिक सत्याकडे जाण्याचा प्रयत्न केलात. उपक्रम सुंदर, शैली सुंदर, विचार सुंदर ! पण शहाणेसाहेब, परिसंवादातील विचारांची मांडणी विशिष्ट वैचारिक पातळीवर, विवेचक अशी (चिकित्सक नसली तरी) असावयास नको काय ? योगायोगाने सगळ्याच् मोठ्यांचे चुकले हे विवेचक रीतीने तुम्ही अन्य कुठल्या तरी एका स्वतंत्र लेखात मांडावे अशी तुम्हाला या पुंगवाची विनंती.

डॉ. श्री. वा. काळे यांना धन्यवाद ! बॅ. साहेबांबद्दल मात्र पामराला काय बोलता येईल ? ह्या निमित्ताने त्यांनी जन-संघाचे केलेलं शवच्छेदन अनौचित्यपूर्ण म्हणता येईल. ते अप्रस्तुत नसले तरी अनुचित खास होय. संपूर्णपणे गैरलागू !

तथापी ह्या निमित्ताने चर्चिल, ब्रिटिश पार्लमेंटमध्ये ॲटली–योजनेला विरोध करताना काय म्हणाला होता, ते 'माणूस'मधूनच वाचलेले मला ह्यावेळी उगीचच आठवत आहे. व त्यासोबत मानवेंद्रनाथ रॉय एक विधान काय करत असत तेही उगीचच आठवतंय् ! मानवेंद्र म्हणायचे, 'आर्थिक क्रांती करावयाची असेल तर सांसदीय लोकशाहीची मूल्ये झुगारून द्यावी लागतील; व सांसदीय लोकशाहीची मूल्ये जपावयाची असतील तर क्रांतीची आशा करू नये. एका टोटेलेटेरीयन, अवस्थेतून आपल्याला जावंच लागेल–तेच एक त्याचं माध्यम आहे. खरं खोटं कार्ल मार्क्स जाणे !

बाकी, इतका चांगला विषय परिसंवादाला दिल्याबद्दल माणूसच्या संपादकांचे आभार. एक सूचना, यात प्रा. नरहर कुरुंदकरांचा समावेश असता तर मराठवाड्याला काय वाटतं ते समजलं असतं.

**२९ ऑक्टोबर, १९७१** **मा. ग. देशपांडे, कळमनुरी**

भारताचे सन्माननीय नाकरीकत्व
स्वीकारण्यास उत्सुक असलेला आणि
बांगला देश स्वातंत्र्य-लढ्यांत उतरू
इच्छिणारा हा फरेंच क्रांतिवीर
आहे तरी कोण ?

इंद्रसेन डोंगरे

# आन्द्रे मालरो

सप्टेंबर १८ ते २० ला दिल्ली येथे सर्वोदय नेते श्री. जयप्रकाश नारायण यांनी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय 'बांगला परिषदे'त मुक्तिवाहिनीच्या मदतीसाठी आंतरराष्ट्रीय सशस्त्र पथके उभारण्याची सूचना पुढे आली. या परिषदेस हजरही नसलेल्या परंतु तीस आपल्या परखड संदेशाद्वारे चैतन्य प्राप्त करून देणाऱ्या आन्द्रे मालरो या फ्रेंच क्रांतिवीराने बांगला मुक्तीसाठी स्वयंसेवक होऊन लष्करी नेतृत्व करावयाची आपली तयारी दाखवून जगात सर्वत्र खळबळ उडवून दिली. 'ही आंतरराष्ट्रीय परिषद जरी बुद्धिवाद्यांच्या सद्सत्विवेक बुद्धीला आव्हान करणारी ठरली, तरी तिकडे पूर्वबंगालमध्ये मात्र पाक रणगाडे धुमाकूळ घालताना दिसतील!' या शब्दांत परिषदेस आपला संदेश पाठवून आन्द्रे मालरोने आपला अनुभवीपणाच प्रकट केला. शिवाय, पूर्व बंगालच्या लढ्यांत लष्करी नेतृत्व करताना आपण ते 'अर्थात बंगाली हुकमाखालीच करू' असे स्पष्टपणे सांगण्यात या क्रांतिवीराची विनयशीलताही दिसून घेते!

हा आन्द्रे मालरो आहे तरी कोण? त्याने ही भूमिका स्वीकारण्यामागची पार्श्वभूमि काय? कोणत्या अधिकाराने तो या गोष्टी बोलतो? वगैरे प्रश्न साहजिकच आपल्या मनात उभे राहातात. या दृष्टीने या फ्रेंच क्रांतिवीराविषयी जी काही मनोरंजक माहिती उपलब्ध झाली ती विचारात घेता बांगला मुक्तीसाठी त्याने केलेली घोषणा केवळ पोकळ गर्जना नव्हे; याची खात्री पटते.

## खरा संघर्षवादी

नोव्हेंबर १९७१ मध्ये सत्तरी गाठत असलेल्या मालरोमध्ये अगदी क्वचितच आढळणाऱ्या गुणांचा अद्वितीय संगम झालेला दिसून येईल. हा पॅरीसच्या एका धनाढ्य बँकवाल्याचा मुलगा! पण त्याने स्वतःसाठी जो जीवनमार्ग स्वीकारला आहे तो पाहाता, त्याला खरा संघर्षशील माणूसच हीच संज्ञा सार्थ ठरेल. एखाद्या घटनेचा दुरून, तटस्थपणे केवळ विचारच करणाऱ्यांपैकी तो विचारवंत नाही! तर प्रत्यक्ष संघर्षात उडी घेणारा क्रांतिवीर आहे. एक बुद्धिजीवि कर्मवीर आहे.

समस्त पाश्चात्य जगातील विचारवंतांपैकी कदाचित् आन्द्रे मालरो हा एकच विचारवंत आहे की ज्याने बांगला देशविषयक आपली प्रतिक्रिया इतक्या निःसंदिग्ध शब्दात व्यक्त केली आहे. त्याला बांगला देशाची किती तळमळ वाटत होती, याची कल्पना त्याने अलीकडेच अमेरीकेतील आपल्या भाषणात केलेल्या स्पष्ट वक्तव्यावरून येईल. त्याने सांगितले की,...' अमेरिकेस आशियातील एका मोठ्या आणि बिकट प्रश्नाला तोंड द्यावे लागणार आहे. तो म्हणजे बंगालचा प्रश्न! साडेसात-आठ कोटी लोकवस्तीच्या पूर्वबंगालची समस्या वाह्यात्कारी व्हिएटनाम सारखी वाटली तरी बंगाली लोक हे काही माओवादी लोक नाहीत. ते राष्ट्रवादी आहेत. हे लक्षात घेऊनच अमेरिकेला आपला कठोरपणाचा दृष्टीकोन निश्चित बदलावा लागेल!'...

सन १९२४ मध्ये मालरोच्या संघर्षशील स्वभावाचा प्रथम प्रत्यय आला. कंबोडियांतील खेमरीन स्थापत्याचा अभ्यास करायला म्हणून गेलेला हा फ्रेंच विचारवंत 'यंग अमान लीग' या राष्ट्रवादी संघटनेकडे आकृष्ट झाला! ही संघटना इंडोनेशियाला फ्रान्सच्या गुलामगिरीच्या शृंखलापासून मुक्त करण्यासाठी झटत होती! यानंतर मालरोनने चीनच्या यादवी युद्धात, त्यावेळी एकाच बाजूने, एकाच आघाडीवर लढत असलेल्या कम्युनिस्ट व कोमिन्टांगबरोबर सक्रीय भाग घेतला. अशा रीतीने त्याच्या क्रांतीकारी जीवनाची आशियातच नांदी झाली.

पुढे १९३० ते ४० च्या दरम्यान युरोपात मालरोने स्पॅनिश यादवी युद्धांत 'लॉयलीस्ट' सेनेच्या बाजूने लढयांत उडी घेतली. लॉयलीस्ट सेनेला आपले हवाई दल संघटीत करावयास मदत करून त्याने स्वतः मशीनगनधारी हवाई सैनिक म्हणून सक्रीय भाग घेतला.

यानंतर दुसरे जागतीक महायुद्ध भडकले. आणि आन्द्रे मालरो फ्रेंच रणगाडा पथकात भरती झाला. त्यात त्याला युद्धकैदी म्हणून पकडण्यात आले. पण त्याने लवकरच स्वतःची सुटका करून घेतली. एवढे झाली तरी मालरो गप्प थोडाच बसणार आहे? तो कर्नल बर्गर या नावाने फ्रेंच गनीमांचे नेतृत्व स्वीकारून नाझी आक्रमणास भूमिगत रीतीने कडवा विरोध करीत राहीला. त्याला जर्मनांनी पुनः कैद केले! येवढयात युद्धच संपुष्टात आल्यामुळे मालरोला जीवदान लाभले!!

अल्सेशियन आघाडीवर लढत असताना मालरोची जनरल डी गॉलशी प्रथम गाठ पडली. त्यावेळी डी गॉलवर त्याची चांगलीच छाप बसली. याचा परिणाम म्हणजे त्यानंतरची दोघांतील अभेद्य मैत्री होय! तिचे फलस्वरूप म्हणून सन १९४५ ते ५८ मध्ये फ्रान्सचे माहीती मंत्री म्हणून मालरोला दोनदा डी गॉल मंत्रीमंडळावर घेण्यात आले. जरी १९६० च्या पुढे मालरो औपचारिकपणे डी गॉलच्या मंत्रीमंडळात युवक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक बाबींचे खाते पाहात होता. तरी प्रत्यक्षात मात्र जनरल डी गॉलचा एक जिवलग दोस्त म्हणूनच सर्वांना परिचित होता!

## तत्त्वज्ञ–कादंबरीकार–प्राच्यभाषातज्ज्ञ

मालरोने 'प्राच्य भाषा विद्यालया'त संस्कृत आणि चिनी भाषांचा अभ्यास केला आहे. एवढेच नव्हे तर तो एक श्रेष्ठ राजकीय मुत्सद्दी, तत्त्वज्ञानी व कादंबरीकारही आहे. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या मालरोने आपल्या क्रांति-लढ्यातील विविध अनुभवांवर आधारलेल्या अनेक कादंबऱ्याही लिहिल्या असून त्या जगन्मान्य ठरल्या आहेत! चीनच्या पार्श्वभूमीवरील त्याच्या 'मॅन्स फेट' या कादंबरीला १९३३ मध्ये गॉनकोर्ट नामक पारितोषिक मिळाले. त्यानंतर त्याची मरणाच्या दाढेत असताही मानवी बंधुत्वाची महती विशद करून सांगणारी 'मॅन्स होप' ही कादंबरी प्रकाशित झाली. 'दी व्हॉयसेस ऑफ सायलेन्स' हे त्याचे त्यानंतरचे कला-सौंदर्यावरील एक अमूल्य पुस्तक होय. केवळ कलेच्याच माध्यमाद्वारे मनुष्य चिरंतन कालपर्यंत जिवंत राहू शकेल असे त्याने त्यात प्रतिपादन केले आहे.

मालरोने आपल्या एका कादंबरीत लिहिले आहे की, 'मानवाचं भवितव्य जसं उज्ज्वल तसंच दयनीयही आहे!' बांगला देशच्या लढ्यातील वीरांचीदेखील तशीच परिस्थिती नाही काय? स्वातंत्र्यप्राप्तीच्या उदात्त ध्येयाने झपाटलेल्या या वीरांना मृत्युदेखील तुच्छ वाटत आहे. परंतु त्यांच्या या एकाकी लढ्यात अपमानाची पुसट भावनाही सामील आहे. एक प्रकारचे कारुण्य सामावलेले आहे.

बांगला देश नेत्यांनी मालरोच्या वयोमानानुसार त्याचा लष्करी मार्गदर्शनासाठी योग्य तो उपयोग करून घेतल्यास तो अत्यंत लाभदायक ठरेल. तथापि, जरी तो प्रत्यक्ष आघाडीवर गेला नाही तरी बांगला देश मुक्ती संग्रामाला त्याच्या नावाचा स्पर्श झाल्यास, त्यावर जादूची फुंकर घातल्यासारखे होईल. एक मोठ्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचा प्रवक्ता आणि लेखक म्हणून त्याच्याकडून बांगला देशची अमोल सेवा होऊ शकेल. त्याने अखिल जगाचा, विशेषत: पाश्चिमात्य देशांचा काढलेला भाषण दौरा शेकडो शिष्टमंडळांपेक्षा अधिक परिणामकारक आहे, यात काय शंका?

□ □ □

प्रतिनिधी

# मुंबई वार्ता

## दुर्गापूरचे आव्हान

भारत सरकारच्या अखत्यारीतील दुर्गापूर पोलाद कारखाना इतर सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्यांप्रमाणेच डोकेदुखी ठरला. संप, टाळेबंदी, उत्पादन घट, कामगार युनियन्समधील आपापसातील मतभेद वगैरेंमुळे प्रगतीच्या उलट दिशेनेच कारखान्याची वाटचाल चालू होती. गेल्या महिन्यात एक छोटी बातमी वर्तमानपत्रांतून आली, की सुप्रसिद्ध कामगार नेते श्री. बगाराम तुळपुळे यांची त्या कारखान्याच्या सरसंचालकपदी नियुक्ती झाली.

कामगार चळवळ किंवा कामगार नेतृत्व म्हणजे सरकारच्या दृष्टीने तशी कटकटच, पण तरीही श्री. तुळपुळे यांची नेमणूक करण्यात आली याचे कारण त्यांचे कर्तृत्व हेच होय. त्यांना बंगालीही उत्तम बोलता येते. त्याचाही त्यांना भरपूर फायदा दुर्गापूरला होईल.

श्री. तुळपुळे यांचे आतापर्यंतचे जीवन ही आव्हाने स्वीकारण्यातच गेले आहे. पहिल्या वर्गातील इंजीनियरिंगची पदवी हस्तगत केल्यावर त्यांनी किर्लोस्कर समूहातील नोकरी सोडली. '४२ चे वारे देशात वाहातच होते. ते आव्हान स्वीकारून त्यांनी लढ्यात उडी टाकली. त्यानंतर तुरुंगवास आलाच. सुटका होताच साम्यवाद्यांची कामगार क्षेत्रातील मिरासदारी दूर करण्याचे आव्हान स्वीकारून ते मजूर चळवळीत आले ते आजतागायत तेथेच स्थिरावले.

अठ्ठेचाळीस साली श्री. जयप्रकाश नारायण यांच्या बोलावण्यावरून ते जमशेटपूरला गेले. तेथे तब्बल ३ वर्षे ठाण मांडून, इंटक व सत्तेवर असलेल्या कॉंग्रेस पक्षाशी झगडून त्यांनी ' टाटा आयर्न अँड स्टील 'च्या कामगारांची संघटना बांधली.

१९५६ ते ६३ या काळात ते अखिल भारतीय मजदूर सभेचे सरचिटणीस होते. याच काळात त्यांची कार्यक्षमता, आंदोलने चालविण्याची हातोटी, व्यवस्थापनाची कसोटी कसाला लागली होती व ती त्यांनी यशस्वीपणे पार पाडली.

देशातील कामगार आंदोलने पक्ष व राजकारण यांच्या मगरमिठीत सापडू न देता, त्यांचे केंद्र न बनता ते कामगारांच्या प्रश्नांशीच मुख्यतः केंद्रित व्हावे ही

त यांची भूमिका व याच भूमिकेतून त्यांनी इतरांनाही एकत्र ठेवण्याचे काम केले.

गेली २५ वर्षे ते कामगार चळवळीत आहेत. संघर्षावर व स्वतःच्या पायावर कामगार चळवळ उभी राहिली पाहिजे यावर ते भर देतात. त्यांची नवी नियुक्ती हेही त्यांनी नेहमीप्रमाणेच स्वीकारलेले आव्हान आहे.

परवा त्यांचा ' मिल मजदूर सभे 'तर्फे भव्य सत्कार करण्यात आला. अध्यक्ष-स्थानी त्यांचेच एक जेष्ठ सहकारी व समाजवादी नेते श्री. श्री. म. जोशी होते.

' एस्. एम्. ' यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला, काही कानमंत्र दिला आणि श्री. तुळपुळे यांच्या नेमणुकीवर टीका करणाऱ्यांना उत्तरेही दिली.–

– खऱ्या लोकशाही समाजवादाचे रचनात्मक कार्य करण्याची संधी दूर न पळता स्वीकारली पाहिजे, कारण देशाच्या औद्योगिक उभारणीसाठी पूर्ण निष्ठेने रचनात्मक कार्यावर विशेष भर देणे हे ऐतिहासिक कर्तव्य ठरते असे ते म्हणाले. प्रगत देशातही पक्षांचे नेते औद्योगिक क्षेत्रात व अन्य क्षेत्रात मोठ्या जबाबदाऱ्या उचलतात. त्या त्यांना टाळता येत नाहीत. कोणी याला भले लाच म्हणोत पण मी त्यांच्याशी सहमत नाही, असेही एस्. एम्. जोशी म्हणाले.

सूचक कानमंत्र देताना एस्. एम्. म्हणाले की श्री. तुळपुळे हे त्यांच्या नव्या

---

## दुर्गापूर कारखाना एक आव्हान

जून १९७० ते जुलै १९७१ या काळात ४३१८ वेळा कामगारांनी कारखान्यात काम नाकारण्याचे प्रकार घडले; १०४८ वेळा काम मंदीच्या तक्रारी झाल्या, बेकायदेशीर काम थांबविण्याचे ४२१ प्रकार याच वेळी झाले. ३८ घेरावो, ५ हरताळ, २ सार्वत्रिक संप, ११६ वेळा निदर्शने व एकदा टाळेबंदी एवढे रामायण या तेरा महिन्यांत घडले, तर ३ वेळा सुपरवायझर्सवर हल्ले करण्यात आले.

कारखान्याची यंत्रसामुग्री वाढवून उत्पादनक्षमता १० लक्ष टनांवरून १६ लक्ष टनांपर्यंत वाढविण्यात आली पण गेल्या पाच वर्षांत ती १० लक्ष टनांपर्यंत गेलीच नाही. १९७०–७१ चे उत्पादन ६ लक्ष ३० हजार टन झाले.

कारखान्यात सुमारे २५ हजार कामगार असून १४०० तंत्रज्ञ अधिकारी आहेत.

मार्क्सवादी, साम्यवादी व इंटक (काँग्रेस) यांच्या तेथे युनियन्स आहेत व त्यांच्यात नेहमीच आपापसात झगडे चालू असतात.

मार्क्सवादी यूनियनची सभासद संख्या अधिक आहे, पण युनियन्समधील तंटे–बखेडे हेही दुर्गापूरच्या यशापयशाचे एक महत्त्वाचे कारण आहे. कदाचित या रायव्हलरीचाच त्रास त्यांना अधिक होण्याची शक्यता आहे.

कार्यात यशस्वी होतीलच पण त्यांच्या ध्येयानुसार त्यांना काम करणे शक्य झाले नाही, कामगारांना संतोष देता आला नाही तर डॉ. आंबेडकरांनी ज्याप्रमाणे 'हिंदु कोड बिला 'बाबत मतभेद होताच मंत्रिपदाचा राजीनामा दिला तसाच त्यांच्या–श्री. तुळपुळे यांच्या–सूचना बोर्डाने मान्य केल्या नाहीत तर तेही आपल्या पदाचा राजीनामा देतील.

सत्काराला उत्तर देताना श्री. बगाराम तुळपुळे म्हणाले, की सरकारने ही जबाबदारी स्वीकारता का अशी विचारणा करताच त्यांना तो जटिल प्रश्न वाटला. त्या कर्तव्याचे पालन होऊ शकेल का ? असेही मनात येऊ लागले.

राष्ट्रीयकृत व सार्वजनिक उद्योगांची जी टिंगल केली जाते त्याचीही खंत त्यांच्या मनात होती. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी विचार केला. कामगारांची विकृत प्रतिमा तयार केली जाते. समाज व कामगार यांच्यात अंतर निर्माण केले जाते. या सर्वांचा विचार करूनच हे पद स्वीकारण्याचा निर्णय घेतला. हे असे केले नसते तर 'मजुरांची खरी प्रतिमा दाखविण्याची संधी मी गमावली असती तर तो अपराध झाला असता.'

'दुर्गापूर पोलाद कारखान्याची व्यवस्था, आपला देश व उद्योग यांच्या हिताच्या दृष्टीने तेथील युनियन्स अधिक जबाबदारी उचलण्यास तयार असतील तर त्याचे मी स्वागत करीन. अधिक विश्वासाने त्यांच्यावर जबाबदारी टाकायला मी तयार आहे. त्यांच्या सर्व कार्यास मी सहकार्य देईन. यात त्यांच्या युनियनचा झेंडा कोणता आहे हे मी पहणार नाही. कामगार चळवळीच्या तत्त्वाशी इमानाने वागेन ! मात्र त्यांनीही तशीच साथ द्यावी अशी माझी अपेक्षा आहे. माझा कामगार चळवळीशी २५ वर्षांचा जिव्हाळयाचा संबंध आहे. कामगारांच्या दु:खी, कष्टी जीवनाचा अनुभव हीच माझी पुंजी ' असे ते शेवटी म्हणाले. ◻

## प्रकाश बंदी

जगावेगळं काहीतरी करून दाखविण्यात आपण भारतीय इतरांच्या फारच पुढे आहोत. आता हेच पहा ना ! मुंबईतील प्रकाशबंदीची पहिली तालिम चक्क कोजागिरी पोर्णिमेच्या दिवशी घेतली गेली. 'ती ' प्रकाशबंदी पाहून आकाशीचा चांदोबाही हसला असेल. मुंबईतील नागरी संरक्षण दलाने त्यानिमित्त काही प्रात्यक्षिके केली. ही प्रात्यक्षिके कशी होतात हे पहाण्यासाठी ठराविक ठिकाणी लोक जमाही झाले. पण ' ऑल क्लिअर 'चा भोंगा होऊन गेला तरीही या दलाचे स्वयंसेवक व अग्निशामक वाहने त्या जागेकडे गेलीच नव्हती. त्यानंतरही ती गेली नाहीतच म्हणा. अशा ' या तालमीने ' तोंडभरून स्तुती करणारे रकानेच्या

रकाने भरून वर्णन वर्तमानपत्रांनी केले जसे काही आम्ही लाहोरच जिंकले !

नंतर कोणाच्या तरी लक्षात आलं, की तालीम कोजागिरीच्या दिवशी घेण्यात चूक झाली होती. म्हणून दुसऱ्या वेळी तालीम घेतली गेली. मुंबईतील कामगार, मध्यमवर्गीय ही मंडळी जागरूक देशभक्त वगैरे वगैरे असतात– त्यामुळे त्यांच्या बालेकिल्ल्यात अंधाराचे साम्राज्य पसरले होते. मात्र त्याच वेळी धनिकांच्या विभागात अनेक ठिकाणी त्यांच्या माड्या हवेल्यातून सप्तदीप उजळले होते. त्यावेळी प्रकाशबंदीच्या वेळी न येणाऱ्या शत्रूच्या विमानांची त्यांना बिलकूल भिती नव्हती. कदाचित प्रत्यक्ष शत्रूचा हल्ला झाला तरी तो गिरगाव परळ वगैरे गरिबांच्या, मध्यमवर्गियांच्या वस्तीवर होईल आपल्यावर नाही असे लेखी आश्वासन त्यांना पाकिस्तानी अध्यक्षांकडून मिळाले असावे. पण त्यांच्या दुर्दैवाने हा उजळलेला भाग त्यावेळी काळोखातून उडत जाणाऱ्या आमच्या कनिष्ठ गृहमंत्री महाशयांनी, पोलिस आयुक्तांनी व नागरी संरक्षणदल-प्रमुखांनी पाहिला. उपाय योजनेची तंबीही दिली गेली म्हणूनच मग तिसरी प्रकाशबंदी भरपूर प्रमाणात म्हणजे जवळ जवळ १०० टक्के यशस्वीपणे पार पडली. पण तरीही काही विभागांनी काम चुकारपणा केलाच म्हणून मग फक्त काही ठराविक भागापुरती मर्यादित असलेली प्रकाशबंदीची तालीम गेल्या मंगळवारी घेण्यात आली. यावेळी मात्र नेपियनसी रोड, मलबार हिल आदी श्रीमंत वस्तीच्या विभागाने थोडी अधिक देशभक्ती दाखविली. कसेही असो पण हळूहळू मुंबई आणि मुंबईकर यांना प्रकाशबंदीचा सराव होत आहे हे एक चांगले लक्षण आहे. ◻

## युद्ध, साठेबाजी, काळाबाजार....

जगभर पोलिसांचे काम करायला अमेरिकेला कोणी सांगितलेले आहे असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. कारण व्हिएतनाम, कंबोडिया, दक्षिण अमेरिका, युरोप वगैरे सर्वत्र अमेरिकेचे सैन्य पसरलेले आहे. या म्हारक्या सांगितल्या आहेत कोणी ?

पण त्याचं असं आहे, की अमेरिकन सैन्य जगभर गेलं नाही किंवा त्या देशाने इतर देशांना शस्त्रास्त्रांची मदत दिली नाही किंवा भारतासारख्या त्यांच्या गोटात नसलेल्या राष्ट्राला जर त्यांनी शस्त्रे विकत दिली नाहीत तर मग अमेरिकन्सनी जगायचं कसं ? युद्धावरच अनेक अमेरिकन कारखाने चालू आहेत. लक्षावधी अमेरिकन्सना दोन वेळचं अन्न मिळतं व इतर चैनी करता येतात. सांगायचा मुद्दा एवढाच, की युद्ध म्हटले की अनेकांना ती पर्वणी वाटते.

युद्ध काळात आवश्यक अशा वस्तूंची साठेबाजी करून काळाबाजार करून अनेक-

जण गब्बर होतात. देश व लोक गेले खड्ड्यात आपल्याला पैसा मिळाल्याशी कारण ही अनेक व्यापाऱ्यांची प्रवृत्ती आहे. दोन तीन दिवसांपूर्वी मी मुंबईतील एका पोहण्याच्या तलावात पोहत होतो. आपापल्या इंटरेस्ट प्रमाणे ग्रुप्स करून पोहता पोहता गप्पा मारणे हा तेथील सदस्यांचा आवडता छंद.

पोहत असतांनाच गुजरातीतून काही संवाद कानावर पडला. एक मध्यमवयीन गृहस्थ एका वयस्कर माणसाला खांडचा साठा करायला सुरुवात केली काय म्हणून विचारीत होता. तेवढ्यात दुसरा एक आवाज म्हणाला साखरेचा भाव साडेतीन रुपये पर्यंत जायला हरकत नाही. गहू, तांदूळ व इतरही गरजेच्या वस्तूंची कशी काय साठेबाजी करता येईल यावर तेथे अगदी नवीन चर्चा चालू होती. आपण सर्व नडलेले असतो. पोटासाठी जे मिळेल, ज्या भावात मिळेल ते खरेदी करीत असतो. भाव वाढले तरी सांगायचे कोणाला! मायबाप सरकार भाववाढ रोखण्याचे 'इलाज' योजितच असतं. काळाबाजारवाल्यांना जाहीरपणे तंबीही देत असतं. यात आपणही खूष होतो व व्यापारवर्गही खूष. सत्ताधारी पक्षालाही निवडणूक निधी जमविण्याच्या वेळी त्यांचीच गरज लागत असते की!

त्यांचे 'ते' संभाषण ऐकून मला एक गोष्ट आठवली–

'६७ सालच्या सप्टेंबरात अरब-इस्रायलचे पाच दिवस युद्ध झाले. अरब-जगताला त्या युद्धाने जबरदस्त दाहरा दिला. नासेर तर पार कोलमडला. तो व त्याचे अरब दोस्त शेवटी बर्फाचे शिराळशेटच ठरले. सुएझ कालवा बंद पडला. इजिप्तचे त्यामुळे प्रचंड नुकसान होऊ लागले. पण त्यामुळे जगभरच्या जहाज कंपन्यांना अमाप नफा कमविण्याची संधी मिळाली कारण त्यांची जहाजे त्यानंतर 'केप-ऑफ-गुड-होप'ला वळसा घालून दूरच्या मार्गाने जाणार होती. त्यामुळे दर वाढले याबद्दल युरोप-अमेरिकेतील जहाज कंपन्यांच्या मालकांना इतका आनंद झाला की ती मंडळी नासेरच्या जीवंतपणीच, (स्वर्गीय अण्णादुराईप्रमाणे) वाटेल तेवढ्या टनांचा त्याचा सोन्याचा पुतळा उभारायला तयार होती. भारतीय व्यापारी याह्याखानाला असा बहुमान देण्याचा विचार करतील काय? पण हे सारं याह्यावर किंवा श्रीमती गांधींवरच अवलंबून आहे. नाही का?

कसं का असेना पण आमचा व्यापारी वर्ग युद्धाची आतुरतेनं वाट पाहात आहे एवढं निश्चितच!

□ □ □

# मुंबई – खास आपली

**अरुण साधू**

बाहेरून आलेल्या पाहुण्यांना दाखवायला मुंबईत तशा पुष्कळ जागा आहेत. आपण त्या रसाळपणे दाखवतो सुद्धा. पण आपल्या अशा काही खास जागा मुंबईत आहेत, ज्या फक्त आपल्यासाठीच आहेत. म्हणजे आहेत सार्वजनिक. पण प्रेक्षणीय जागा म्हणून कुणाला माहीत नाहीत. तशा त्या प्रेक्षणीय नव्हतेच. पण त्या खास आपल्या मुंबईत काही एक वेगळाच फील आणून देणाऱ्या इतरांना आवडतीलच असं नाही कुणी हसतीलही. म्हणून खाजगी.

बोरीबंदरची इमारत कोणकोणत्या अंगानी अधिक खुलून आणि वेगळी दिसते. महानगरपालिकेची इमारत वॉडबी रोडच्या बाजूने दुरून एखाद्या तरल, स्वप्नील यक्षनगरीतल्यासारखी कशी नाजूक आणि सुंदर भासते हे आपण पाहुण्याला सांगतो जनरल पोस्ट ऑफिसची इमारत उडत उडत दाखवतो. मग कोर्टातले रस्ते, डबल डेकर्स, हुतात्मा चौक, ओव्हरसीज कॉम्युनिकेशन टॉवर, म्युझियमचा घुमट, गेटवे-कडे जाताना उजव्या हाताला होणारे नरीमन पॉईंटवरील उंच इमारतींच्या जंगलाचे पुसटते दर्शन, मग खुद्द गेटवे, समुद्र, जहाजे, शिवाजीचा पुतळा, ताजमहाल मग नरीमन पॉईंट, मरीन ड्राईव्ह, गिरगाव चौपाटी आणि शेवटी मलबार हिल. संध्याकाळ नंतर दिसणारी मरीन ड्राईव्हची चकाकती माळ की झाले. पाहुणा अगदी खूष. मुंबई दर्शन संपलं. मग राणीचा बाग, मत्स्यालय, जुहू वगैरे आपलं उगाचच. मुंबई संपलेली असते.

यातही कुणी खास हौशी पाहुणा असला की गेटवेवरून दरडोई पन्नास पैसे मोजून होडीतून चक्कर टाकून आणणे, समून डॉक्सचे बंदर दाखविणे, मरीन ड्राईव्हवरून पायी चालत जाणे. मलबार हिलवरच्या फिरोजशाह मेहता गार्डनच्या मागच्या बाजूने उंचच उंच इमारतींच्या घनदाट जंगलातून वाट काढीत नेपीयनसी रोडवर उतरणे, समुद्रावरील सूर्यास्त दाखविणे, डबल डेकर बसच्या वरच्या मजल्यावरून दोन-तीन लांब लांबचे रूटस् फिरवून आणणे वगैरे बारकावे करावे लागतात. पण मजा येते. आपण हौसेने करतो.

फक्त आपल्या जागा कुणाला दाखवत नाही. अगदी मुंबईच्या लोकांना देखील

सांगत नाही. तशी मुंबईच्या लोकांना मुंबईची माहिती एकूण कमीच असते. ऑफिस ते घर आणि काही प्रेक्षणीय जागा. गिरगाव-ताडदेव वगैरे भागात राहणाऱ्या लोकांना तर लोकलसची माहितीच नसते. अमुक एक स्टेशन वेस्टर्नवर आहे की सेंट्रलवर हेही त्यांना माहीत नसते. कित्येक लोक तर आयुष्यभर दादरच्या उत्तरेला गेलेले नसतात. शीवला राहतो असे तुम्ही सांगितल्यास होनोलुलूत राहात असल्यासारखा चेहरा करतील.

तर अशा लोकांना सांगण्यात काहीच अर्थ नसतो. या जागा आपल्या आपणच पहायच्या असतात. इतरांना सांगण्यात स्वारस्य नसते. कुणाला न पटल्या तर काय करता ?

आपली पहिली जागा चिंचपोकळी रेल्वे स्टेशनचा प्लॅटफॉर्म. करीरोड किंवा वेस्टर्न वरील एल्फिन्स्टन रोडदेखील चालते. वेळ एक तर सकाळी आठ ते पावणे दहा किंवा संध्याकाळी साडेपाच ते साडेआठ. यापैकी कुठल्याही एका प्लॅटफॉर्मवर उभे रहावे. अगदी नजर ठरत नाही. या स्टेशनांकडे ढुंकूनही न बघता फास्ट लोकल गाड्या अशा काही दिमाखाने इथून सुसाटत जातात की नुसते बघत राहावे. दोन्ही बाजूंनी भन्नाट वेगाने या गाड्या प्रचंड गडगडाट करीत काही सेकंदात आपल्या अंगावर धूळ फेकून नाहीशा होतात. त्या धक्क्यातून आपण जागे होतो न होतो तोच आणखी गाड्या वावटळीसारखा कर्कश आवाज करीत आपल्याला खिजवीत क्षणार्धात निघून जातात आणि स्टेशन सुन्न करून टाकतात. ही भयाण शांतता फारशी टिकत नाही. दुसऱ्याच क्षणी आणखी एक रोरावती सर येऊन आपला पार पालापाचोळा करून अदृश्य होते. एखादीच दरिद्री गाडी क्षयरोग्याप्रमाणे खोल रोगट सुस्कारे टाकीत प्लॅटफॉर्मशी काही क्षण टेकून विसावा घेते, अंगावरचे काही ओझे खाली उतरते; थोडे आणखी उरावर घेते आणि पुन्हा उसासे टाकीत जबरदस्तीने ढकलल्यासारखी पुढे धिक्के धिक्के निघून जाते. बाजूने निघून जाणाऱ्या फास्ट गाडीचा दिमाख कुठे आणि हिचा अवतार काय !

ही स्टेशने आधीच बिचारी गरीब. त्यांना प्लॅटफॉर्म एकच. काही ठिकाणी तर घड्याळेही नाहीत. त्यामुळे अनेकांना इथे उतरणेच कमीपणाचे वाटते. त्यात पुन्हा त्या फास्ट गाड्या क्षणाक्षणाला अशी मानहानी करतात. फास्ट गाड्यांचे पॅसेंजर देखील महागर्विष्ठ. जणू आपण अपोलो यानातून चंद्रावर निघालो असल्यासारखे त्यांचे उन्मत्त चेहरे. आधीचा उर्मट मोटरमन तर दयेनेसुद्धा या स्टेशनकडे बघत नाही. काही शिष्ठ पॅसेंजर्स विशेषत: दांड्याला लोंबकळून प्रवास करणारे उत्साही-शिट्या मारमारून किंवा हातवारे करून आपल्याला खिजवून टाकतात. जणू आपल्याला आता अनंतकालपर्यंत याच प्लॅटफॉर्मवर धूळ खात उभे राहण्याची शिक्षा मिळालेली आहे. आणि यांचे महावेगमय प्रस्थान आहे जणू स्वर्गाकडे ! आणखी काही पॅसेंजर्स तर आपण प्लॅटफॉर्मवर उभे असणाऱ्यांकडे चक्क कीवेने

बघतात. "अरेरे...च् च्...गरीब बिचारे... काही तरी केलं पाहिजे यांच्यासाठी असा भाव तेवढ्या सेकंदातही त्यांच्या चेहऱ्यांवर चमकून जातो.

अशा गाड्या निघून जातात. आणि आपण मात्र तिथेच असतो. धूळ खात. प्रथम रागावतो, अपमानीत होतो, खिजून जातो, खिन्न होतो, थोडे नैराश्य आणि उदासीनताही आपल्याला लपेटू बघते. दोन्ही बाजूंनी आणि दोन्ही दिशांनी धडाडत जाणाऱ्या गाड्यांच्या गोंगाटाने चक्रावून जातो. थकतो. आणि नको वाटू लागते. वाटते अशीच कुरकुरत येऊन इथे टेकणारी एखादी म्हातारी गाडी पकडावी. डोळे मिटून बोरीबंदर किंवा चर्चगेटला जावे आणि तिथून एक अशी सुपर-फास्ट गाडी पकडावी की बस्स्....

पण थोड्या वेळाने आपण निबर होतो. अपमान, अवहेलना गिळून टाकतो. धुळीचे काही वाटत नाही. आवाजाची सवय होते. स्टेशनचे दारिद्र्यही अंगवळणी पडून जाते आणि मग तिथली मजा कळू लागते. सौंदर्य समजू लागते आणि हळू-हळू आपण देहभान विसरू लागतो.

त्या फास्ट गाड्यांचा वेग एक केवढी मौज आहे. सुसाटत, फुस्कारत, ऐटबाज-पणे विजेच्या वेगाने पळणाऱ्या त्या गाड्यांकडे बघण्यामुळे एक मस्त नशा चढते. एकामागून एक जाणाऱ्या चाकांचा लयबद्ध खडखडाट आपल्याला खिळवून टाकतो. पलीकडच्या एखाद्या बिंदूशी आपली नजर स्थीर केली की त्या रेषेला कापून जाणाऱ्या गाडीच्या फक्त पुसट वेगवान रेघा दिसतात. झटकन नजरेतून सुटून जाणाऱ्या, चमकणाऱ्या विद्युत् शलाकांसारख्या त्यांनी आपण चक्रावून जातो, दिपून जातो.

आणि गाडीच्या वेगाबरोबर मान फिरविली तर आणखीनच मजा दिसते. तुफान वेगाने जाणारी गाडी आणि तिला सर्व बाजूंनी चिकटलेले, लोंबकळणारे उतारू. दाराशी लोंबकळणाऱ्या उतारूंचे वाऱ्याच्या वेगाने उडून गाडीच्या दिशेला समांतर झालेले कपडे आणि स्त्रियांच्या डब्यात लोंबकळणाऱ्या तरुणींच्या रंगी-बेरंगी फडफडणाऱ्या साड्या तर कुर्रेबाज मोराच्या पिसाऱ्यासारख्या दिसतात. तो वेग आणि ते ऐटबाज पिसारे कुणी कॅमेऱ्यात किंवा चित्रात पकडतील तर काय बहार होईल.

संपूर्ण गाडी एकदा नजरेसमोरून निघून गेली की तिच्या वेगाने धावणाऱ्या मागच्या टोकाकडे बघत राहावे. गाडी थोडी दूर गेली की, तिचा वेग कमी झाल्या-सारखा वाटतो आणि उगाचच आपण त्या वेगाला घाबरलो होतो असे वाटते. आपला आत्मविश्वास वाढतो. तेवढ्यात जड एंजिन लावलेली एक थ्रू गाडी एकाएकी झंझावाती वेगाने अवतरते. विचित्र भूःभूःकार करीत ते महाप्रचंड धूड एंजिन अगोदर निघून जाते आणि मग ती लांबच लांब गाडी सरासर आपल्या

पृष्ठ ६१ वर

# परशुरामाची सावली

## रतनलाल भंडारी

साधारणत: चांगल्या शिस्तीच्या अपेक्षेने अनेक ग्रामीण मुलांच्या पालकांना शहरातील नावाजलेल्या शिक्षणसंस्थांची ओढ असणे स्वाभाविक असते. त्याचे आपणाला विशेष अप्रुपही वाटत नाही. परंतु पुण्या-मुंबईच्या विद्यार्थ्यांनी स्वत:ला उपलब्ध असलेल्या सोयींचा त्याग करून कुठल्यातरी आडबाजूच्या खेड्याची वाट धरावी, पालकांनी मुलांवर सुसंस्कार व्हावेत म्हणून आशेने खेड्यातल्या संस्थेकडे धाव घ्यावी असे सहसा घडत नाही. असे घडले तर आपण त्याला चमत्कार मानतो. असा चमत्कार कोळथरे येथील शिक्षणसंस्थेने करून दाखविला आहे. या चमत्काराच्या पाठीमागे एका सामान्य माणसाचे असामान्य कर्तृत्व उभे आहे. या ना त्या कारणाने एका ध्येयवेड्या माणसाने स्वत:ला इथे गाडून घेतले आहे. या संस्थेची सांप्रतची स्थिती, तिचा इतिहास, तिची प्रतिकूल परिस्थितीमधील काटेरी वाटचाल या माणसाच्या जीवनाची प्रकट अभिव्यक्ती आहे.

या संस्थेचे नाव आहे, 'विद्यार्थी आश्रम, कोळथरे.' नावाप्रमाणेच या ठिकाणी थोड्याफार फरकाने विद्यार्थी आश्रमपद्धतीने शिक्षण घेतात. 'कोळथरे–पंचनदी शिक्षणसंस्था' हा आश्रम चालविते. कोळथरे येथील 'विद्या–मंदिर' आणि हा 'आश्रम' ही संस्थेची दोन महत्त्वाची अंगे. आश्रमाची उभारणी, जन्म हाच मुळी विद्यामंदिराच्या पूर्ततेसाठी झालेला आहे. कोळथरे हे अवघे १३०० वस्तीचे छोटेसे कोकणी गाव. कोकणच्या गावासारखेच अरबी समुद्राच्या पुळणीत दोन बाजूला ध्यानस्थपणे उभ्या असलेल्या डोंगराच्या दुआबात सुस्तपणे पहुडलेले. बारा महिने नारळी, पोफळी चवऱ्या ढाळीत असतात. पण गावच्या अल्प वस्तीमुळे प्रारंभी सुरू झालेली शाळा मूळ धरेना. पुरेशा विद्यार्थिसंख्येच्या अभावी दरवेळेस शासनाकडून ग्रँटची नकारघंटा वाजविण्यात येई. शाळा बंद पडल्यास तरुण पिढीचे शिक्षण कसे

होणार ? वाण्या-बामणांची पोरं, श्रीमंतांची मुलं शहरात जाऊन शिक्षण घेतील. खारव्यांच्या, भंडाऱ्यांच्या, गरिबांच्या मुलांनी कुठे जावे ? या विचाराने एक माणूस सारखा तळमळत होता. गावातल्या पोराटोरांच्या भवितव्याच्या भीषण दर्शनाने झोपेतच दचकून उठत होता. नाही...नाही, शाळा बंद होता कामा नये. मुलांचा शिक्षण घेण्याचा हक्क हिरावून घेण्याचा कुणालाही अधिकार नाही आणि या विचाराने मामा वेडे झाले. कृष्णामामांना जळीस्थळी शाळेचीच स्पृहा लागली. शाळा सुरू ठेवायची असेल तर तिला आश्रमाची जोड दिली पाहिजे. एक आदर्श बोर्डिंग उभारले पाहिजे. कोकणच्या खेड्यापाड्यात, दूरवर दरीदरीतून मिणमिणत्या दिव्यांखाली रांगत असलेली विद्यार्थ्यांची पिढी येथे आली पाहिजे. आश्रमातून शाळेला विद्यार्थ्यांचा ओघ सुरू करता येण्यासारखा होता. त्यातच नव्या पिढीला घडविण्याची सुप्त इच्छा मामांच्या अंतरंगात वसत होती. नव्या पिढीला घडविण्यासाठी माझ्या जीवनातला क्षणन् क्षण कारणी लागावा अशी स्वप्नाळू वृत्ती होती. यातूनच कृष्णामामांचा संकल्प उभा राहिला.

पण नुसत्या संकल्पावर सामाजिक संस्थांची उभारणी होत नसते. साधनांची विपुलता नसताना, आडबाजूला दळणवळणाची फारशी साधने उपलब्ध नसताना, शिक्षणाचे साधन म्हणून वापरली जाणारी विद्यामंदिरसारखी संस्था नवथर असताना, आश्रम उभा राहणे अवघड होते. त्यातच दापोलीसारख्या तालुक्याच्या ठिकाणी सर्व सुखसोयींनी सुसज्ज असलेले बोर्डिंग—महाराष्ट्र प्रसिद्ध ॲलफ्रेड गॅडने हायस्कूलचे माध्यम—मदतीला असताना बंद पडलेले पाहून, कुणीही हे धाडस केले नसते. खऱ्या अर्थाने भविष्याच्या अंधारात घेतलेली ती बेधडक उडी होती. एक आधुनिक दिव्य होते.

आणि हे दिव्य मामांनी केले. आश्रमाच्या स्थापनेची जाहिरात झाली. अत्यल्प खर्चात मुलांचे शिक्षण करण्याची योजना तयार करण्यात आली. कागदावर सुरेख, योजनाबद्ध आणि आकर्षक प्लॅन तयार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या दिनक्रमाबद्दल शिस्तबद्ध कार्यक्रम ठरविण्यात आला. पण कागदावरच्या योजनांना पाहून जर सामाजिक संस्था उभ्या राहत्या तर 'आरंभशूर' हा शब्द शब्दकोशात कायमचा ठाण मांडून बसला नसता. त्यातच आश्रमातल्या मागसलेल्या मुलांना मोफत सोयीचे आकर्षण ठेवलेले. पहिल्या वर्षी तीनच मुले चुकलेल्या वासरांसारखी आश्रमात दाखल झाली. १९६० सालच्या प्रयत्नात आश्रमात दोन पेठे व एक सोमण यांनी प्रवेश घेतला. मामांच्या विशिष्ट राजकीय विचारसरणीने मागास समाजातील विद्यार्थी तर येईनात. हा प्रयत्न प्रामुख्याने त्यांच्यासाठीच होता.

तरी ते खचले नाहीत. झुंज ही तर मामांच्या आयुष्याची जीवनदायी प्रेरणा ! मग मामांच्या पायातले चक्र फिरू लागले. रत्नागिरी जिल्ह्यातल्या अनेक खेड्यांत मामा हिंडू लागले. आश्रमासाठी विद्यार्थी गोळा करू लागले. पुन्हा एकदा श्रीगणशा

केला. एवढा आटापिटा करून ६३–६४ च्या सुरुवातीच्या वर्षात फक्त नऊ विद्यार्थी आले. सुरुवातीचे बीजारोपण झाले. हळूहळू आश्रमाची कीर्ती पसरत चालली. सुरुवातीला लावलेल्या इवल्याशा रोपाचा वेलु गगनावर गेला नाही, पण त्याने चांगलेच बाळसे धरले. आजमितीला आश्रमात १०५ विद्यार्थी आहेत. एक लांजा सोडून उत्तर रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतून अनेक मुले येथे आलेली आहेत. एवढेच नव्हे तर मुंबई, कुलाबा, रत्नागिरी शहर यातलेही अनेक विद्यार्थी आहेत. मुंबईची संख्या जवळजवळ एक पंचमांश आहे. पुण्याचेदेखील तीन विद्यार्थी आहेत. मागासलेल्या समाजातले तीस विद्यार्थी आहेत. त्यांना मोफत शिक्षण देण्याचीहीं योजना आहे. या सर्व मुलांची व्यवस्था निरनिराळ्या दोन ठिकाणी करण्यात आली आहे. ते या दोन ठिकाणी राहात असले तरी पहाटेपासून सुरू होणाऱ्या आश्रमातील शिस्तबद्ध जीवनक्रमासाठी सर्वजण एकत्र येतात. तसे पाहाता मुलांची आज राहण्याची गैरसोय आहे. जागेच्या अभावी मुलांना अतिशय थोड्या जागेत वास्तव्य करावे लागते. जेवणासाठी त्यांनी हॉलची व्यवस्था होऊ शकत नाही. यासाठी मामांनी स्वतःच्या घराच्या मागेपुढे विस्तीर्ण मांडव उभारले आहेत. त्यातच नित्यक्रम पार पाडले जातात.

पण आता मामांनी बोर्डिंगसाठी स्वतंत्र इमारत उभी करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी मामा मुंबईच्या वाऱ्या करीत आहेत. श्रीकोळेश्वराच्या कृपेने हे कार्य पार पडेल याची मामांना खात्री आहे. अनेक नामवंत साहित्यिक, समाजसेवक कोळथरच्या या चिमुकल्या विश्वातील मामांच्या श्रद्धेने उभ्या राहिलेल्या ज्ञानमंदिराचे वारकरी झालेले आहेत.

मामांच्या या आश्रमातली शिस्त कडक आहे. शिस्तीच्या आणि निष्ठांच्या प्रश्नावर इथे तडजोड नाही पण यामागे सद्हेतु आहे. विद्यार्थी चारित्र्यसंपन्न व्हावा, गुणवान् व्हावा ही सदिच्छा या शिस्तीच्या मागे उभी आहे. आश्रमाचा दिनक्रमही त्यानुसारच योजलेला आहे. रोज पहाटे उठणे, दीड तास अभ्यास, एक तास काम, न्याहरी व शाळा, दुपारी जेवण, सायंकाळी एक तास खेळ, रात्रीचे जेवण व पुन्हा दीड तास अभ्यास असा त्यांचा आखीव दिनक्रम आहे. आश्रमीय विद्यार्थ्यांवर चोवीस तास नियंत्रण असते. त्यांच्या बारीकसारीक वाईट संवयीकडे लक्ष असते. त्या दूर करण्याचे उपाय असतात. वचक बसावा म्हणून प्रसंगोपात कठोर शिस्तीचा वापरही करावा लागतो. परंतु या सर्वांच्या मुळाशी विद्यार्थी भला व्हावा ही इच्छा असते. म्हणून शिस्तीच्या बाबतीत तडजोड नाही.

मामांच्या कठोरपणाची प्रसिद्धी अनेक हितशत्रूंनी गावोगाव करण्याचा प्रयत्न केला आहे. पण मामांच्या या कठोरपणामुळे अनेक विद्यार्थी आता मार्गी लागले आहेत. त्यांच्या आयुष्याचे सोने होऊ घातले आहे. मामांच्या कठोरपणातही अनेकदा सहृदयतेचा मनोहर आविष्कार पहावयास मिळतो. मामा जसे रागावतात,

शिक्षा करतात तसे मुलांच्यावर प्राणापलीकडे प्रेमदेखील करतात. संध्याकाळी एखाद्या विद्यार्थ्याला रागावून शिक्षा करणारे मामा रात्री त्याच विद्यार्थ्याच्या शरीराला प्रेमाने मालिश करताना दिसतात. मामांची ही शिस्तच आज आश्रमाच्या प्रगतीला, मुलांच्या स्वास्थ्याला आणि शैक्षणिक उज्वल वाटचालीला कारणीभूत झालेली आहे. हा आश्रम म्हणजे मामांच्या जीवनातील एक साकार स्वप्न आहे. म्हणूनच कधी कधी आश्रमावर संकटे आली, आर्थिक अडचण आली, की मामा आपले सर्वस्व पणाला लावायला मागेपुढे पाहात नाहीत. मध्यंतरी तर एकदा आश्रमासाठी मामांनी आपल्या सुंदर कलमांच्या बागेला विकायला काढले होते. कलमांचा सौदा होण्याच्या बेतात होता. एवढ्यात मामांच्या विद्यामंदिराची बरेच दिवस रखडलेली ॲरीयर पेमेंटची ग्रँट दत्तासारखी धावून आली. मामा म्हणतात, "प्रभूला डोळे ! तो झोपला नाही."

मामा स्वत: आश्रमाबरोबर विद्यामंदिरामध्ये अध्यापनाचे काम करतात. या छोट्याशा माध्यमिक शाळेत अध्यापनाचे कार्य करायला मिळणे हे अनेक शिक्षकांना भाग्याचे वाटते. हायस्कूलच्या या छोट्याशा विश्वात शैक्षणिक जीवनाचा असा काही आदर्श मामांनी उभा केला आहे, की त्यासाठी काही नामवंत अध्यापक मुद्दाम इथे येऊन अध्यापनाचे कार्य करण्यात समाधान मानतात. साधी एस. एस. सी. च्या निकालांचीच गोष्ट घ्या. गेल्या चार वर्षांत विद्यामंदिराचा निकाल चढत्या श्रेणीने लागत आहेत. गेल्या मार्चमध्ये २८ विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थ्यांना मामांनी परीक्षेला बसविले. त्यातले २३ विद्यार्थी पास झाले. निकाल ९२ टक्के लागला.

अर्थातच या टक्केवारीत विद्यामंदिराचे यश सामावलेले नाही. शिस्त आणि निष्ठेचा वारसा मामांनी संघातल्या आपल्या कार्यातून उचलला आहे. तरीसुद्धा या ठिकाणी भिन्न विचारांचे शिक्षण तज्ज्ञ येऊन या चिमुकल्या विश्वांत रममाण झाले आहेत. आता श्री. बलवंत चिंतामण भिडे यांची गोष्ट घ्या. ते नामवंत शिक्षण तज्ज्ञ आहेत. त्यांचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. वैचारिकदृष्ट्या तर मामांच्या मध्ये व त्यांच्यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. पण त्यांना या संस्थेत नव्या पिढीला घडविण्यात समाधान वाटते. ते आणि त्यांच्या सुविद्य पत्नी विद्यामंदिरामध्ये अध्यापन करतात. स्वतःच्या, चरितार्थाला लागेल तेवढे घेतात. बाकी सारे आश्रमाला, विद्यामंदिराला वाहतात. सध्याचे शालाप्रमुख श्री. काणे यांचे कर्तृत्वही संस्थेच्या उभारणीत खर्ची पडले आहे. इथले सर्वच शिक्षक नुसते 'पाट्या टाकणारे शिक्षक' नाहीत. सर्वचजण एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेले असल्यामुळे संस्थेला बाजारी स्वरूप आलेले नाही आणि त्यामुळेच विद्यामंदिरातला शिक्षणाचा स्तर नेहमीच उच्च दर्जाचा राखण्यात मामांनी यश मिळविले आहे.

मामांच्या वयाला आता पन्नाशीची झुळूक लागली आहे. त्यांचे संपूर्ण नाव श्रीकृष्ण गोपाळ महाजन. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोळथरलाच झाले. पण मामा

घडले मुंबईत, छबिलदास हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असताना मामा संघाचे स्वयंसेवक झाले. शिवाजी पार्कवरच्या व्यायाम मंदिरात ते चांगले मलखांबपटू म्हणून प्रसिद्ध होते. रत्नागिरीच्या गोगटे कॉलेजमध्ये ते इंटर सायन्स झाले. पुढे शिक्षणाला राम राम ! नाही म्हणायला त्यानंतर त्यानी कांदिवलीचा शारीरिक शिक्षणाचा शिक्षणक्रम पूर्ण केला असेल तेवढाच ! आमच्या सुप्याजवळ कऱ्हाटीला मामांच्या मावसभावाचा एक आश्रम आहे. या आश्रमाची जडण घडण मामांनी तीन वर्षे कष्ट करून केली आहे आणि मग मामा कोळथरला कोळेश्वराच्या परिसरात मांड ठोकून बसून राहिले.

प्रारंभी मामांचे आणि कोळथरच्या ग्रामस्थांचे सूत कधीच जमले नाही. ४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले तरीसुद्धा नवजीवनाची कोवळी किरणे कोळथरसारख्या छोटयाशा खेडयात पोचली नव्हती. सामाजिक जीवन तर पूर्वीच्याच रुळांवरून रखडत चालले होते. एकदा ग्रामस्थांनी गावकी भरवली. मजुरांनी, कुणब्यांनी अमुक दराने काम करावे. मामांनी हा नियम अन्यायाचा आहे म्हणून तो दूर करण्याचा सभा घेऊन प्रयत्न केला. पण त्यात अपयश आले म्हणून गावकीचे असले पिळवणुकीचे नियम धाब्यावर बसवीन अशी प्रतिज्ञा त्यांनी केली. मामांना गावाने बहिष्कृत करण्याची धमकी दिली. मामांनी सांगितले, ' असली गावकी मी मानीत नाही. अरे, तुमच्या सुकडी दहा वीस पैशाला देता का रे ?' मामांनी स्वतःच्या विहीरीत हरिजनांना पोहायला लावून असाच बाटगेपणा (!) केला.

गावाने पहिल्यांदा ताणून धरले. पण मामांना त्याची तमा नव्हती. पुढे पुढे गावाला कळले, की हे पाणी निराळेच आहे. लग्न झाल्यावर १५ दिवसांच्या आत पाठीवर झोळणा टाकून संघाच्या कार्यासाठी घरदार सोडून रानोमाळ भटकण्याची तयारी या पाण्यात आहे. गावकीच्या अनेक भांडणात मामा बहुजन समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी उभे राहात आले आहेत. म्हणूनच मामांवर ब्राह्मणांपेक्षा बहुजन समाजच अधिक प्रेम करतो. या प्रेमाच्या जोरावर गेली बारा वर्षे मामा कोळथरचे सरपंच होते.

परवाच त्यांनी सरपंचपदातून निवृत्ती घेतली. विरोधकांनी त्याचेही भांडवल केले. 'मामांना निवडून येण्याची भीती वाटते. ' अशी कुजबुज सुरू केली. मामांच्या कानावर ही वार्ता गेली. मामांनी लगेच भला मोठा फळा घेतला, त्यावर चक्क त्यांनी विरोधकांना आव्हान दिले-' मी इतरांना संधी मिळावी, अधिकाराच्या जागा फार काळ एकाच व्यक्तीने अडवू नयेत याचा पुरस्कर्ता आहे. म्हणून मी निवडणूकीला उभा राहात नाही. विरोधकांनी या हेतूचा विपर्यास केला आहे. माझी स्वतःची एक हजार रुपये ठेवण्याची-विरोधक सांगतील त्या ठिकाणी तयारी आहे. त्यांनीही ठेवावेत. मी निवडणुकीला उभा राहातो. मी हरलो तर ही रक्कम

त्यांना देईन. विरोधकांनी हार खाल्ली तर त्यांनी ते बोर्डिंगला द्यावेत ' अर्थातच विरोधकांनी शेपूट घातले ते सांगणे नलगे.

मामांचे अनेक उद्योग आहेत. ते स्वतः होमिओपॅथीचे डॉक्टर आहेत. ते संपूर्ण गोव्रती आहेत. गेली १५ वर्षे ते फक्त गाईचे दूध वापरतात. गाईचे पाडे इतरांना फुकट देतात. गाईच्या चांगल्या जाती निर्माण करण्यासाठी धडपडत असतात. पण त्यांची गाईवरची भक्तीहि अंधभक्ति नाही. गाईच्या आरोग्यसाठी तर त्यांनी तिला रहाटाला जुंपले होते. कॉ. जोगळेकरांनी त्यांच्या या गोमाता प्रेमाची जाहीर टिंगल केली तरी त्याला जाहीर ठणकावून उत्तर देतात. त्यांचे गोमाता-प्रेम हे 'सावकारी' प्रेम आहे. ते कधी कुक्कुट पालनाचाही व्यवसाय करतात. गॅस प्लँट उभारतात. कॅनिंगचा यशस्वी प्रयोग करून दाखवितात. पण हे सारे, इतरांची थे हे होऊं शकते यावरची श्रद्धा दृढ व्हावी म्हणून. पूर्वी जेव्हा कोकणात शासन भाताचे पीक जोरात यावे म्हणून भर देत होते, तेव्हा कोकणचा कॅलिफोर्निया करून इथे फळ-बागांची विस्तृत आखणी करा, काजू लागवड करा म्हणून आग्रह धरण्यात मामा सर्वात प्रथम होते. अजूनदेखील मामांचा तोच आग्रह आहे. ते म्हणतात, कोकणात उसाची लागवड करून, खत माती मसण घालून चिपळूणला साखर कारखाना उभा राहीलही, पण ही घाटी पिके काढण्याचा अट्टाहास का ? कोकणच्या भूमीची नारळी, पोफळी काजू कलमे इत्यादी शेकडो वरदाने आहेत. त्यांचा आश्रय केला तर कोकणच्या नंदनवनातून सोन्याचा धूर निघेल.

मामांची वाढ राष्ट्रीय स्वयंसेवक संघामधून झालेली असल्यामुळे जनसंघाचे ते राजकीय कार्यकर्ते आहेत. त्यांच्या सार्वजनिक कार्यातील निष्ठा, कळकळ आणि त्यागाची परंपराच इतकी उच्च आहे की दापोली तालुक्यातील त्यांचे विरोधक-देखील वेळ प्रसंगी त्यांच्या साहाय्याला धावतात. मध्यंतरी राज्यकर्त्यापक्षांत कोळथरची ग्रँट बद करावी म्हणून कुणीतरी बूट काढला. त्या प्रयत्नांची वासलात राजकर्त्यापक्षातील अनेक कार्यकर्त्यांनी परस्पर लावली. वैचारिक दृष्टया मामा फार सनातनी आहेत त्यांच्याशी वाद घालणे, त्यांचा वादात पराभव करणे, त्यांच्या आवेशामुळे, तळमळीमुळे अवघड असते. अलीकडे ते तापततातही फार. पक्षातदेखील ' धंद्यांचे राजकारण बद करा. ' म्हणून ठणकावून सांगतात.

पण मामा जनसंघाचे कार्यकर्ते असले तरी त्यांचा राजकारणातला रस कमी झाला आहे. त्यांच्या सार्वजनिक जीवनाची ' न्याय ' ही प्रमुख धारणा आहे. कोळथरला मुस्लिमांची वस्ती थोडी फार होती. मामांनी उर्दू शाळेची इमारत व्हावी म्हणून फार प्रयत्न केले. त्यामुळे सर्व हिंदूंचा रोष मामांनी ओढवून घेतला. पण शेवटी मुस्लीम समाजानेही मामांना दिलेली आश्वासने पाळली नाहीत. मामांनी मुस्लीम विद्यार्थ्यांची उर्दू शिक्षणाची सोय व्हावी म्हणून उर्दू शाळेसाठी प्रयत्न करून शाळा उभारली. सर्व हिंदूंचा तिच्याशी संबंध राहावा म्हणून सुतार

कामासाठी मराठी शाळेच्या एका खोलीवर हक्क ठेवला. पण मामांच्या दुर्दैवाने आश्वासन देणारा मुस्लीम समाजाचा प्रतिनिधी अल्लाला प्यार झाला. रत्नागिरी जिल्ह्यातल्या अलग प्रवृत्तीमुळे छोटी छोटी पाकिस्ताने निर्माण झाली आहेत. उद्घाटनाच्या ऐनवेळी मुस्लीम समाजाने खाका वर केल्या. मामांची श्रद्धा कोळपून गेली. त्यानंतर कोर्ट कचेऱ्या, सामाजिक तणाव यांचा असा कांही घोळ निर्माण झाला, की मामा वेडे कसे झाले नाहीत याचेच आश्चर्य वाटते. मामांना कायद्याच्या कचाटचात पकडण्याचे तर अनेक प्रयत्न झाले. तो सगळा इतिहास खूप आहे. या सगळ्या लढाईत विरोधकांनी अनेकदा मामांना अडकविण्याचा प्रयत्न केला. पण दर वेळेस मामा त्यांना पुरून उरले. शासकीय अधिकाऱ्यांची संपूर्ण सहानुभूती मामांना होती: सगळ्या अधिकाऱ्यांपुढे, न्यायालयात मामा स्वतःच केस चालवितात. एकदा तर या देशात हिंदूंना तुमच्याकडून कधी काळी न्याय मिळेल अशी माझी श्रद्धा नाही. पण तुमच्या न्यायाचे स्वरूप एकदा वेशीवर टांगण्यासाठी मी ही केस लढवीत आहे असे ठणकावून सांगण्यास त्यांनी कमी केले नाहीं. अजून या शाळेचे घोंगडे तसेच भिजत पडले आहे.

कोळथरच्या कोळेश्वराच्या प्रांगणात ताठपणे उभे असलेले मामा कोणत्याही अधिकाऱ्याला त्याची योग्यता असल्याशिवाय साधा मानही देत नाहीत. एकदा एका अधिकाऱ्याकडे मामांनी गावच्या भल्यासाठी काही पत्रव्यवहार केला. त्याला कार्यालयाकडून काही उत्तरच गेले नाही. तो अधिकारी कोळथरला आला. मामांना बोलावणे पाठविले. मामा स्वतः गेले नाहीत. ग्रामपंचायतीच्या कार्यालयाच्या किल्ल्या त्यांनी पाठवून दिल्या व वर निरोप धाडला, आपणाला हवी ती तपासणी आपण करा. तुमच्या कार्यालयाला माझ्या पत्राला उत्तर, पोच देण्याचाही साधा व्यवहार माहीत नाही. म्हणून आपण आल्यानंतर लोकप्रतिनिधीने आपल्या स्वागताला यावे हे बंधनही माझ्यावर नाही.' तो अधिकारी अवाक् झाला. एका केस मध्ये त्याने मामांच्या लोकनिष्ठेची लिखित ग्वाही दिली आहे.

अशा मामांच्या कितीतरी कथा आहेत. 'आग' म्हणून मामांचा उल्लेख करणारे त्यांचे विरोधकही त्यांच्या प्रामाणिकपणाची, लोकसेवेची, त्यागाची महती गात असतात. मामांचे जीवन समाजाच्या सेवेसाठी वाहिलेले आहे, याची खात्री सर्वांनाच आहे आणि म्हणूनच कोळथरचे सर्व ग्रामस्थ पक्षभेद विसरून मामांच्या खांद्याला खांदा लावून साथ देतात.

अलीकडे मामा फार लवकर चिडतात. त्यांची दृष्टी नेहमी लांबचा वेध घेत असते. आजूबाजूचे कार्यकर्ते, गावकरी त्यामानाने फार जवळचे पाहतात. मग मामा चिडतात. त्यांचे चिडणेही स्फोटक असते. पण आता विरोधक आणि मामा यांचो पाठशिवणीचा खेळ कमी होत चालला आहे. आपल्या कर्तृत्वाने मामांनी स्वतःची

पृष्ठ ४७ वर

# छटकाभर काणेकरांच्या सहवासात

रवींद्र पिंगे

अनंत काणेकरांना आठ सहस्र रुपयांच्या रशियन पारितोषिकाचं घबाड मिळाल्याची बातमी वाचली आणि सकाळी – सकाळीच मन विमल आनंदाने भरून आलं. कितीही झालं तरी काणेकर आपलेच आहेत. आपली पत, आपली पायरी आणि आपली पताका, ह्या त्रिभुवनमोलाच्या तीन प्राणवस्तू न सोडता एक प्रकारची निरपेक्ष आपुलकी दुसऱ्याच्या गळी पाडण्याचा चमत्कार काणेकरांनी हसता हसता करून दाखविलेला आहे. अशा ह्या आपल्या हसतमुख माणसाचा खिसा आसभास नसताना एकदम भरला ही लाख गोष्ट झाली. आपल्याला पोटभर आनंद झाला. दुसरा चहा अधिक गोड लागला. पेपरमधल्या इतर चामट बातम्या वाचून चढलेली कपाळावरची एखादी आठी कमी झाली असेल

दिवस कणाकणाने वाढू लागला तसतसं मग माथं भरकटू लागलं. उमाळ्याची पहिली लाट ओसरली. एकेक शंका ती समाधानाची हिरवीकंच पालवी कुरतडू लागली. प्रथम त्या पारितोषिकाचा रंग फार गडद आहे असं वाटलं. अगदी कॉमरेड आण्णाभाऊ साठ्यांपासून तो थेट शाहीर अमरशेखांपर्यंत साऱ्या जी-जी धरणाऱ्यांची आठवण आली. पण लाल असो, गुलाबी असो, पिवळा असो, हिरवा असो की आपला सोवळ्यातला भगवा असो, रंग म्हणून कसा तो कुणाला सुटलेला नाही, हेही त्या पाठोपाठ आठवलं. नंतर त्या पारितोषिकाचा वास घेऊन पहावासं वाटलं. पण तोही विचार सोडून दिला. कारण गुदस्ता हेच पारितोषिक कवी विंदा करंदीकरांना लाभलं होतं. कविवर्यांची शुद्ध ज्ञानासक्ती आणि उफाडेदार वळणाचं अस्सल ओजस्वी कवित्व ही दोन्ही नाणी खणखणीत वाजणारी होती. त्यामुळेच

त्यांना ते मिळालेलं होतं ह्याबद्दल मन निःशंक होतं. चमचेगिरीचा त्यात दुरूनही संबंध नव्हता. प्रतिभाशाली कवी, त्याच्या घाटदार काव्यपंक्तीतलं ओज, आणि ह्या दोहोंचा दबा धरून बसलेल्या श्रमिकांच्या प्रारब्धात लिहिलेल्या प्रकाशमान ललाटलेखाशी झालेला मेळ, ह्या तीन घटकांतून जी शब्दशक्ती प्रकट होते, द्रष्टेपणाचा जो दिमाख दिसतो, तिचा नि ह्या पारितोषिकाचा संबंध होता. शिवाय, अनेक चमच्यांना हे पारितोषिक अजूनही लाभलेलं नाही! काणेकरांच्या बाबतीत तोही प्रश्न नाही, कारण काणेकर चमचे नाहीत. अगदी आचार्य अत्र्यांच्या बैठकीतले आद्य मानकरी असूनही काणेकरांनी चमचेगिरी म्हणून कशी ती केलेली नाही. आणि अत्र्यांना न भावणारा हा सद्गुण काणेकरांपाशी असूनही काणेकरांबद्दल वेळोवेळी चार भले स्तंभ लिहिण्याशिवाय आचार्यांना गत्यंतर उरलं नाही, इतकी स्वयंभू कमाई काणेकरांनी केली आहे. ह्या काणेकरांच्या जमेच्या बाजूचंही मला भान आलं. शिवाय आचार्यांसकट कुणालाही काणेकरांनी स्वतःला वापरू दिलं नाही हेसुद्धा लक्षात ठेवण्यासारखं आहे. पण ते एक असो. नंतर विषाद ह्याचा वाटला, की गेली चार पाच वर्षं काणेकरांचा ललित लेखकाचा हुकमी हात खूपच मंदावला आहे. तसे ते चटेरं-पटेरी कपडे घालून आकाशवाणीवर हेलकावत येतात. प्रेमळ गप्पा मारतात. चहा पितात. मग पेन्सिलीने भुरूभुरू अक्षरात घाईघाईत लिहिलेलं आटोपशीर भाषण खणखणीत आवाजात बोलतात. पुढे तेच आकाशवाणीवरलं भाषण त्यांचा लेख म्हणून आडवाटेला प्रसिद्ध होतं. ह्या लेखांच्या व्यतिरिक्त काणेकरांचं स्वतंत्र लेखन उदंड मागणी असूनही बऱ्याच काळात दृष्टीला पडलं नाही. ह्या उलट जवळपास त्यांच्याच बरोबरीच्या दुर्गा भागवत, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, श्री. ना. पेंडसे, मालतीबाई बेडेकर, वगैरे सारस्वतांचे लेखनमळे सातत्याने शिंपते राहिलेले आहेत. पण तरीही ह्या शिंपत्या मळेवाल्यांच्या टवटवीत नावावर चक्क टपोरी फुली मारून नियतीने आंब्याचा टाळा मात्र बांधला काणेकरांच्या मांडवाला! तेव्हा त्या लहरी नियतीला पहिला नमस्कार करून मी काणेकरांना नमस्कार करायला निघालो. कारण अखेर काणेकर आपलेच आहेत. आणि आपली पत, पायरी आणि पताका न सोडता हे अभिजात आपलेपण त्यांनी थेट आमच्या पोटात अलगद उतरवलेलं आहे. खरं म्हणजे आमच्या काळजातच त्यांचं छोटंसं घर आहे. आहे ना? तर चलो भैय्या, आपने काणेकरको मिलेंगे!

आता काणेकरांना गाठायचं कुठे?

रॉय किणीकरांचा एक जिप्सी अपवाद सोडला, तर काणेकरांसारखा वाऱ्यावर भटकणारा भटकबहाद्दर लेखक सापडणं कठीण. अर्थात दोघांच्या भटकण्यात मूलभूत फरक आहे. किणीकर समुद्रावरल्या नारिंगी चोचीच्या गल पक्ष्यासारखे आहेत. समुद्रावरून जहाज जाताना दिसलं की गल पक्षी पंख पसरून जहाज जाईल तिकडे

आशेने पिरंगत जातात. घरदार करणं त्यांना ठाऊक नसतं. कुणाच्या तरी आजूबाजूला पिरंगणं हाच त्यांचा धर्म. काणेकर कबुतरासारखे आहेत. कबुतर फार काळ लांबच्या छपरावर रमत नाही. मग, भले तिथली उन्हं उबदार असोत. थोडा वेळ ह्या छपरावर मुरड, थोडा वेळ त्या छपरावर नाच, असं करून झालं की ते आपल्या मूळच्या छपरावर घुमायला माघारीं येतं. मान फुगवून यथेच्छ घुमतं. पुन्हा पंख पसरून शेजारच्या छपरावर ऊन खायाला मोकळं होतं. काणेकरांची रीत ही अशी आहे. भटकन्ती ते भोगतात. भरकटत नाहीत. तरीही त्यांना घरी गाठणं कठीण असतं. मी त्यांच्याकडे फोन केला. उत्तर आलं,

'कुठल्याशा त्या नवीन कवीच्या कवितासंग्र हाचा आज वसईला प्रकाशन समारंभ आहे. तिकडे अध्यक्ष म्हणून गेले आहेत. वसईहून परस्पर अरनाळ्याला एका मंडळात भाषणाला जाणार आहेत.'

दुसऱ्या दिवशी सकाळी फोन केला. उत्तर आल,

'आत्ताच पाच मिनीटांपूर्वी बाहेर पडले.'

'कुठे गाठू मी त्यांना ?'

'लोणावळ्याला गुलाबाची बाग बघायला गेले आहेत मित्राबरोबर.'

'मग स्टेशनवर भेटतील का ?'

'नाही, ते खाजगी मोटारीने गेले आहेत. उद्या सकाळी परतलंच पाहिजे, कारण सोसायटीची सभा आहे त्यांना उद्या दुपारी.'

तिसऱ्या दिवशी सकाळी फोन केला. उत्तर आलं,

'ते आले आहेत. पण आत्ता घरी नाहीत. कुठल्याशा सकाळच्या कॉलेजातल्या वाङमय मंडळात त्यांचं भाषण आहे.'

'दुपारी भेटतील ?'

'नाही. ते परस्परच लंचला जाणार आहेत. एका मित्राचं आमंत्रण आहे त्यांना.'

'बरं, संध्याकाळी तरी भेटतील ?'

'कठीण आहे.'

'का ?'

'कारण एका न्यायाधिशाच्या घरी पार्टी आहे. तिथं बोलावलं आहे त्यांना.'

'बरं, मग मी रात्री जेवणखाण आटपून येतो.'

'पण ते कसे भेटणार ? त्यांना आय. एन. टी. च्या फंक्शनला आमंत्रण आहे नं. रात्री परतायला एक-दीड तरी होईल.'

'मी चक्रावलो. कडवटपणे विचारलं,

'पुढल्या आठ दहा दिवसात एक पाच मिनिटं तरी भेटतील काय ?'

'ते कसं सांगू ? कारण एका खासदाराने त्यांना दिल्लीचं विमानाचं परतीचं

तिकीट पाठवलंय. ते परवा सकाळी निघतील.'

'मग परततील केव्हा ?'

'कुठल्याशा खासदाराचा एकसष्ठीचा समारंभ आहे. तो समारंभ संपेल नि ते लोक त्यांना सोडतील तेव्हा हे व्हाया इंदूर परतणार.'

'इंदूरला काय आहे ?'

'एका माजी स्वातंत्र्यसैनिकांच्या परिषदेचे हे अध्यक्ष आहेत तिकडे. ते स्वातंत्र्य सैनिक नि हे एकाच ग्रूपमध्ये होते म्हणे कराची काँग्रेसच्या वेळी !'

मी हरलो. वाटलं, एखादी संस्था काढावी नि तिचा पाळणा जोजवायला काणेकरांना बोलवावं, हाच त्यांना गाठण्याचा उत्तम मार्ग आहे. पण विचार बदलला. कारण काणेकर माझ्या घरचा पाळणा जोजवून दुसऱ्या घरी जातील नि आम्हाला मात्र बाळ-बाळंतिणीचा सांभाळ करीत बसावं लागायचं. त्यापेक्षा काणेकर जिथे जिथे सभेला गेले असतील तिथे जावं हा उत्तम मार्ग. विचार पक्का झाला. गावात चारपाच सभामध्ये डोकावलो. एका सभेत अर्थातच काणेकर अध्यक्षपद सांभाळीत असलेले दिसले. चेहेऱ्यावर नेहमीचीच खुषी होती. तसे ते नेहेमीच खुषीत असलेले दिसतात. फक्त एकदाच किंचित नाखूष दिसले. त्यावेळी विचारलं, 'काय हो, आज सचित का ?' तर म्हणाले, 'त्या आमच्या वसंत ठेंगडीला साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आज माझ्या अध्येक्षतेखाली शिवाजी मंदिरात सत्कार आहे. वेळ होत आली, पण अजून ते लोक मला न्यायला आले नाहीत. काय झालंय काय कळत नाही.' मी म्हणालो, 'अहो, त्या सत्कारवाल्यांनी मलाच तुम्हाला आणायला पाठवलंय. चला.' तेव्हा फुलांचा घमघमाट यावा तसे खुषीत आले. आम्ही टॅक्सीतून निघालो. वाटेत रहदारीच्या सिग्नल्सनी एकदाही लाल डोळे वटारले नाहीत. प्रत्येक चौकावर हिरव्या कंच फुलांचे गेंदच फुलत होते. त्यावरून काणेकरांच्या पायगुणाची एक झलक लक्षात आली. तो अपूर्व अनुभव मनात जागा होता. सभेनंतर काणेकर मोकळे मिळाले. त्यांच्याशी लगट करीत त्यांच्या घरी परतलो. मुंबईतल्या सर्व लेखकांना आता घरच्याप्रमाणेच झालेल्या हरी ह्या त्यांच्या स्वामीनिष्ठ नोकराने आम्हाला कवटाचे पोळे करून वाढले. ते चापले. मग म्हटलं, आपण लेखक आहोत तर आता भरल्या पोटावरून हात फिरवीत थोडं तत्त्वचिंतन करावं, थोडीशी जगाची चिंता पहावी. पण काणेकर इतके खुषीत दिसले भरल्या पोटीही ते जगाची चिंता वहायला राजी दिसेनात. म्हणून तत्त्वचिंतन वगैरे खुंटीला टांगून आम्ही शिळोप्याचा गप्पाटप्पांना सुरवात केली. पहिली किल्ली मीच मारली.

'काणेकर, तुमचा जन्म हो कुठला ?'

'आपल्या गिरगाव बॅकरोडवर महारबावडी पोलीस स्टेशन आहे ना, तिथल्या पोलीस लाईन्सच्या चाळीत माझा जन्म झाला. जन्मतारीख दोन डिसेंबर एकोणीसशे पाच. माझे वडील महारबावडी पोलीस स्टेशनवर पोलीस होते. मी दोन

वर्षांचा असतानाच ते वारले. त्यांचा फोटोही नाही नि मला त्यांचं रूपही आठवत नाही. त्यांच्या पश्चात मला माझ्या आईने वाढवलं. ती दहा वर्षांपूर्वी वारली.'

'तुम्ही काणेकरमंडळी मूळची कुठली?'

'मालवणची. अव्वल इंग्रजीतले पुढारी मामा परमानंद हे माझ्या आईचे आजोबा. मामा परमानंद महात्मा फुल्यांचे खास मित्र. फुले आपलं लिखाण प्रथम मामा परमानंदांना दाखवीत, इतका त्यांचा अधिकार होता. मामा एलफिन्स्टन हायस्कूलचे प्रिन्सिपॉल होते. न्यायमूर्ती तेलंग हे मामांचे विद्यार्थी. न्यायमूर्ती तेलंग, न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले, महात्मा गांधी, पंडीत नेहरू अशी आपली राष्ट्रीय परंपरा आहे. ह्या परंपरेची गंगोत्री मामा परमानंदांमध्ये सापडते. पंच्याऐशी साली जी पहिली काँग्रेस झाली, तिच्या जन्मदात्यात मामा परमानंद प्रमुख होते. तेलंग—रानडेही होते. तेलंग काँग्रेसचे पहिले चिटणीस आहेत. मामा काही दिवस मांडवीला दिवाणही होते. बडोद्याच्या सयाजीरावांनी मामा परमानंदांना संस्थानचं दिवाणपद भुषविण्याबद्दल खूप गळ घातली, पण मामा गेले नाहीत. शेवटी सयाजीरावांनी मामांना दर महिन्याला खुषीचं पेन्शन देण्याचा घाट घातला. मामांनी सयाजीरावांना कळवलं 'मला पैसे नकोत; महात्मा फुले सध्या अर्धांगाने आजारी आहेत त्यांना पैसे द्या. शिवाय फुल्यांना Sense of character आहे. स्वतःच्या घरापासून त्यांनी समाजसुधारणेला प्रारंभ केलेला आहे. तेव्हा पैसे फुल्यांकडे वळवा.' सयाजीरावांनी मग दोघांनाही पसे दिले. मामा गिरगावात बॉम्बे बुक डेपोच्या पिछाडीला भालचंद्रवाडीत राहायचे. ते आजारी पडले तेव्हा न्यायमूर्ती रानडे वगैरे प्रार्थनासमाजी मंडळी दर शुक्रवारी त्यांच्या घरी येऊन सामुदायिक प्रार्थना करायचे. ह्यावरून मामा परमानंदांचं स्थान काय आहे हे पहा. माझी आई ही त्यांची नात.'

"काणेकर, तुम्ही वैश्यवाणी. म्हणजे ब्राह्मणेतर. आज अनेक ब्राह्मणेतर साहित्यिकांना अस वाटतं की त्यांचं ब्राह्मणेतरत्व त्यांच्या लौकिकाच्या, यशाच्या आड येतं. ब्राह्मण असते तर आहेत त्याच लेखनगुणांवर त्यांनी मोठी तलवार मारली असती. पण बहुजन समाजात जन्म झाल्यामुळे त्यांचा भरघोस यश मिळण्याचा चान्स हुकला. अनेक ब्राह्मणेतर लेखकांना अंतःकरणापासून वाटतं की भटजी साहित्यिकांनी त्यांना वेगळ्या पंगतीत बसवलेलं आहे! तुमचा अनुभव काय आहे? तुम्ही केवळ ब्राह्मणेतर आहात म्हणून पुढे यायला त्रास झाला? ब्राह्मण साहित्यिकांनी तुमच्या बाबतीत डावं—उजवं केलं?'

'अजिबात नाही. मला सर्वांनी प्रेमच दिलं. आमची राजकीय मतं वेगळी असूनही 'केसरी'नेही मला फार प्रेम दिलं. तात्यासाहेब केळकर पूर्वी वर्षातून एकदा कोकणात हिंदळ्याला त्यांच्या गावी जायचे. तेव्हा मुंबईला एकदा त्यांनी माझ्याकडे वस्ती केली होती. ते म्हणाले, 'बोटीच्या डेकवर वाऱ्याने शेंडी उडते नि मला त्रास होतो.' तेव्हा मी त्यांना शेंडी वाऱ्याने उडू नये म्हणून स्कल कॅप

घेऊन दिली ! लेखकाला त्याची जात कधी नडत नाही.'

'फार पूर्वी, म्हणजे जेव्हा तुम्ही कॉन्ट्रॅक्टर बिल्डिंगमध्ये रहायचेत, तेव्हा पंडीत नेहरू तुमच्या बिऱ्हाडी आले होते म्हणे !'

'गिरवांत कॉन्ट्रक्टर बिल्डिंगा दोन आहेत. एकीमध्ये मी रहात होतो. दुसरीमध्ये छपाई कामगारांच्या युनियनचं ऑफीस होतं. नेहरू तेव्हा कामगारपुढारी होते. त्या नात्याने ते त्या दुसऱ्या इमारतीतल्या युनियनच्या ऑफिसात आले होते. त्यांनी कामगारांची सभा घेतली. अध्यक्ष हवा होता. मी त्यावेळी राजकीय वर्तुळात असायचा म्हणून कामगार माझ्याकडे आले नि म्हणाले, 'अध्यक्ष हवा आहे, तुम्ही चला !' मी गेलो नि अध्यक्ष झालो. माझ्या अध्यक्षतेखाली पंडीत नेहरूंचं कामगारांपुढे भाषण झालं.'

'तुम्ही आत्मचरित्र का लिहीत नाही ? मजेशीर होईल."

'कोण म्हणतो लिहिलं नाही म्हणून ? पहिले ओळीने आठ लेख 'वसंत' मासिकातून दोन वर्षांपूर्वी लिहीले आहेत. आणखी असेच दहा-पंधरा लेख लिहून मग पुस्तकरूपाने प्रसिद्ध करीन. आठव्या लेखात मी डॉ. महमूद हे खोटं नाव धारण करणाऱ्या क्रांतिकारक एम. एन. रॉयना फॉर्जेट हिलवर डॉ. चिटणीसांसोबत सुंदर काबाडींच्या घरी गूपचूपपणे भेटलो, इथपर्यंत मजकूर आला आहे. मात्र माझं आत्मचरित्र जरा वेगळं आहे. त्यात मी त्या काळाचं चित्रण करतो आहे. माझ्या स्वतः-बद्दल कमी लिहितो आहे. आत्मसमर्थन तर अजिबातच नाही. अलिप्त राहून मी दुसऱ्यांबद्दलच्या आठवणी सांगितल्या आहेत. माझ्या स्वतःबद्दलचा मजकूर तसा कमी आहे.

'म्हणजे वेगळ्या प्रकारचं पुस्तक तयार होईल म्हणायचं.'

'हो, इतरांच्या आठवणींवर भर असलेलं आणि आत्मसमर्थन नसलेलं आत्मचरित्र, असं ते होईल.'

'त्यावेळी तुमची राजकीय मतं काय होती ?'

'आम्ही जहाल समाजवादी. एकतीस साली कराचीला सरदार पटेलांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस भरली होती. तेव्हा 'नवजवानसभा' नावाचा जहाल समाजवाद्यांचा आमचा गट गेला होता. त्यावेळी मुंबई ते कराची परतीचं तिकीट अवघं तेरा रुपये होतं, त्यावरून त्यावेळच्या स्वस्ताईची कल्पना येईल ! आमच्या गटात महंमद तुफेल आणि क्रांतीकुमार ह्या नावाचे दोन तरुण सशस्त्र क्रांतिकारकही होते. पुढे त्यांचं काय झालं कुणाला ठाऊक ! बहुतेक राजकीय झंझावातात ते हरवले असणार ! आमचा नवजवानसभा–गट इतका जहाल होता की क्रांतिकारक समजल्या जाणाऱ्या सुभाषबाबूंनाही आम्ही अतिजहाल वाटलो. आमच्या जहाल मतांमुळे ते आमच्यावर खूप चिडले. आमच्या गटातल्या तरुणांनी स्वतःच्या रक्ताने भिजलेली काळी कागदी फुलं महात्माजींच्या अंगावर उधळली होती !'

' तुम्ही कॉलेजचं शिक्षण संपल्यावर ताबडतोब प्रोफेसरकीकडे वळलात ?'

' नाही. सुरुवातीला मी मुंबई नगरपालिकेच्या प्रसिद्धी विभागात नोकरीला होतो. डास मारा, पाणी कमी वापरा, वगैरे हँडबिलं माझ्या हातची आहेत ! पण असल्याप्रकारचं काम आपल्याला धकणार नाही असं मला वाटलं. नंतर ' चित्रा ' साप्ताहिक, ' नाटयमन्वंतर ,' असं करीत करीत खालसा कॉलेजात आलो. तिथून मग सिद्धार्थला. प्राध्यापकी मला फार चांगली मानवली. '

' तुम्ही जवळपाळ अर्धी पृथ्वी पायाखाली घातलीत !'

' हो. इंग्लंड, युरोप, अमेरिका, रशिया, सिलोन–सिंगापूर–जावा–सुमात्रा–हाँग-काँग हा पूर्वेचा पट्टा, पूर्व आफ्रिका, वगैरे सारा भाग माझा पाहून झालेला आहे. फक्त ऑस्ट्रेलिया आणि जपान राहिलाय. '

' आफ्रिकेत लेखक भेटले ?'

' पत्रकार भेटले. आफ्रिकेतल्या इंग्रजी पत्रव्यवसायात खूप भारतीय लेखक मंडळी आहेत. ' ईस्ट आफ्रिकन स्टँडर्ड ' म्हणून तिथलं प्रमुख दैनिक आहे. त्याच्या संपादकपदावर एक पारशी बाई आहे ! कुलभूषण, मास्कारनीस वगैरे पत्रकार तिथे चांगलं नांव कमवून आहेत. अफ्रिका खंड आता फार सुधारलेलं आहे. नैरोबी शहर तर एखाद्या युरोपियन शहराइतकं सुंदर आणि अद्यावत आहे. तिथे मराठी-मंडळी खूप आहेत. सर्व सधन आहेत. पिढयान् पिढया तिथे राहिलेली आहेत. डॉ. नेऊरगावकरांसारखी कुटुंबं तर तिथल्या समाजात आपल्या सेवावृत्तीने मान्यता पावली. त्यांच्या नावाचा तिथे रस्तासुद्धा आहे. आपली खूप मराठी डॉक्टरमंडळी आफ्रिकेत स्थायिक झाली आहेत. "

" अफ्रिकेत वाघ–सिंह भेटले की नाही ? "

" वन्य पशुपक्षी हे तर आफ्रिकेचं धनच आहे. नैरोबी शहरापासून अवघ्या सहा मैलावर त्यांचं राष्ट्रीय वन आहे. त्या अभयारण्यात वाघ, सिंह, रानरेडे, पाणघोडे, जिराफ, झेब्रा, वगैरे इतस्ततः मोकळे फिरत असतात. जिराफांच्या टोळया तर शेकडयांनी दिसतात. हे सर्व वनवैभव तुम्हाला बंदिस्त हॉटेलमध्ये बसून पाहाता येतं. मी स्वतः जंगली हत्ती अगदी जवळून पाहिले. भारतीय हत्ती गोंडस असतो. आफ्रिकन रानटी हत्ती अधिक उंच, लांबट, आणि अकाळविकाळ वाटतो. त्याच्या कानाच्या कडाही कातरलेल्या असतात. तिथे जंगली हत्ती नष्ट करण्याची मोहीम काढतात. ह्या वर्षी दोन हजार हत्तींना ठार कसं करायचं हा त्यांच्यापुढे मोठा यक्ष प्रश्न आहे, इतका तिथे हत्तींचा सुळसुळाट आहे ! पक्षीजगताबद्दल तर काही विचारूच नका. इतके अगणीत सुंदर रंगाचे पक्षी दृष्टीला पडणं अशक्य. गोल्डन सनबर्ड तर संपूर्ण सोनेरी असतो. शिवाय तो कबुतरासारखा माणसाळलेला आहे एक जर्मन फोटोग्राफर तिथे फोटो काढायला लागला तर पक्षी त्याच्या हातावरच बसला ! आणि अतिशय भाग्याची गोष्ट म्हणजे किलीमांजारो पर्वताचं दर्शं नही

मला झालं. दूर क्षितिजावर त्याचं बर्फाच्छादित शिखर चकमकत होतं. असा निसर्ग कुठे दिसणे नाही ! "

खरं म्हणजे असे निरनिराळे अनुभव गाठीशी असलेला सौंदर्याचा भोक्ता साहित्यिक कुठें दिसणं नाही ! काणेकरांची नि माझी ही काही पहिलीवहिली भेट नाही. गेली वीस वर्षं मी त्यांना सतत भेटतो आहे, सतत पाहातो आहे. प्रत्येक वेळी भेटावं तर त्यांनी काहीतरी जगावेगळं पाहिलेलं असतं. दैवाचा कौलही अनायासे त्यांच्या बाजूचा आहे. एकदा रस्त्याने ते शामराव ओकांबरोबर चालले होते. फुटपाथवर गोल्डस्मिथच्या नाटकाचं पुस्तक पडलं होतं. ते पुस्तक घेऊन त्यांनी ते मधोमध फाडलं. त्यातलं She Stoops to conquer त्यांच्या वाटचाला आलं. दुसरं Good Natured Gentle-man शामराव ओकांना त्यांनी दिलं. She stoops to conquer चं त्यांनी 'निशिकांताची नवरी' हे विनोदी रूपांतर केलं. तो नंबरी फार्स बेफाम गाजला. शामरावांच्या वाटयाला आलेल्या 'भिडस्त माणूस 'चं तसं चीज झालं नाही. एकदा रस्त्यावरून जाताना फुटपाथवर त्यांना जुनं पुस्तक मिळालं. त्यात बर्ट्रांड रसेलच्या हस्ताक्षरातलं एक पत्र दुमडून ठेवलेलं त्यांना आढळलं ! आहे की नाही कमाल ? चेकॉव्हच्या बायकोने म्हातारवयात केलेलं चेकॉव्हच्याच नाटकातलं शेवटचं काम पाहायचं भाग्यही त्यांना असंच आसभास नसताना मॉस्कोमध्ये लाभलं. लेनिनचं शवही त्यांनी पाहिलं ! डॉम मोराएसच्या पहिल्या काव्यवाचनाला फक्त एकाच मराठी लेखकाला आमंत्रण होतं— तो मराठी लेखक म्हणजे पुन्हा काणेकरच ! 'नाटच–मन्वंतरा'साठी संबंधित मंडळींनी खूपच झीज सोसली. वर्तकांचा पाण्यासारखा पैसा गेला. डॉ. चिटणिसांची उमेद गेली. शाब्दिक श्रेयापलीकडे फारसं काही साधलं नाही. भाडयाचे पैसे नसल्यामुळे गरीब बिचारे नट आणि रंगभूमीवरचे कामगार कंपनीबरोबर दौऱ्यावर गेलेले असताना सोलापूरहून पुण्यापर्यंत पायी–पायी चालत आले–इतकी त्यांच्या सेवाबुद्धीची अघोर विटंबना झाली ! लौकिक झाला तो मात्र इब्सेनचे पहिले मराठी रूपांतरकार म्हणून 'नाटच–मन्वंतरा'च्या काणेकरांचा. खाडिलकरकाकांच्या पदांच्या आणि खाडिलकरमास्तरांच्या पोवाडयांच्या त्या काळात काणेकरांच्या त्या वेळच्या मानाने शृंगारसुलभ गीतांना गायनी गळा लाभला तो कलिंगडाच्या गार रसासारखा जीव तोषविणारा, ज्योत्स्नाबाईंचा. हा काणेकरांचा शुभयोग. त्यानंतर अनेकांनी आणि अनेकींनीसुद्धा गोडगोड भावगीतांचं लडीवाळ दळण दळलं त्यांना काय मिळालं फत्रे ? 'माणूस' ह्या एकमेव आगळ्या चित्रपटाची 'भारडाला' पटकथा लिहूनही ते सिनेमावाले झाले नाहीत. अशा अनेक बलवत्तर योगायोगांचं ललाट काणेकरांना लाभलं आहे.

तरी हा साधा माणूस सर्वांशी खेळीमेळीने, बरोबरीच्या नात्याने वागतो; स्वतःची पत न सोडता. मागे एकदा पु. शि. रेग्यांनी होळीच्या मुहूर्तावर 'छंद'च्या

लेखकवर्गाला रात्री ओवळचा गप्पाष्टका पिसण्यासाठी घरी बोलावलं होतं. काणेकरांनी त्या रात्री मामा हुंदलीकरांच्या सुमारे शंभर तरी अजब रहस्यकथा हसतखेळत ऐकवल्या. आणि त्याही किती निर्वैर विनोदी पातळीवरून ! आजही तुम्ही काणेकरांकडे केव्हाही जा, आचार्य अत्र्यांचे दोन-चार तरी अस्सल किस्से तुमच्या कानी पडणारच. हे गुण लक्षात घेता खरं तर हा entertainer रेडिओवरच नोकरीसाठी यायचा. त्यांना आकाशवाणीवर खेचण्याचे वरपासून खालपर्यंत प्रयत्नही झाले. पण निव्वळ हसण्याखिदळण्यात आणि सोंगट्या मागेपुढे करण्यात हा माणूस आटपू नये अशी नियतीची प्रबळ इच्छा असल्यामुळे ते पुस्तकं लिहीत, वाचीत आणि शिकवीत राहिले. झालं हे भलंच झालं. काणेकरांनी आपल्या गप्पांच्या अड्ड्याची चावडी होऊ दिली नाही, ही गोष्टसुद्धा सद्‌गृहस्थ म्हणून ते किती भानावर आहेत ह्याचीच द्योतक आहे. दुष्टावा, मत्सर आणि हापापलेपण त्यांच्यापाशी चमचाभरसुद्धा नाही. आहे ती फक्त grace.

लेखक कसं व्हावं, साहित्यिक यशाच्या चोरवाटा कुठल्या वगैरे फालतू गोष्टी सोडल्या, तर उरलेल्या अनेक बाबतीत ते आपण होऊन मार्गदर्शन करीत असतात. 'अरे, तू जेवणात नेहमी दहीभात खात जा, विशेषतः सहलीला गेलास की.' इथ-


## शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे

### वार्षिक निबंध स्पर्धा (तृतीय वर्ष)

**विषय :** उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी मालकीचा हक्क हा मूलभूत हक्क मानावा काय ?

**वयोमर्यादा :** १८ ते २५ वर्षे.

**सूचना :** १. निबंध १५०० ते २००० शब्दांचा असावा.

२. स्पर्धकाने आपले नांव, वय, संपूर्ण पत्ता व शिक्षणसंस्था अगर व्यवसाय यासंबंधीची माहिती निबंधासोबत पाठवावी.

३. तारीख १५ फेब्रुवारी १९७२ पर्यंत खालील पत्त्यावर पोहोचेल अशा बेताने निबंध पाठवावा.

कार्यवाह : शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, १२९६/२ एरंडवणे, पुणे ४.

४. पहिल्या दोन क्रमांकाच्या निबंधास प्रत्येकी पन्नास रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. याबाबत परीक्षक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

**सुलभा ब्रह्मे**, कार्यवाह

पासून ते 'तू बँकेत भलतीच मोठी रक्कम ठेवू नकोस बाबा; काळ असा आलाय की, उद्या काय होईल सांगता येत नाही!' इथपर्यंत अनेक मौलिक हितोपदेश त्यांनी व्यक्तिशः मला केलेले आहेत! माझी तर ही रीतच आहे की, आकाशवाणीवर त्यांना फितवून पैसे हातावर टेकवले की, त्यांच्याबरोबर गप्पा मारीत मारीत बसच्या थांब्यापर्यंत जायचं. त्यांच्या दोन, तीन बसेस मुद्दाम चुकवायच्या, नि पोटभर गप्पा मारायच्या. डोक्यावर भगभगीत उन असलं तरी काणेकरांसमवेत रपेट करणं म्हणजे सावलीलाच बसल्याचा आनंद असतो. आता, काणेकर पहिल्यासारखे लिहिते राहिलेले नाहीत हे खरंच आहे. पण नावावर धड साडेतीन चोपड्याही नसलेल्या खत्रुडांनी खात्यावर चाळीस, पन्नास गुणवंत पुस्तकं असलेल्या काणेकरांच्या नावाने बोटं मोडण्यात शुद्ध करंटेपणाच आहे. शिवाय काणेकरांसारखा लेखक आपल्या विशिष्ट शैलीने जेव्हा समाजात वावरतो, तेव्हा सामान्य जनात वाङ्मयाविषयी एक अदृष्य असा लळाच तो उत्पन्न करीत असतो. एका अर्थाने तो मळा शिंपीत असतो.

दिलखुलास गप्पा संपल्यावर ते मला त्यांनी गच्चीत लावलेली छोटीशी फुलबाग दाखवू लागले. बागेत उन्हं उतरली होती. चिमुरडी फुलं लुकलुकत होती. काणेकर सांगत होते, 'हे दगडी पुष्प. हे बेळगावहून आणलं. हा गुलछडी. ही इथलीच आहे. ही हरळीसारखी फुलणारी फुलं मला शिवाजी विद्यापीठातल्या माळ्याने दिली.' एकीकडे फुलांवर त्यांचं जीव लावून भाष्य चाललेलं होतं नि दुसरीकडे, आपल्या दारात फुलं फुललेली आहेत ह्याचा त्यांना वाटत असलेला दिलासाही मला प्रतीत होत होता. काणेकरांना जो दिलासा फुललेल्या फुलझाडांबद्दल वाटला त्याच जातकुळीचा दिलासा जेव्हा एक व्यक्ती लेखकाचं प्रतीक होऊन समाजात ऐटीत फिरते, वावरते, तेव्हा उरलेल्या लेखकांना वाटतो. म्हणून समाजात style ने वावरणारे अनंत काणेकर हा आमचा दिलासा आहे!

# कविता

## स्वप्नील पाखरू

स्वप्नांची फुलपाखरं
अलगदपणे विहरली
विहरताना पुष्पगंधातून
मधाळपण सुगंधली
मधाळलेलं एक पाखरू
अवचितपणे गुरफटलं
गुरफटतांना रोमांचून
अनामिकतेनं सुखावलं
सुखावलेलं फुलपाखरू
व्यवहारात अडखळलं
अडखळतांना आडवाटेतुन
थेंबाथेंबांनी रक्ताळलं . . . !

— लता मेहता

## फ[illegible]

तुझ्या हृदयीच्या पैंजणात
माझ्या प्रितीचं घुंगरू बांधावं !
अग्
त्या पदन्यासाच्या तालात
मी सात जन्म–
– जन्मोजन्मी चालत रहावं !
पण... त्या अगोदर
तू माझ्या बरोबर
माझ्या तालात
फक्त–
सात पावलं चालावं ! !

— नरेश महाजन

## महाराणी

निळ्या निळ्या ढगाखाली
काळे नीळे जांभळे पाणी
पश्चिमेचा गार वारा
रातराणीची गातो गाणी
संध्याराणीचा गुलाबी रक्तिमा
हळुच कसा अंधारतो
क्षितिजाचा पडदा फाडून
तितर पक्षी केकाटतो.
आसमंती अंधारात
नक्षत्र सुमने तरंगतात
तलावातल्या लहरी लाटांवर
नाजूक अशी खिदळतात,
काजव्यांच्या चमचम प्रकाशात
रातकिड्यांची किरकिर मिसळते
आणि थंड प्रेतवत लाटांवर
ढगांची सावली भेडसाविते.
दूर डोंगरावरच्या खोपटांतून
बारकी चिमणी मिचकावते
काळाकुट्ट ह्या भयाणरात्री
शुक्रचांदणी महाराणी कशी मिरवीते

— खांडेपारकर

## टपोरा क्षण

टपोऱ्या क्षणी सांजवेळी
काजळलेल्या आकाशातून
काळोखाचा पाऊस पडला-
एक धागा तटकन तुटला
सारे धागे उकलीत गेला
पुसट फिकट पांढुरका प्रकाश
वाळवंटात उधळीत गेला
धूसर अस्पष्टाच्या वलयात
शरीर-कृती लुप्त झाल्या
लाखलाख वेदनातून
स्पर्श-चांदणे उधळित गेल्या
हिरव्या ओठांवर गुलाबकळींच्या
दोन पाकळ्या अलगद फुलल्या
थरथरणाऱ्या दोपर्णांच्या
पदराआड गुरफटल्या

— प्रकाश मेहता

## आस्वाद

एक तऱ्हेची साखळीची रचना हे लता मेहता यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. आणि या साच्याचा रचनेच्या चमत्कृतीसाठी स्वीकार केल्यामुळे त्यातली हळुवार भावनात्मकता त्या चमत्कृतीत हरवून गेली आहे. एका क्रियेतून दुसऱ्या क्रियेची सुरुवात होणारा हा एक रुपकाधिष्ठित अनुभव आहे. पण यातल्या रूपकाची कल्पना-रम्यता पुन्हा भावनेच्या हळुवारपणावर मात करणारी ठरली आहे. त्यामुळे ही कविता कलात्मकतेकडून कौशल्याकडे, कुसरीकडे झुकलेली आहे. 'मधाळपण

सुगंधली ', ' गुरफटताना रोमांचून', ' थेंबार्थेबांनी रक्ताळलं ' यासारखे शब्द नि कल्पना खूप लोभस वाटतात, पण शब्दचमत्कृतीचा पगडा अधिक झाल्यामुळे सुसंगत भाव चित्र तयार होत नाही.

' फक्त ' या कवितेत नरेश महाजन यांनी एक कल्पनेची चमत्कृती साधलेली आहे. एका प्रेमवेड्या प्रियकराचे हे निवेदन आहे. प्रेयसीचे हृदय हे त्याच्या लेखी एक रुमझुमणारे पैंजण आहे. फक्त त्याचा मंजूळ नाद स्वप्रीतीचा असावा अशी त्याची अपेक्षा आहे. मग त्या पदन्यासाच्या तालात जन्मोजन्मी चालत राहायला तो तयार आहे. पण फक्त त्या अगोदर आपल्या तालात तिने सप्तपदीची सात पावले टाकावीत अशी त्यांची अपेक्षा आहे. ' सात जन्म ' आणि ' सात पावले ' यांतील अर्थसमवायाची चमत्कृती हेच या कवितेचे सौंदर्य आहे. त्याचा प्रमुख भर एका शब्दावरच तोललेला आहे.

' महाराणी ' या कवितेत नेहमीच्याच निसर्गदृश्यातील अनुभवाचे स्वतःचे नाविन्य वामन गणाधीश शेणवी खांडेपारकर यांनी दाखविले आहे. त्यातले रंगांचे उल्लेख असामान्य नसले तरी जाणीवदर्शक आहेत. " क्षितिजाचा पडदा फाडून तितर पक्षी केकाटतो " यासारखा उल्लेख सबंध कवितेच्या आशयाला भक्कमपणे पेलून धरतो. वास्तवाचे निरीक्षण, निसर्गाशी संवाद आणि विशिष्ट भावनेचा अनुभव यांचा प्रत्यय अशा उल्लेखांतून येतो. आसमंती अंधारात तरंगणारी नक्षत्रसुमने आणि तलावातल्या लहरी लाटांवर त्यांचे खिदळणे हे दृश्य मात्र सबंध भावचित्रात नीटसे बसत नाही. थोडी विसंगती वाटते. ते कडवे नसते तर कविता अधिक परिणामकारक आणि एकसंध झाली असती.

' टपोरा क्षण ' ही प्रकाश मेहता यांची कविता मात्र संवेदनांतून अनुभवचित्र रेखाटण्याचा प्रयत्न करते. तिला उत्कट अर्थाचे खूप पदर लाभले आहेत, प्रारंभापासूनच कविता या अर्थपूर्णतेने भारून जाते. काजळलेले आकाश, काळोखाचा पाऊस वगैरे प्रतिमा ठराविक पद्धतीच्याच आहेत. पण ' वाळवंटात 'त प्रकाश उधळीत जाणे या कल्पनेने या संघटनेला एकदम स्वत्व आणि नवीनत्व प्राप्त झाले आहे. ' काळवंट ' हा शब्द ( जर तो ' वाळवंट ' या शब्दाचा चुकून झालेला लेखनदोष नसेल तर ) येथे फार फार चपखल आणि संवेदनाग्राही ठरला आहे. वाळवंट या शब्दाचा ध्वनिसाम्याने आणि अर्थछायेने त्याला या काळोख्या अनुभवात विशिष्ट आकार लाभला आहे. शेवटी शेवटी कविता थोडीशी स्पष्टरूपकात्मक झाली आहे.

—रसिक

तव्यावर टाकलेली भाकर टरटरून फुगून येते. फुगून आलेली भाकर पाहून तिला वाटत राहातं, खरंच उद्या आपल्याला शंभर रुपये येणार....समोर दिसतो धावता वारा....हालती पानं....वाहणारा वारा....गजबजलेला चौक....

**महावीर जोंधळे**

# ओपन चव्व्या झीरो क्लोज—

एक...दोन...तीन चार......पाच सहा...दहा...बारा......एक्क्यान्नव......सत्त्यान्नव...शंभर. ..

तिला पहाताच मटकेवाला म्हणू लागतो—

" क्या लालनबाई. घुमाव दुर्री. कितने लगाऊ ?..

" लाव बाबा कोणताबी– "

मुठभर चांदणं पसरलेलं असतं...सुस्त अजगरासारखं. रस्ता आळोखे देत रहातो. लाईटचा उभा पोल मख्खपणे उभाच असतो. चौकाचौकातून मटकावाल्यांची गर्दी उसळत रहाते...विद्यार्थी...कामगार......मजूर...शिक्षक......अधिकारी......दुसऱ्याकरवी....

एकमेकांना अनेकजण विचारीत राहातात. गुलाबकाका मटक्याचे बंद पाकीट हातात धरून धूर ओकीत असतो. लालन भाजीवाली कंबरेच्या पिशवीतून घामेजलेली दहाची नोट दोन बोटाच्या चिमटीनं बाहेर काढते. मटकेवाल्याच्या हातात देऊन गालाला तळ हात टेकून अनेक आकड्यांची चाहूल कान टवकारून घेत रहाते.

मळक्या शर्टाच्या खिशातून ब्लेड काढून मटकेवाला पेन्सीलीला टोक करीत विचारू लागतो.—

" क्या लालनबाई, क्या हिट है तुम्हारा. हिट बोलू सॉलिड होना.

" काय रे भाऊ. म्या भाजीवालीनं सॉलिड काय सांगायचं " मटकेवाला खदखदा हासतो.

" लालनबाई तू तर दसकी पत्ती निकाली. "

" होय रं बाबा. साऱ्या दुनियेचा

आकडा लागला पर माझा......
कपाळावर लिहिलेलं पाहिजे न्हवं...."

"हां येबी सच है...लेकीन...
ज्याने दो..., उठेगा आज नही तो कल. लालन- बाई! खुदा देने-वालेको छप्पर फाडके देता है...
बोल क्या लगावू.

"हे दहा कोणतेबी लाव. मगर उठला पाहिजे. माझा एकच हाय कुलकर्ण्याच्या पोरानं सांगितलेला."

"कोणसा" बताव.

"ओपन चौका अन् क्लोज झीरो. यावर भरवसा हाय माझा...
कागदावर भराभर आकड टिपून सही ठोकतो. लालन भाजीवालीच्या हातात चिठ्ठी देत म्हणतो.

"लालनबाई! कल सुबह सौ लेके जाना."

"तुमच्या तोंडात साखर पडो...
जाता जाता लालन त्याचं तोंड गोड करते."

लालन घरी येते. नवरा खाटेवर खोकत पडलेला असतो. आजू-बाजूला वाहणारं डबकं असतं. चंद्राच प्रतिबिंब न्याहाळण्यात लालनची पोरं रंगलेली असतात. चुलीला पेटू घालून हायब्रिडचं लालसर पीठ कुस्करते तवा ताप-लेला पाहून भाकर उलथली जाते. तव्यावर टाकलेली भाकर टरटरून फुगुन येते. फुगून आलेली भाकर पाहून तिला वाटत राहातं खरंच उद्या आपल्याला शंभर रुपये





येणार...समोर दिसतो धावता वारा.. हालती पानं...वाहणारा...खांब...गजबजलेला चौका...चौकाचौकातून लावला जाणारा आकडा...तऱ्हेतऱ्हेची माणसं... अन् त्यात मिसळून जाणारी लालन.. लाईटच्या तारावर बसलेले पक्षी मोजून आकडा लावणारा राम टोळके, आकडा लावायला बाहेर जाताना भरलेली घागर आडवी जावी म्हणून बराच वेळ दारात उभा रहाणारा तुका न्हावी....

लालनं भाजीवाल्या आडत्याकडून सकाळीच बोलणं खाल्लेलं असतं—

" लालन बाय ! उध्या समंदा पैसा पायजी. नही देगा तू खाता बंद....तिच्या समोर सतत दिसतात, ती चार पोरं...दम्यानं जर्जरलेला नवरा...ते घर... नाम्या...अनंत्या...सुमी....

चार भाकरी अन् वांग्याचं भरीत करून पोरांना अन् नवऱ्याला जेवू घालते. खाटाजवळ येऊन बसते. हिशोब चाललेला असतो. हळूच धाकटं पोरगं कागदावरचे आकडे पाहून विचारतं—

" आये ! ०४ हीट हाय म्हण. "

" तुला रं कोण म्हणलं "

" माझ्या वर्गातल्या दहाबारा जणानं तेच लावलं म्हणून म्हणतोय आपल्यालाबी नाय लावायचं. लावनाग. लई पैसा येईल....

पोराचे बोल ऐकून तिचा विश्वास अधिक दुणावतो. अन् पटकन् पोराचा मुका घेते.

" लेकरा उद्या आकडा लागला की तुला एक कुडतं. "

" अन् अनत्याला. "

" त्याला बी. "

" सुमिला. "

" तिला बी. "

" त्यांनलाबी. "

तिच्या डोळयात अश्रु उभे राहातात. सुकल्या गालावरून उरोजांवर वाहू लागतात. पापण्याची सावलीही तिला मदत करू लागते. औषधाची बाटली...कपडे... अनंत्याला...सुमिला...समंद्यांला....

खोकल्याची उबळ जोरानं आलेली असते. नवऱ्यानं पाणी मागितलं म्हणून लालन पाणी देते. ग्लासभर पाणी पिऊन ग्लास खाली ठेवतो. अन्... म्हणत रहातो—

" लालन मी कधा बरा होईल ग. खूप खूप काम करावं वाटतं— तुला...पोराबाळाला भरपूर.. पुन्हा खोकला उबळ...ग्लासभर पाणी...छातीवर हात... धडपड...

" व्हताल न्हव बरं...त्याचं काय एव्हढं.... "

" लालन– ऽऽ ...लालन...?...?...?... "

लालनच्या नवऱ्याच्या डोळ्यात अश्रु उभारले. वर आलेल्या गालाच्या हाडावरून ओघळत ओघळत ओघळले. न आवरणारा हुंदका लालन आवरता घेते. मस्त चांदणं हा खेळ पाहण्यास रंगलेलं असतं. रस्त्यावरून वाहणारा ताफा बोलत फुटत वहात असतो. शब्द फुट असतात. कानावर आदळत रहातात. लालन कान टवकारून ऐकत असते....

" चौकाच येणार."

" साला चौका नही आना. भ्यांचोद साला...मटकेवाला."

" यासीम, आज तो बारा आयगा बारा...."

" कौनसी स्कीमसे–"

" प्रोफेसर बनारसवालाके स्कीमसे."

" झुट. मी स्कीम नही निकलता. अक्कल लडाता साला मै."

" बताव कैसा आयेगा बारा."

" यह महिना ग्यारावाँ और पहिली तारीख. आकरा और एक कितना हुवा. हुवा ना बारा." त्यानं स्वतः बाराच लावलेला असतो.

लालन मात्र हा लावू का तो. त्यानं सांगितलेला खरा असेल का?... हळू हळू हळू सामसूम झालेली असते लालनला पुन्हा शंका निर्माण होते. रेशनसाठी ठेवलेले पांच रुपये घेते अन् भराभरा चौकात येते.

तिला पहाताच मटकेवाला म्हणू लागतो– 'क्या लालनबाई! घुमाव दुर्री. पांच रुपये फिरवून घरी येते. दहा वाजलेले असतात चिमणे केव्हाच झोपलेले असतात. लालनचा नवरा खोकतच असतो. तीही वाकळावर अंग टाकते. झोप येत नाही. मन म्हणत असतं...बारा तर येणार नाही?... एकपासून शंभरापर्यंत उजळणी तिच्या लक्षात येते....पण ओपन चौका अन् झिरोक्लोजवर तिचा विश्वास असतो....

तिच्या झोपडी समोरचा सायकलमार्टवाला रोज आपल्या दुकानाच्या दारावर रोज येणारा आकडा खडूनं लिहीत असतो. सकाळी येणारे जाणारे त्याच्या दारावर डोकावून जातात. कुणाला आनंद होत असतो. कोण शिव्याची लाखोली वाहतो.

" भ्यांचोद साला. मटकेवाला. साल्यानं पलटी मारी. कल देखता साला. शंभर नही उठावूंगा तो यासीन नही हुंगा....

लालन वाकडी वाट करून सायकल मार्टजवळ येते. सायकल मार्टवाला सकाळीच खडू भिजवून दारावर लिहीत असतानाच लालन येऊन धडकते. दारावर १२ आकडा पाहून ती एक शिवी हासडते––

" ह्याचं डोंबलं बसलं...मुडद्याला लेकरंबाळं हायती का नाहीत."

□ □ □

## घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलीची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



...चे दूध, सकस अन्न, कपडे, खेळणी पुस्तके व इतर अनेक लहानसान गोष्टी या सर्वांची निश्चित ... ...साठी करणारच. आणि हे सर्व सोपे नसले तरी कसेही करून तुम्ही ते पुरवाल. पण इतक्यातच ... ...ची जबाबदारी वाटली म्हणजे ! अशी वेळ येऊ न देणे हेच योग्य नाही काय !

... लक्षावधि जोडपी हेच करीत आहेत. ती परिस्थिति अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. ... तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे, पुरुषांनी वापरायचे ... साधन आहे. लक्षात ठेवा पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध ... यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत !

...हि मिळते- फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने)-




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा, सोपा आणि

# निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे. बिनधोक संतति-प्रतिबंधक!

केमिस्ट, ..., जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध

... 71/...

सुनील कर्णिक


# पुस्तके

## जपान जसा दिसला

आपल्याकडे परदेशप्रवास ही अजूनही अनेकांच्या बाबतीत एक अपूर्वाई असते, त्यांच्या जीवनातील ती अतिशय महत्त्वाची घटना ठरते. त्यामुळे प्रवास आटोपल्यानंतर या काळातील अनुभव, त्याबद्दलच्या प्रतिक्रिया सांगावेसे वाटणे साहजिकच असते. आपल्याकडे वर्षाकाठी जे एखादे प्रवासवर्णन प्रसिद्ध होत असते त्यामागे मुख्यत: हेच कारण असते. प्रस्तुतचे पुस्तकही त्याला अपवाद नाही. या पुस्तकाच्या लेखकाने-श्री. रवींद्र केळेकर यांनी-अतिशय उत्सुकपणे, एका आदरयुक्त कुतुहलाने जपानचा प्रवास सुरू केला आणि "भारताला परतल्याबरोबर जपानचा स्वयंनियुक्त प्रतिनिधी" बनण्याचे मनाशी ठरवीत तो पुरा केला. यातून निर्माण झालेल्या प्रवासवर्णनाने जपानच्या विविध अंगांची अतिशय आपुलकीने तोंडओळख करून दिली आहे.

प्रवासवर्णनांना वाचक मुळात कमी. ही पुस्तके वाचली जातात ती एकतर त्याचा लेखक अत्यंत लोकप्रिय ठरलेला असतो म्हणून, किंवा ज्या भागाचे वर्णन पुस्तकात आलेले असते त्यासंबंधी वाचकांना कुतुहल असते म्हणून. 'जपान जसा दिसला' हे यातल्या दुसऱ्या कारणासाठी वाचले जावे असे पुस्तक आहे. जपान-मधले जिवंत ज्वालामुखी, फुजियामासारखे पर्वत, कर्तबगार जपानी पुरुष, गेयशा, संबंध कर्तव्यदक्ष समाज, तत्त्वज्ञ, धार्मिक जन, जगात क्रांतिकारक म्हणून गणल्या गेलेल्या जपानच्या तीन क्रांत्या—यांची माहिती प्रसंगानुरोधाने लेखक देऊन जातो, त्यामुळे जपानसंबंधीचे वाचकांचे कुतुहल प्राथमिक स्वरूपात तरी शमविण्याचे कार्य हे प्रवासवर्णन पार पाडते.

लेखकाने प्रवासवर्णनात घेतलेल्या अनुभवांतील वेगळेपण, सौंदर्य, आश्चर्य-कारकता,— ही त्याच जिवंतपणे वाचकाला जाणवावी, हीच प्रवासवर्णनाकडून खरी अपेक्षा असते. अशा पुन:प्रत्ययामुळे प्रवासाचा आनंद वाचकाला घरबसल्या लुटता येतो. अर्थात् डायरीतल्या नोंदींच्या आधारे तयार केल्या जाणाऱ्या मजकुरात सहजस्फूर्त लिखाणातला टवटवीतपणा येणे कठीणच असते. आपल्याकडची बरीच प्रवासवर्णने याच कारणाने कंटाळवाणी ठरतात. सुदैवाने श्री. केळेकरांचे लिखाण



नवे प्रकाशन
संध्याकाळ

गजानन जागीरदार
यांच्या
चाळीस वर्षांच्या
चित्रजीवनाची
वाटचाल

**संध्याकाळ**

किंमत : दहा रुपये


राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०

मात्र कंटाळवाणे झालेले नाही. एखाद्या सराईत लेखकाच्या सहजतेने त्यांनी भाषेचा वापर केला आहे. त्यांचे अकृत्रिम निसर्गप्रेम आणि त्यांच्यातील समाजसेवक ही त्यातून चांगल्या प्रकारे स्पष्ट होतात. भावाविष्काराच्या बाबतीत मात्र ते कमी पडतात. त्यामुळे जोवर वर्णन, स्पष्टीकरण, चर्चा इ. चालू असते तोवर ठीक वाटते, पण ज्या ठिकाणी मनातील उत्कट भाव प्रकट व्हावेत अशी अपेक्षा असते त्या ठिकाणी "ढगांनी हा लपंडाव गोगोयेनपर्यंत चालविला. त्यामुळे दर्शनानंदात वृद्धीच झाली." असे कोरडे वर्णन येते. इथे पुनःप्रत्ययाचा आनंद लाभत नाहीच, उलट वर्णन रसहीन वाटते. अर्थात् ही उणीव फारशी जाणवत नाही याचे कारण जपानची अनेक वैशिष्ट्ये, अनोख्या आख्यायिका एकामागोमाग एक अशा येत राहातात की वाचक त्यांच्यात गुंतून राहातो.

जपान, इंग्लंड यासारख्या देशांची प्रवासवर्णने वाचताना त्यांची आपल्या देशाशी तुलना जवळजवळ सगळ्याच लेखकांनी केलेली आढळते. इथे तर एका समाज-सेवकानेच प्रवासवर्णन लिहिले आहे, त्यामुळे जपानचे निरीक्षण करताना त्याला आपल्या देशाचे स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. "जपानकडून काय काय शिकण्यासारखे आहे याचा विचार त्यांनी सतत केलेला आहे. 'जपान' वर लिहिल्या गेलेल्या अनेक पुस्तकांमध्ये 'जपान जसा दिसला' हे निश्चितपणे वेगळे उठून दिसेल ते याच वैशिष्ट्यामुळे." असे या पुस्तकाच्या ब्लर्बमध्ये म्हटले आहे. या पुस्तकाचे हे वैशिष्ट्य त्याच्या मुळच्या विशेषाशी–प्रवासवर्णनाशी–एकरूप मात्र झालेले नाही. सुरुवातीच्या भागात तुलना जागोजागी आढळते, नंतर शेवटपर्यंत जवळजवळ नाहीच. शेवटच्या प्रकरणात पुन्हा आठवण झाल्यासारखे हे 'वैशिष्ट्य' अनेक प्रकारे प्रकट केले आहे.

कसेही असो, पुस्तक वाचून पुरे केल्यानंतर वाचलेल्या अनेक गोष्टी आठवत राहातात, हे निश्चितपणे लेखकाच्या यशाचे द्योतक आहे. लेखकाच्या आणि जपानच्याही ! ◻

**जपान जसा दिसला** : रवींद्र केळेकर : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे : मूल्य सहा रुपये.





# नूर परकार

मराठीवर आषक असलेला
एक उर्दू लेखक.
तूर्त मुक्काम कुवेत.

**केशव मेश्राम**

**श्री.** नूर परकार सध्या कुवेत येथे आहेत. 'पर्शियन' भाषेतून डॉक्टरेट मिळविल्यानंतर ते लंडन येथे स्थायिक होणार आहेत. अद्याप वयाची तिशी न गाठलेल्या तरुण उर्दू लेखकाने मराठी भाषेची भाषांतराच्या माध्यमातून जी सेवा केली. भाषांतराच्या निमित्ताने तो इतक्या लोकांना भेटला, इतका वणवणला, स्वतः एक समर्थ लेखक असूनही मराठी लेखकांच्या लहरीपणाचा व 'मूडस्' चा दणका त्याने एखाद्या निष्ठावंत शिष्याप्रमाणे सहन केला त्याचा हा धावता परिचय.

श्री. नूर परकार निसर्गसंपन्न कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट गावी १ जून १९४२ रोजी जन्मले. त्यांचे प्राथमिक शिक्षण बाणकोट येथे झाले. दापोलीच्या नॅशनल हायस्कूलमधून ते एस. एस. सी. झाले. बी. ए. ची आणि एम. ए. ची पदवी पर्शियन व उर्दू हे विषय घेऊन त्यांनी इस्माईल युसूफ कॉलेजचे विद्यार्थी म्हणून मिळवली. 'स्टेट बँक ऑफ इंडिया' मध्ये ते 'ग्रंथपाळ' म्हणून होते. अनेक मराठी ग्रंथांशी लहानपणापासून परिचय होता. मातृभाषे इतक्याच निष्ठेने मराठी भाषा जोपासली गेली होती.

श्री. परकार दोन वर्षांचे असतांना त्यांची आई दिवंगत झाली. वडील, पत्नीच्या दुःखात इतके चूर होते की नूर असाच इतरांच्या अंगाखांद्यावर वाढला. आई-वडिलांचे प्रेम नाही. घर माणसांनी भरलेले. कोणाला कोणाकडे लक्षपूर्वक बघायला वेळ नाही, एवढे मोठे. अशा विचित्र गोंधळात नूर पुस्तकात गुरफटत गेला. ह्या

अबोल नातवाचे सगळे शांतपणे ऐकून घेणारी आजी तेवढी होती. नूर इन्टरला असतानाच ते पिकले पान गळून पडले आणि एक कोवळा कोंब नूरच्या मनात निर्माण झाला. आजीच्या मृत्यूच्या एकाकी जाणीवेतून लिहिल्या गेलेल्या लेखनाने 'नूर' लेखक झाला. वैयक्तिक व्यथेचा हा स्वर 'कथा' म्हणून कॉलेजच्या वार्षिकात ('Palm' मध्ये) शब्दबद्ध झाला.

आणि मग झपाटल्यासारखे नूर लिहित गेला. कॉलेजमध्ये असतानाच त्याने लिहिलेल्या तीन एकांकिका प्रयोगक्षम ठरल्या. विषय आणि हाताळणीमुळे नूर सर्वपरिचित झाला. एकांकिकांचे पुस्तकही निघाले. भारतातील आणि पाकिस्तानातील लोकप्रिय आणि दर्जेदार मासिकांत 'नूर' च्या कथा सातत्याने येऊ लागल्या. बी. ए ची पदवी परीक्षा देण्याच्या आधीच लेखक आणि 'जोशिला' 'तरक्कीपसंद'— पुरोगामी लेखक ही उपाधी 'नूर' ला प्राप्त झाली. आणि बी. ए. ची पदवी व पहिला स्वतंत्र कथासंग्रह 'रुपये की मौत' एकदमच पदरात पडला.

मासिकातील इतर कथा व अनुवादित लेखनाकडे 'नूर' बारकाईने पाहू लागला. अनुवादाचे हे क्षेत्र त्याला आव्हान देणारे वाटले आणि प्रा. ना. सी. फडके यांच्या एका कथेचा त्यांनी उर्दूत अनुवाद केला आणि तो नमुना संपादक रसिकांना इतका आवडला की, त्यांना अनेकांकडून 'मराठीतील नवेजुने साहित्य आम्हाला अनुवादून पाठवा,' अशी आग्रहाची मागणी सुरू झाली. मराठीतील अभिजात साहित्य उर्दू भाषिक वाचकांना आवडलेच पाहिजे अशा जिद्दीने नूर कामाला लागले. मराठी लेखक विशेषत: कवी आणि कथाकार काय लिहितात, त्यांच्या लिखाणाचा कल कसा आहे हे जाणून घेण्यासाठी नूर वेगवेगळ्या लोकांना भेटू लागले आणि याच त्यांच्या शोधात पाच वर्षांपूर्वी 'नूर' श्री. नारायण सुर्वे, प्रा. रा. भि. जोशी आणि माझ्या स्नेह्यात दाखल झाले. आठवड्यातून एकदा चार-चार तास, कधी त्यांच्याकडे बोरीवली किंवा माहीम मुक्कामी, कधी माझ्या घरी, कधी नारायण सुर्व्यांकडे, केव्हा वाचनालयात, कधी हॉटेलात तर कधी सार्वजनिक बागेत चर्चा झडू लागल्या. रात्री अपरात्री हा कथावेडा तरुण मूळ कथा आणि भाषांतर घेऊन भेटू लागला. ऐकवू लागला. माझे स्वत:चे उर्दूचे ज्ञान बेताचे पण नारायण सुर्वे, मतदाते आणि मी श्रोता अशी ही तिघांची मैफल.

'लखनौ' येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'किताब' ह्या वाङ्मयीन मासिकाचा एक संपूर्ण अंक 'मराठी कथा विशेषांक' काढायचा असे धाडस 'किताब'चे संपादक 'आबिद सुरेल' यांनी करायचे ठरविले. संयोजक व अनुवादक नूर परकार. जन १९६८ चा अंक निश्चित ठरला. 'किताब' च्या सल्लागार मंडळात आबिद सुहेल, सय्यद एहतेशाम हुसेन व ह्यतुल्ला अन्सारी हे नामवंत टीकाकार आहेत. त्यांनी ही योजना उचलून पूर्णत्वास नेली ही गौरवास्पद गोष्ट आहे.

'मराठी कथा विशेषांकाला' पूर्णत्व यावे म्हणून डॉ. अबदुस्सत्तार दळवी यांनी

महानुभावांपासून तो आजपर्यंतचा एक स्थूल आढावा घेणारा लेख लिहिला. 'मराठीचे बदलते वाङमयीन प्रवाह' हा लेख मी लिहिला. (मराठी-भाषांतर नूर परकारांचे) प्रदीप नेरुरकर यांनी 'मराठी कथा' आणि 'मराठी नाटकाची रूपे' हा लेख कु. विजया साळवी यांनी लिहिला. म्हणजे य. गो. जोशी, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर, विजय तेंडूलकर, जी. ए. कुलकर्णी, विजया राजाध्यक्ष, बाबुराव बागूल, हमीद दलवाई, चिं. त्र्यं. खानोलकर, शिरीष पै, मधुमंगेश कर्णिक, वामन चोरघडे, आशा भाजेकर, वसुंधरा पटवर्धन आणि वामन प्रभू अशा १८।२० लेखकांच्या कथा आणि लेख यांचे अनुवाद एकट्या माणसाने सातत्याने करणे हे काम जिकीरीचे होते. पण नूरनी ते केले आणि पार पाडले. आपल्या कामात त्रुटि आहे याची जाणीव नूरला होती. इतकेच नव्हे तर लिपीकार (कातिब) लखनौत आणि अनुवादक मुंबईत यामुळे काही हास्यास्पद प्रकारही घडले, पण म्हणून 'नूर' च्या जिद्दीचे आणि कामाचे महत्त्व डागाळत नाही.

त्याचप्रमाणे मराठीतील एक वेगवान कथालेखक व कादंबरीकार श्री. वसंत देशमुख यांच्या 'स्त्रीचित्रे' या पुस्तकातील कथा व इतर कथांचाही श्री. परकार यांनी अनुवाद केला. एका लेखकाने स्वतंत्र लेखनाची उर्मी बाजूला ठेवून दुसरा लेखक असा अनुवादून त्या भाषेत सादर करणे ही सामान्य बाब नाही. हेही पुस्तक त्यांनी १९६८ सालीच प्रकाशित केले हे लक्षात घेतले म्हणजे नूरच्या कामाच्या झपाट्याची कल्पना येते.

सत्यकथेच्या आक्टो- १९६९ च्या अंकात उर्दूचे एक अभ्यासक व ललितलेखक प्रा. रा. भि. जोशी यांनी नूर परकार यांनी केलेल्या या कामगिरीचा 'तीन उर्दू कथासंग्रह' या शीर्षकाखाली परामर्श घेतला आहे. त्यात त्यांनी भाषांतरकार व त्याची जबाबदारी यावर काही मौलिक विचार मांडले आहेत. त्यांच्या स्वतंत्र लेखनाचेही श्री. रा. भि. जोशी यांनी परखड परिक्षण केले आहे भाषांतराबद्दल ते लिहितात—

"नूर परकार यांच्या स्वतंत्र लेखनकार्याचे जे महत्त्व आहे त्यापेक्षा त्यांच्या भाषांतराच्या कामाचे वेगळे महत्त्व आहे. एका भाषेतल्या साहित्याचे दुसऱ्या भाषेत भाषांतर करणे हे एका संस्कृतीचा—साहित्याचा दुसऱ्या संस्कृतीशी साहित्याशी परिचय करून देण्याचे, त्या दोहोत दुवा सांधण्याचे कार्य आहे." हे मान्यच करावे लागेल. उर्दू आणि मराठी लेखकांनी एकत्र यावे, परस्परांना समजून घ्यावे अशी नूर परकारची इच्छा आहे. दि.२१-५-७१ च्या कुवेतहून पाठविलेल्या पत्रात तो मला लिहितो—

जेव्हा उर्दू सिलेबसमध्ये मराठीच्या अनुवादित कथा व लेख शिकविले जातील व मराठी 'सिलेबस'मध्ये उर्दूमधल्या लेखकांची कथा, लेख व टीका शिकविली जाईल तेव्हा मी खरा आनंदी होईन."

कथेखेरिज नारायण सुर्वे, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, केशव मेश्राम, ना. धों. महानोर, आरती प्रभू, प. शि. रेगे आणि ग्रेस यांच्या कवितांचेही नूर परकारने भाषांतर करून प्रसिद्ध केले आहेत.

एकांकिका हा देखील त्याच्या आवडीचा वाङ्मयप्रकार आहे. ना. सी फडके, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, प. गं. सुर्वे, वसुधा पाटील आणि रत्नाकर मतकरी यांच्याही एकांकिका अनुवादून उर्दूत प्रसिद्ध केल्या आहेत. लखनौहून प्रसिद्ध होणारे ' किताब, ' मुंबईतील ' शायर, ' व ' दोरेह्यात ' आणि ' आयना ', अलाहाबादचे ' शबसून ' आणि भोपाळहून निघणारे ' मिझाज ' या अंकातून हे साहित्य आले आहे.

सध्या कुवेत येथे असूनही त्यांची अनुवादाची उर्मी ओसरलेली नाही. दि. २४-१०-७१ च्या पत्रात त्यांनी प्रा. शांता शेळके व नारायण सुर्वे यांच्या नव्या कविता अनुवादार्थ पाठविण्यासाठी लिहिले आहे. त्यांचे स्वतःचे स्वतंत्र लेखनही जोमात आहे. ' अगले वक्तो के दुख ' ही नवी कादंबरी प्रसिद्धीच्या मार्गावर आहे.

अशा विशिष्ट वाङ्मयप्रेमाने भारलेले आणखी काही जिद्दी लोक जर वाङ्मयाला लाभतील तर परस्परांना समजून घेणे अधिक सोपे होईल.

❀

---

## परशुरामाची सावली

पृष्ठ २२ वरून

पात्रता सिद्ध केली आहे. विरोधकांनी मामांच्या सत्कृत्याला मदत केली नाही, तरी उगाच आपले हसे करून घेण्याचे धोरण सोडलेले आहे. पण तरीही ते जागरूक आहेत. शिवजयंतीला मामांच्या घरावर पहारे बसवायला शासन विसरत नाही. मागे एकदा कोळथरला शांतता कमिटी स्थापन करण्याचा शासनाने फार्स केला. मामांनी जाहीरपणे ठणकावून सांगितले, ' जो पर्यंत आमचे हात बळकट आहेत तोपर्यंत कुरापत काढण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही.'

असे हे मामा ! कोकणच्या धरणीतून आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या माडासारखेच उंच. त्यांचे कर्तृत्व म्हणजे एक चमत्कारच असे. म्हणतात ते खोटे नाही. ' कोकणची धरणी नि नारळात पाणी !' मामांनी बोर्डिंगची भव्य वास्तू बांधण्याचा संकल्प केला आहे. प्रामाणिकपणे समाजाची सेवा करणाराला आर्थिक पाठबळ उभे करायला वेळ लागला तरी हे प्रयत्न वांझोटे ठरत नाहीत. हा महाराष्ट्राचा इतिहास आहे आणि आपल्या मामांची श्रद्धाही तीच आहे.

□ □ □




## दुसऱ्या महायुद्धातील एक नाट्यपूर्ण सत्यकथा

निवेदक– अनंत भावे

पॅरीसकडे जाणाऱ्या प्रशस्त रस्त्यावरून एक हिरवट रगाचा मोटार चालली होती. मागच्या बाजूला एक वरिष्ठ अधिकारी काही कागदपत्रे चाळत, प्रसंगी त्यांच्या उजव्या कोपऱ्यात काही शेरे वा खुणा करत बसला होता. चाळीस मैलांच्या वेगाने जाणारी ही मोटार पॅरीसकडे न जाता डाव्या बाजूला व्हर्सायकडे जाण्यासाठी वळली. अचानक रस्त्याशेजारच्या झाडोऱ्यामधून एक मोटार सुरू झाली. या मोटारीच्या बाहेरदेखील माणसे लटकत होती. ही मोटार रस्त्यावर घुसली. मोटारीबाहेर लटकणाऱ्या लोकांनी हिरवट गाडीवर अचूक हातबाँब टाकले. काही क्षणातच प्रचंड स्फोट झाले. हिरवट गाडी झिगत पुढे जाऊन कलंडली. तिच्यातून दाट काळचा धुराचे लोट उसळले.

थोडचा वेळातच लष्करी पोलीस येऊन दाखल झाले. परंतु त्यांनादेखील जळणाऱ्या मोटारीजवळ जाणे अशक्य झाले. एव्हाना मोटार भस्मीभूत झाली होती.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस युद्धाचे पारडे फिरवण्याच्या आशेने हिटलरने दोस्तांचे सरसेनापती आयसेन हॉवरची हत्या करून दोस्तांच्या मनोधैर्यावर आघात करण्याचे कारस्थान रचले. या कामगिरीवर स्कोर्झनी नावाच्या हिंमतबहाद्दर अधिकाऱ्याची योजना केली. स्कोर्झनीला यश आलेही असते. पण........पण आयसेनहॉवरच्या एका हृद्य स्वभावदोषामुळे ते आले नाही. या कारस्थानातील उद्दिष्ट, त्यासाठी करण्यात आलेली प्रचंड तयारी, दोस्त सेनेवर त्याचा झालेला परिणाम आणि एका स्वाभाविक गोष्टीमुळे आयसेनहॉवरची झालेली सुटका, यामुळे ही कथा मोठी नाट्यपूर्ण झाली आहे. स्टॅन्ले वेस्टन यांनी सांगितलेल्या या कथेचा हा मराठी अनुवाद...

---

जळणाऱ्या रबराचा आणि माणसाच्या मांसाचा चमत्कारिक दर्प सर्वत्र पसरला होता.

इतक्यात आणखी एक मोटार त्याच रस्त्याने आली. मोटारीच्या कपाळावर 'वार्ताहर' अशी पाटी होती. मोटार थांबली. एक माणूस तिच्यातून खाली उतरला. समोरच्या दृश्याकडे त्याने क्षणभर पाहिले. मग दोन हातांनी आपले डोके घट्ट पकडत तो ओरडला, 'अरे बापरे! ती तर आईकची मोटार. म्हणजे त्यांनी आईकलाच ठार मारले की काय?'

तोपर्यंत हातबाँब फेकणारी मोटार कितीतरी दूर गेली होती. रस्ते अडविण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला यश आले नव्हते. १९४४ सालच्या डिसेंबर महिन्यातील तेरा तारीख होती ती. त्याच दिवशी सकाळी, जरा उशीरा, आर्देनेज जंगलाच्या सीमेनजीकच्या अमेरिकन पेट्रोल-पुरवठा केंद्रापाशी एक मोटार उभी राहिली.

'पेट्रोल भरता का कृपा करून?' मोटार चालकाने विचारले.

पंपावरच्या माणसाने पेट्रोल भरण्यापूर्वी मोटारीतील त्या धटिंगणाकडे पाहिले, आणि विचारले, 'आलात तरी कुठून तुम्ही? आणि तुमची तुकडी तरी कोणती?' प्रश्न विचारतानाच त्याने जवळ उभ्या असलेल्या दोन लष्करी पोलीसांना खुणावले होते.

मोटारचालकाने कसलेही उत्तर दिले नाही. लष्करी पोलीस जवळ येईपर्यंतही तो थांबला नाही. त्याने मोटार चालू केली आणि तिने वेगदेखील घेतला. परंतु

काही सेकंदातच, रस्त्यावर, त्या मोटारीची, समोरून येणाऱ्या लष्करी गाडीशी टक्कर झाली. ती मोटार वीस फूट दूर फेकली गेली. तिच्यातून ज्वाला उसळल्या. आवाज ऐकून तेथे आलेल्या लोकांनी आणि त्या लष्करी गाडीतील सैनिकांनी पुढे होऊन मोटारीतील प्रेते बाहेर काढली.

एकटा मोटारचालक तेवढा जिवंत होता. तो धडपडत कसाबसा उभा राहिला. त्याच्या कपाळाला खोल जखम झाली होती. तिच्यातून रक्त ठिबकत होते. त्याला रुग्णवाहिकेकडे नेत असतानाच पेट्रोलपुरवठा केंद्रावरचे लष्करी पोलीस तेथे आले. त्यांच्याबरोबर पेट्रोल पुरविणारा नोकर होताच.

'ते सगळे जर्मन आहेत साहेब.' तो ओरडला. लष्करी गाडीतील अधिकारी आश्चर्याने त्याच्याकडे पाहात राहिला. मग त्याने विचारले, 'तुला काय ठाऊक ते जर्मन आहेत म्हणून?'

'त्यांनी 'पेट्रोल' मागितलं तेव्हाच ओळखलं मी. शिवाय ते गधडे 'कृपा करून' असेही म्हणाले. अमेरिकन्स 'गॅस' म्हणतात; 'पेट्रोल' नाही. आणि 'कृपा करून'च्याऐवजी ते काय म्हणतात ते आपल्याला ठाऊकच आहे साहेब.'

तो तरुण लष्करी अधिकारी विचार करत होता. मोटारचालकाच्या अंगात भलेमोठे जाकीट होते. जाकीटावर त्याने आपले हात दाबून ठेवले होते. जखमेतून ठिबकणाऱ्या आणि अगदी डोळ्यावर ओघळणाऱ्या रक्ताची त्याला फारशी पर्वा वाटत नव्हती. एक लष्करी पोलीस पुढे झाला. त्याने मोटारचालकाचे हात झिंजाडले आणि जाकीट खोलले. आत जर्मन पायदळ सैनिकाचा गणवेष होता!

थोड्याच वेळात मोटारचालकाच्या उलटतपासणीला सुरुवात झाली. गुप्तहेर-खात्याचा एक अधिकारी कॅप्टन मॅक्सवेल फ्रीड ही उलट तपासणी घेत होता.

फ्रीडने त्याला सिगारेट दिली. आणि त्यानेही संकोचत ती घेतली.

'नाव काय तुझं?' फ्रीडने विचारले.

मोटारचालकाने ओठ चावला. एका पायावरचा भार बदलून दुसऱ्या पायावर टाकला. फ्रीडच्या प्रश्नाला उत्तर मात्र त्याने दिले नाही. थोड्या वेळाने त्याच्यावर बोट रोखत फ्रीड ओरडला, 'इंग्रजी येतंय् तुला, होय ना? मग बोल तर झटपट. काय, नाव काय तुझं?'

उत्तर लगेच आले नाही. मात्र थोड्या वेळाने तो पुटपुटला, 'फ्रांझ केसलर.'

लगोलग फ्रीडने त्याला विचारले, 'कोणत्या तुकडीत आहेस तू?' अकस्मात त्याचा चेहरा बदलून गेला. त्याच्या हातांची थरथर थांबली. आता तो ताठ उभा राहिला. अभिमानाने त्याची मान उन्नत झाली होती. फ्रीडच्या डोळ्यांकडे त्याने एकवार टक लावून पाहिले. आणि तो उद्‍गारला, 'प्रथम विभाग. स्कोर्झेनीची प्रायफेट तुकडी.'

या उद्‍गारांचा अर्थ फ्रीडला चांगला समजत होता. त्याने ताबडतोब वरिष्ठ

अधिकाऱ्याला टेलिफोन करून, स्कोर्झेनीच्या स्वयंसेवकांनी येथे धाड घातली होती, त्यातील एक सोडून सगळे मेले आहेत; त्या एकाची उलटतपासणी आपण घेत आहोत, ही सारी माहिती सांगितली. वरिष्ठ अधिकाऱ्याने फक्त एकच आदेश दिला, ' स्कोर्झेनी कुठे आहे ते शोधून काढा. '

फ्रीडने आपल्या कैद्याला तो प्रश्न विचारला. ' यावेळी स्कोर्झेनी कुठे आहे ?'

' मला ठाऊक नाही. '

या ठिकाणी कशासाठी आला होता तुम्ही. ' फ्रीडने विचारले. फ्रीड पुढे म्हणाला, ' उत्तर देण्यापूर्वी एका गोष्टीचा विचार कर तू. आम्ही तुला पकडलं तेव्हा अमेरिकन गणवेश अंगावर होता तुझ्या. म्हणजे हेरच होतास तू. त्याला देहान्ताची शिक्षा आहे. पण तू जर आमच्याशी सहकार्य करशील तर खास सवलतीसाठी शिफारस करीन मी तुझी. '

कैद्याने क्षणाचाही विलंब न लावता छाती पुढे काढली आणि तो बेगुमानपणे म्हणाला, ' आम्ही आलो होतो तुमच्या आयसेनहॉवरचा खातमा करायला. '

त्याच्या स्पष्टोक्तीने फ्रीडला आश्चर्य वाटले नाही. कारण आज कित्येक आठवडे अमेरिकन गुप्त हेरखाते या कटासंबंधी माहिती गोळा करत होते. दोस्तांच्या नितिधैर्यावर प्रचंड आघात करण्यासाठी आयसेन हॉवरलाच ठार करण्याची कल्पना हिटलरच्या डोक्यातून निघाली होती. ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याने ऑटो स्कोर्झेनी या धूर्त आणि धाडसी अधिकाऱ्याची योजना केली होती.

कैद्याकडून स्कोर्झेनीचा ठिकाणा माहीत करून घेण्यासाठी फ्रीडने सहा तास प्रयत्न चालविले होते. परंतु कैद्याने त्यासंबंधी कसलीही माहिती दिली नाही. दुसऱ्या दिवशी केसलरला गोळ्या घालून ठार मारण्यात आले.

पण तोपर्यंत शेकडो कडवे जर्मन स्वयंसेवक दोस्तव्याप्त प्रदेशात हिकमतीने शिरले होते. दोस्तसैन्याच्या विविध विभागांचे योग्य ते गणवेष त्यांच्या अंगावर होते. अमेरिकन सेनेविरुद्ध करण्यात आलेले हे सर्वांत मोठे गुप्त कारस्थान होते. सर्व बाजूंनी येणाऱ्या या स्वयंसेवकांचा रोख एका ठिकाणावर होता. ते ठिकाण म्हणजे व्हर्साय येथील दोस्तांचे सर्वोच्च कार्यालय. या ठिकाणी असलेल्या ड्वाइट डी. आयसेनहॉवर या सरसेनापतीची हत्या त्यांना करायची होती.

कल्पना अगदी वेडगळ वाटावी इतकी विलक्षण होती; परंतु ऑटो स्कोर्झेनीच्या संबंधामुळे तिची गंभीर दखल घेणे जरुरीचे झाले होते. कारण स्कोर्झेनीने यापूर्वी अशक्य ते शक्य करून दाखविले होते. इटलीचा एक सेनानी पिएट्रो बादोग्लिओ एकदा म्हणाला होता, ' स्कोर्झेनीला सैन्याची एक तुकडी द्या. त्यांना शिक्षण देण्यासाठी सहा महिने आणि योजना आखण्यासाठी तीन महिने त्याला द्या; आणि बाकी कसल्याही मदतीशिवाय स्कोर्झेनी नक्की ब्रिटन काबीज करील. '

## हिटलरच्या गुहेकडे

आईकला ठार मारणाऱ्या या योजनेला 'ग्राईफ' असे नाव होते. इतर अनेक नाझी योजना ज्या पूर्व प्रशियामधील ॲडॉल्फ हिटलरच्या विख्यात गुहेत शिजल्या होत्या तेथेच ही योजनादेखील शिजली होती.

वीस ऑक्टोबर १९४४ रोजी, सकाळी स्कोर्झेनी बर्लिनमधील एका अलिशान विश्रांतिगृहात सुखाने झोपला होता. तीन दिवसाची रजा त्याला मिळाली होती. आदल्या रात्री नाचगाणे जरा जास्तच झाल्यामुळे त्याला गाढ झोप लागली होती. सकाळी दहा वाजता फोन वाजला. कुरकुरतच स्कोर्झेनीने फोन उचलला. फोन होता हिटलरचा. हिटलरने स्कोर्झेनीला ताबडतोब आपल्या गुहेत बोलविले होते.

स्कोर्झेनीने त्वरेने कपडे चढविले आणि रस्त्यावर त्याच्यासाठी खड्या असलेल्या मोटारीत बसून टेंपलहॉफ विमानतळाकडे प्रयाण केले. अवघ्या आठ मिनिटात तो विमानतळावर पोचला. विमान अगदी उडण्याच्या तयारीत ठेवले होते. स्कोर्झेनी विमानात चढला, आणि अल्पावधीतच विमानाने उड्डाण केले. हे विमान खास बनावटीचे होते; आणि त्यातून बडी मंडळी ये-जा करत असत. रोमेल, फॉन, रुंडस्टेड, जोड आणि केसरलिंग यांनी टेंपलहॉफ पासून हिटलरच्या गुहेपर्यंतचा प्रवास, याच विमानाने, कितीतरी वेळा केला होता.

विमानात स्कोर्झेनी एकटाच होता. सहा फूट चार इंच उंच आणि दोनशे वीस पौंड वजनाचा स्कोर्झेनी जास्तीतजास्त आरामाने बसला होता. त्याच्या पुढ्यात मद्याचा प्याला होता. मद्य पितापिता तो बाहेर पाहात होता. लहानमोठे डोंगर आणि सपाट प्रदेश भराभरा मागे पडत विमान आता रास्टेनबर्ग या शहरावर आले. रास्टेनबर्ग सकाळच्या त्या कोवळ्या उन्हात परीकथेतील एखाद्या अद्‌भुत ठिकाणासारखे दिसत होते. काही क्षणांतच, अत्यंत सख्त पहाऱ्याखाली असलेल्या छोट्याशा विमानतळावर विमान उतरले.

स्कोर्झेनी विमानातून उतरला. दुसरी एक देखणी मोटार त्याच्यासाठी उभी होती. मोटारीला, गोळीबाराला न जुमानणाऱ्या काचा होत्या. मोटारीची चाकेदेखील विशेष भक्कम होती. मोटारीत एक रेडियोदेखील होता. नागमोडी आणि अरुंद वाटेवरून मोटार वेगाने पुढे निघाली. वाटेच्या दोन्ही बाजूंना घनदाट जंगल होते. प्रत्येक शंभर पावलांवर विमानवेधी तोफा आकाशाकडे नजर लावून होत्या. पहारेकरीदेखील सर्वत्र दिसत होते. मोटारीच्या मागच्या भागी बसलेल्या स्कोर्झेनीकडे वाटेवरील पहारेकरी कुतूहलाने पाहात होते. काहींनी त्याला ओळखले आणि आदराने सलाम ठोकला.

हिटलरची ही गुहा एका घनदाट अरण्याच्या मध्यभागी होती. गुहा म्हणजे अनेक बैठ्या, भक्कम इमारतींचा समुदाय होता. विमानातून या इमारती दिसणार नाहीत याची कसोशीने काळजी घेतली होती. या सर्व प्रदेशाभोवती अत्यंत मजबूत

तारेचे कुंपण होते. कुंपणामधून वीजेचा प्रवाह खेळविला होता. ओळख पटविल्या-शिवाय कोणालाही प्रवेश दिला जात नसे. शिवाय पहारेकरी बरोबर येतील ते वेगळेच. ते सारे उपचार पार पडून स्कोर्झेनी हिटलरच्या बोलवण्याची वाट पाहात एका खोलीत बसला.

अनेक वर्षांनी या प्रसंगाबद्दल बोलताना स्कोर्झेनी म्हणाला "हिटलरची गुहा हे एक विलक्षण ठिकाण होते. साऱ्या प्रश्नांना तेथे जीवन-मरणाचे स्वरूप येत असे. या भेटीच्या वेळी, पुढे काय घडणार आहे याचा विचार करणेच मी सोडून दिले. कारण विचार करायला लागल्यावर बेदरकार माणसालादेखील भलभलत्या कल्पना सुचून जीव थोडा व्हायचा त्याचा. तरीदेखील, आम्ही दोघांनीच ठरवावे असे कोणते आत्यंतिक गुप्त काम हिटलरने काढले आहे ? का योजकांनी ठरवि-लेली एखादी खास योजना हिटलर स्वतः माझ्यावर सोपविणार आहे ? या दोन पर्यायांवर माझे मन रेंगाळत होते."

स्कोर्झेनीने आपल्या घड्याळात पाहिले. हे घड्याळ त्याला मुसोलिनीने भेट दिले होते. १९४३ साली सुडाने पेटलेल्या इटालियन लोकांच्या तावडीतून मोठ्या शर्थीने सोडवल्याबद्दलच्या मुसोलिनीच्या कृतज्ञतेचे प्रतीक होते ते. समुद्रसपाटी-पासून सहा हजार फूट उंचीवर असलेल्या ग्रानसासो शिखरावरील एका मजबूत किल्ल्यात मुसोलिनी बंदिवान होता. पांचशे झुजार पहारेकरी त्या किल्ल्यात होते. काही ग्लायडर्स आणि आपले अवघे पन्नास सहकारी यांच्या साहाय्याने स्कोर्झेनीने त्या किल्ल्यातून मुसोलिनीला पळविले होते, आणि सुखरूपपणे अॅडॉल्फ हिटलरच्या स्वाधीन केले होते. या विलक्षण धाडसी कृत्यामुळे स्कोर्झेनीला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी लाभली होती. पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिटलरची त्याच्यावर मर्जी बसली होती.

आता या दुसऱ्या कामगिरीची वाट पाहाताना उत्कंठतेने ऑटो स्कोर्झेनी पार अस्वस्थ झाला होता.

असा थोडा वेळ गेला. मग एका पहारेकऱ्याने निघण्याची सूचना त्याला दिली त्याच्याबरोबर स्कोर्झेनी गुहेच्या मुखाशी जाऊन पोचला. तेथे सहा दांडगे गुप्त पोलीस होते. त्यांनी चाचपणी करून स्कोर्झेनीकडे एखादेही शस्त्र नाही, याची खात्री करून घेतली. त्या तपासणीत गर्भित असलेल्या अविश्वासामुळे स्कोर्झेनी अत्यंत संतापला. पण करतो काय बिचारा ! अखेर दरवाजा उघडला. स्कोर्झेनीने एक दीर्घ श्वास घेतला आणि आत प्रवेश केला. आतील दालन प्रशस्त होते. सभोवतालच्या भिंतीवर नकाशे लावलेले होते. एका पुराण्या भक्कम लाकडी टेबलाशी अॅडॉल्फ हिटलर बसला होता. 'फ्रान्सचा सम्राट नेपोलियन बोनापार्ट याने वापरलेले' अशी नोंद टेबलाच्या उजव्या बाजूच्या कोपऱ्यात केलेली होती.

हिटलरचा चेहरा अस्थिर होता. त्याच्याच सेनापतींनी केलेल्या त्याच्या हत्तेच्या

प्रयत्नातून तो नुकताच बचावला होता. त्यावेळी झालेल्या स्फोटाने हिटलरच्या देहाला चांगलाच हादरा बसला होता. हिटलरने आपला हात पुढे केला आणि फिकट हास्य केले. स्कोर्झेनीने सलाम ठोकला, आणि हिटलरचा थरथरता हात आपल्या हातात घेतला. हिटलर आणि स्कोर्झेनी यांना परस्परांबद्दल वाटणारा आदर त्यांच्या हालचाली आणि बोलण्याच्या पद्धती यातून सहजच स्पष्ट होत होता. अचाट बुद्धिमत्तेशिवाय मुसोलिनीची सुटका सर्वथैव अशक्य होती, अशी हिटलरची धारणा होती. जर्मनांची श्रेष्ठता आणि जन्मजात गुणवत्ता यांचे द्योतकच ते कृत्य आहे, असे म्हणून, उदासीन सेनाधिकाऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न हिटलर करत असे.

एकट्या हिटलरला एकट्याने भेटण्याचा स्कोर्झेनीच्या कारकीर्दीतील हा पहिलाच प्रसंग होता.काही काळ त्याला तो सारा आभासच वाटला होता.

युद्धामध्ये जर्मनीची पीछेहाट होत होती. पराभवाची छाया खुद्द हिटलरवर पडली होती. खुद्द त्याच्या गुहेवर लाल सैन्याच्या तोफांचा मारा लवकरच सुरू होईल अशी चिन्हे दिसत होती. त्यामुळे गुहेतील वस्तूंची हालवाहालव सुरू झाली होती. हिटलरच्या शब्दांतील निराशा आणि वैफल्य स्कोर्झेनीला सहज जाणवले.

"आम्ही जवळ जवळ दीड तास बरोबर होतो; पण मी पन्नास शब्दांपेक्षा जास्त काहीं बोललो नसेन" स्कोर्झेनीने या भेटीचा वृत्तांत आपल्या मित्राला देताना म्हटले होते, "हिटलरचा तोल सुटला आहे असे मला वाटले. काही वेळ तो सावकाश बोलयचा, प्रत्येक शब्द मोजून कष्टपूर्वक उच्चारायचा; तर अकस्मात अनावर आवेगाने तो किंचाळू लागायचा, काही वेळा तर तो काय बोलतो आहे ते समजतदेखील नव्हते; परंतु मी ते स्पष्ट करून घेतले नाही."

"बोलता बोलता एकदा हिटलरचे डोळे एखाद्या रानटी माणसासारखे चमकले, 'जगाला वाटतंय जर्मनीचा निकाल लागलाय्. आता फक्त अंत्यविधीच काय तो बाकी राहिला आहे.' त्याने मुठी आवळल्या आणि तो पुढे म्हणाला 'पण ही मेलेली जर्मनी उभी राहील आणि पश्चिमेवर त्वेषाने तुटून पडेल. मग पाहू काय होते ते'. त्याने स्कोर्झेनीचा हात हातात घेतला आणि युरोपियन आघाडीचे स्वरूप दाखविणाऱ्या नकाशाजवळ त्याला नेले. उभय पक्षांच्या फौजांच्या हालचाली दाखविण्यासाठी नकाशावर खडूच्या खुणा केलेल्या होत्या. काळ्या खुणा होत्या जर्मनीसाठी; लाल खुणा होत्या दोस्तांसाठी त्या खुणांवरून, गेल्या चार वर्षांत जर्मनीची किती आणि कशी पीछेहाट झाली होती ते स्पष्ट कळून येत होते. युद्धाच्या सुरवातीलाच पादाक्रान्त केलेला फ्रान्स जर्मनीने गमाविला होता. तसेच नेदरलँड्स्-देखील. डंकर्कला समुद्रात ढकललेल्या चिवट ब्रिटिशांनी अमेरिकनां-समवेत पुन्हा युरोपच्या भूमीवर प्रवेश केला होता. आता तर त्या सेना जर्मनीवर मर्माघातच करत होत्या.

वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांच्या विरोधाला न जुमनता हिटलरने नव्या प्रतिकार-योजनेची तयारी केली होती. या योजनेप्रमाणे एका आवेगी आक्रमणासरशी सारे गमावलेले प्रदेश जर्मनीला परत मिळविता येतील अशी अशा त्याला होती. नकाशाकडे हात फेकून हिटलर गरजला 'युद्धाच्या सुरवातीला जर्मनीने केलेल्या विद्युतवेगी आक्रमणासारखीच चढाई असेल ही. आर्देनेज मधून केलेल्या या आघाताने दोस्तांचे सैन्य विभागले जाईल.'

हिटलरचे डोळे स्कोर्झेनीवर खिळले होते. नंतर स्कोर्झेनी ज्या क्षणाची वाट पाहात होता तो आला.

भावनेने भारावलेल्या शब्दांत हिटलर म्हणाला 'पण स्कोर्झेनी, या योजनेचं सारं यश वा अपयश तुझ्यावर अवलंबून आहे. किंबहुना आपल्या पितृभूमीचे भवितव्यच तुझ्या हाती आहे म्हण ना.'

या विलक्षण शब्दांचा संपूर्ण अर्थ कळताच स्कोर्झेनीची अवस्था मंत्रविद्धासारखी झाली. पुढे झुकून तो हिटलरचे बोलणे ऐकू लागला. 'केवळ चढाई फारशी प्रभावी ठरणार नाही. संपूर्ण यशासाठी आणखी एका गोष्टीची जरुरी आहे. स्कोर्झेनी! शत्रूला धक्का द्यायला हवा आपण. असा धक्का की ज्यामुळं शत्रूचा तोल ढळेल, आणि आपल्या चढाईवरून त्याचे लक्ष दुसरीकडे जाईल. आयसेनहॉवरलाच ठार मारलं तर असा धक्का देता येईल आपल्याला!'

पुढे होऊन हिटलरने स्कोर्झेनीचा खांदा पकडला. आणि तो विश्वासाने म्हणाला 'ही गोष्ट फक्त तूच करू शकशील स्कोर्झेनी, जर्मनीचं भवितव्य म्हणूनच तुझ्यावर अवलंबून आहे.'

## योजनेतील अडचणी

हिटलरने स्कोर्झेनीला एक नवी तुकडी बनविण्याचा आदेश दिला. पुढे तो म्हणाला 'या तुकडीतली तुझी माणसं शत्रूची वाहनं वापरतील; शत्रूचेच गणवेष घालतील. पाऊल मागं घेणाऱ्या दोस्तांच्या सैन्यात ती मिसळून जातील. मग म्यूसे नदीवरील पूल ती काबीज करतील. अशा रीतीने चढाईचा आपला मार्ग निर्वेध होईल. त्यानंतर स्वयंसेवकांचे लहान खास गट व्हर्सायकडे वळतील आणि आयसेन-हॉवरचा काटा काढतील.'

स्कोर्झेनीने आपल्या आत्मचरित्रात हिटलरच्या या शब्दांच्या परिणामाबद्दल पुढील भाष्य केले आहे. तो म्हणतो "हिटलरच्या या झगमगीत शब्दांनी माझा अभिमान उफाळून वर आला. पावलं जुळवून मी सलाम ठोकला. आणि 'हे काम मी करीन' असं आश्वासन त्याला दिलं. त्यानंतर मी दालनातून बाहेर पडणार एवढ्यात हिटलरच्या पुढील सूचनेमुळं माझ्या उत्साहावर पाणी पडलं. या मोहिमेत मी स्वतः कोणताही धोका पत्करू नये. असा आग्रह त्याने धरला. 'तूला गमावणं जर्मनीला परवडण्यासारखं नाही.' अशा शब्दात त्याने मला गळ घातली."

स्कोर्झेनी सीधासाधा सैनिक होता. आपल्या स्वयंसेवकांनी शत्रूचे गणवेष चढवून

शत्रूसैन्यात घुसण्याची कल्पना स्कोर्झनीला बिलकुल पसंत नव्हती. यासंबंधी तो आपल्या मित्राजवळ म्हणाला " धंदेवाईक हेर नाही आम्ही. आम्ही साधे सैनिक आहोत; त्याचा रास्त अभिमान आहे आम्हांला; पितृभूमीसाठी आनंदाने प्राण वेचायची तयारी आहे आमची. हेरगिरीत वाट्याला येणारा अपमान आणि धोका आम्हाला पत्करायला लावायला नको होता. "

आपल्यावर सोपविलेली योजना किती जटिल आहे, तिच्या कार्यवाहीत किती मोठ्या अडचणी आहेत, हे स्कोर्झनीच्या लक्षात थोड्याच दिवसांत आले. हिटलरच्या अंतर्वर्तुळाबाहेर फक्त दोन वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांना या योजनेची माहिती होती, ही गोष्टच मोठी गैरसोईची होती. कारण आपल्या तुकडीला शिक्षण देण्यासाठी आणि सामग्री सिद्ध करण्यासाठी वरिष्ठांच्या संपूर्ण सहकार्याची स्कोर्झ-नीला गरज होती; आणि हिटलरच्या या गुप्त योजनेची पुसटशीदेखील वाच्यता करणे त्याच्या अधिकारकक्षेबाहेर होते. त्यातच ज्या अधिकाऱ्यावर तो सर्वाधिक अवलंबून होता त्या अधिकाऱ्याचा या साऱ्याच योजनेला विरोध होता. त्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली होती. फिल्ड मार्शल गर्ड फॉन रुडन्स्टेंड हा तो अधिकारी होय. निवृत्त रुडन्स्टेंडला हिटलरने आर्देनेज–चढाईचे नेतृत्व करण्यासाठी परत बोलाविले होते. स्वत: रुडन्स्टेंड मात्र हिटलरचा तिरस्कार करत असे. ही आयसेनहॉवरच्या हत्येची योजना विक्षिप्त आणि मूर्खपणाची आहे, असे त्याचे स्पष्ट मत होते. लष्करी पेशाच्या सैनिकाला कमीपणा आणणारी योजना आहे ती, असेच तो मानत होता.

हिटलरने स्वतंत्रपणे स्कोर्झनीला या योजनेबद्दल मार्गदर्शन केले. यामुळे हिटलर आणि फॉन रुडन्स्टेड यांच्यातील दुरावा अधिकच वाढला होता. फॉन रुडस्टेंड किती दुखावला आहे याची कल्पना स्कोर्झनीला लौकरच आली. स्कोर्झनीने रुडस्टेंड-ला भेटण्याची इच्छा व्यक्त केली; परंतु रुडस्टेंडने भेटीला सपशेल नकार दिला.

## स्कोर्झनीला धक्का बसला

उद्विग्न होऊन, मदतीसाठी, स्कोर्झनीने फिल्ड मार्शल कायटेलची मन धरणी केली. परिणामी दुसऱ्या महायुद्धातील एक विलक्षण चूक जर्मनीकडून घडली. या चुकीमुळेच आयसेनहॉवरचे प्राण वाचले, अशी दोस्तांच्या कित्येक नेत्यांची आजही समजूत आहे. कायटेलने सेनेच्या तुकड्यांच्या प्रमुखांना उद्देशून पुढील फतवा काढला. ' अत्यंत गुप्त : एका विशेष महत्त्वाच्या मोहिमेसाठी ज्यांना चांगले इंग्रजी बोलता येते अशा अधिकाऱ्यांची व सैनिकांची गरज आहे. निवडलेल्या स्वयं-सेवकांची एक नवी तुकडी बनविली जाईल. या तुकडीचे नेतृत्व लेफ्टनंट कर्नल ऑटो स्कोर्झनी करील. यासंबंधीचे अर्ज स्कोर्झनीच्या फ्रायडेन्थल येथील प्रधान कार्यालयाकडे करावेत. '

फतव्याखाली कायटेलची सही होती.

लेखांक दोन : पुढील अंकी

शरद गोखले

रंगभूमी

# एका घरात होती

नाट्य व्यवसायातील मंडळी सध्या धंद्यामध्ये मंदी असल्याची ओरड करत असली तरी नवीन नाटकांची आवक फारशी रोडावलेली नाही. त्यातही नाव असलेल्या नाटककारांच्या कलाकृती झपाट्याने उचलल्या जात आहेत. सुरेश खरे हे थोडेफार मार्केट असलेले नाटककार–त्यांची व्यवसायिक रंगभूमीवर न आलेली नाटके उचलली जात आहेत. मोहन तोंडवळकर यांच्या कला वैभवने सुरेश खरे यांचे असेच एक जुने नाटक नाव बदलून रंगभूमीवर आणले आहे. बदललेले नाव आहे ' एका घरात होती '.

नाटकाचा विषय गंभीर प्रवृत्तीचा, कौटुंबिक जिव्हाळ्याचा आणि वास्तवतेची पातळी घट्ट पकडून ठेवणारा आहे. त्यात प्रमुख भूमिका विजया मेहता करत असल्याने प्रयोगाचे यश उंचावले आहे. एका घरात दादा, त्याची पत्नी, एक छोटी मुलगी आणि दादाचे दोन भाऊ मोठ्या सुखासमाधानात राहात असतात. घर सांभाळायला वहिनी समर्थ असते. अचानक आपत्ती कोसळते. दादा अपघातात जबर जखमी होतो, दोन्ही पाय जाऊन कायमचे पंगुत्व पदरी येते. घर सांभाळणारी वहिनी घर राखण्यासाठी नोकरी करू लागते. नाटकाचा कथाभाग येथूनच सुरू होतो. पत्नीवर अपार प्रेम असलेला दादा प्रिय पत्नीला सतत पडणाऱ्या कष्टामुळे काहीसा नाराज आहे. अपार कष्ट उपसून वहिनीने अशोकचे शिक्षण पूर्ण केले आहे. त्याहून धाकटा बाळ शिकत नसला तरी स्वत:ची कुवत ओळखून आहे. वहिनीने घरासाठी घेतलेल्या कष्टांची सर्वांना जाण आहे. अशा या घरात ललिता येते–अशोकची प्रेयसी होऊन–वहिनीला ती पाहते आणि तिला धक्का बसतो. कारण वहिनीचा बॉस व ललिताचे वडील स्नेही असतात. आणि वहिनी व तिचा बॉस यांचे संबंध वावगे असल्याच्या वावड्या तिच्यापर्यंत पोचलेल्या असतात. अशा काहीशा संशय निर्माण करणाऱ्या वातावरणात पहिला अंक संपतो.

संशयाचे हे पिशाच्च पुढे नाट्यपूर्ण रीतीने फुलवले आहे. संशयाचे हे भूत अखेरीस दादाच्या डोक्यावर स्वार होते आणि शोकांतिकेला सुरुवात होऊन परिणिती दादाच्या आत्महत्येमध्ये होते.

नाट्यपूर्ण प्रसंग निर्माण करून त्यांची वास्तव पातळीवर हाताळणी करण्यात खरे यशस्वी झाले आहेत. नाटकाची बांधणी नीटस, निश्चित दिशा असलेली आणि अपेक्षित परिणाम साधणारी आहे. बाळ या पात्राचा ' रिलीफ 'साठी उपयोग

केला असला, तरी कोठेही ओढून ताणून तडजोड केलेली नाही.

प्रयोगाच्या यशामध्ये फार मोठा वाटा विजयाबाईंचा आहे. वहिनीची अवघड भूमिका त्यांनी समर्थपणे पेलली आहे. संवादफेकीचे त्यांचे कौशल्य वादातित आहे. हुकमी गणिती पद्धतीने त्या भूमिका जिवंत करतात. आणि प्रेक्षकांवरील त्यांचा परिणाम गणिती पद्धतीने मिळणाऱ्या निर्णयाइतकाच अचूक असतो. मराठी रंगभूमीला अभिमान वाटावा, अशा ताकदीच्या विजयाबाई व्यवसायिक रंगभूमीवर उतरल्या आहेत. त्याचा जातीत जास्त लाभ उठवला जावा अशी अपेक्षा आहे.

श्रीकांत मोघे यांचा दादाही दीर्घकाळ लक्षात राहील इतका प्रभावी आहे. बाळची भूमिका करणारे वेलणकर काम ठीक करत असले तरी त्यांच्याकडून अजून अपेक्षेस जागा आहे. दिलीप कुलकर्णी (अशोक) व कुंदा निगुडकर (ललिता) ही दोन्ही पात्रे सामान्य वकुबाची असल्याने, अन्य समर्थ कलाकारांबरोबर फारच कमी पडतात. छोटया मिनीच्या भूमिकेत पप्पु रावते समाधान देऊन जाते. दिग्दर्शक नंदकुमार रावते यांनी प्रयोग व्यवस्थित बसवला आहे. निर्मितीच्या अन्य बाजू समाधानकारक आहेत.

अगदीच सपक व मिळमिळीत नावाची बाब सोडली तर हे नाटक निश्चितपणे समाधान देऊन जाते. ◻

# शांतता....

## प्रभावी नाटकावरील कलात्मक बोलपट

अनेक कारणांमुळे विजय तेंडूलकर यांचे शांतता विलक्षण गाजले. नाटक गाजले, कितीही गाजले, त्यावर उलटी सुलटी चर्चा झाली तरी नाटकावर कोणी चित्रपट काढण्यास धजावेल, अशी पुसटती शंकाही कधी आली नाही. परंतु रंगभूमीवर धाडशी प्रयोग करणारे सत्यदेव दुबे यांनी शांततेवर चित्रपट काढण्याचे ठरवल्यापासून, चित्रपटासंबंधी उत्सुकता लागून राहिली होती.

शांतता पाहिल्यावर अन्यत्र अभावाने आढळणाऱ्या दोन गोष्टी मनावर ठसून गेल्या. चित्रपटामध्ये कोणत्याही स्वरूपाची तडजोड स्वीकारलेली नाही आणि छायाचित्रण आणि ध्वनिलेखन या दोन्ही बाजू उत्तम जमून आल्या आहेत. कथा विषयाचे नाविन्य आणि बहुतेक कलाकारांची समाधानकारक कामगिरी, ही अन्य दोन वैशिष्टये लक्षात राहण्यासारखी आहेत. स्वाभाविकपणे प्रभावी नाटकावरून घेतलेल्या या चित्रपटाचा कलात्मक तोल सांभाळला गेला आहे. मात्र असे असले तरी कलात्मक पातळीवरील उत्कृष्ट बोलपट असा या चित्रपटाचा गौरव करता येणार नाही. कारण चित्रपटाच्या दृष्टीने विषयाचा आवाका लहान. त्यातही विषयाची उकल नाटकामध्ये जशी बांधेसूद टप्प्याने उत्कटतेच्या परमोच्च बिंदुकडे जाते, आणि त्यामुळे प्रेक्षक बधीर होऊन बांधला जातो, अनुभवाचा तसा प्रत्यय

येथे येत नाही. हे सत्यदेव दुबे यांना आलेले अपयश आहे.

अभिरूप न्यायसभेचा कार्यक्रम करण्यासाठी निघालेल्या मंडळींमध्ये लिला बेणारे, रोकडे वकील, एक कलाकार, एक शास्त्रज्ञ, न्यायाधीश कुशाभाऊ आणि अन्य मंडळीं असतात. या मंडळींबरोबर नेहमी असणारे प्रा. दामले आज येऊ शकत नाहीत. बाकी मंडळी ठरल्याप्रमाणे कार्यक्रमाच्या गावी जातात. प्रा. दामले यांच्या जागी आयत्यावेळी एका स्थानिक माणसाला उभे करण्याचे ठरते. तो बिचारा भेदरून जातो, मुख्य कार्यक्रमाला बराच उशीर असल्याने या माणसाला खटल्याचे कामकाज समजावे, म्हणून एक जुजबी खटला चालवून दाखवण्याची कल्पना पुढे येते आणि हळूहळू दुसऱ्याच्या वर्मावर बोट ठेऊन, त्याला यातना होऊन विव्हळताना पाहिल्यावर त्यातून मिळणाऱ्या आसूरी आनंदाला वाव देणारे एक भीषण नाटय आकार घेऊ लागते. लिलाबाईंचे खाजगी आयुष्य क्लबच्या या सर्व सभासदांना चांगले माहित असते. खटल्याच्या निमित्ताने बाईची शिकार करण्यास मंडळी उत्सुक होतात. अगदी सहज गंमत म्हणून सर्व काही होते आहे अशा थाटात–लिला बेणारेवर भृणहत्येचा आरोप ठेवण्यात येतो. बाई संतापते, बाहेर जाण्याचाही प्रयत्न करते. आणि मार्ग बन्द झाल्यावर पिंजऱ्यात उभी राहते. खटल्याचा उद्देश बाजूला फेकला जातो. हलके फुलके वातावरण विटत जाते आणि बाईच्या खाजगी आयुष्यतील–एक एक पदर छेडला जातो. न्यायधिशाच्या खुर्चिवर बसलेल्या कुशाभाऊसकट सर्वजण आपआपला वाटा उचलतात आणि पद्धतशीरपणे बाईची शिकार साधली जाते.

नाटकामध्ये प्रभावी ठरणारी ही मांडणी चित्रपटामध्ये तितकी पकड घेत नाही. लिला बेणारेच्या आयुष्यातील संबधीत घटनांची धावती नोंद घेणारी फ्लॅश बॅक पद्धतीची दृष्ये मात्र फार सुरेख जमून आली आहेत. लोकलमधून मंडळी निघाल्यापासून ते न्यायगृहामध्ये येण्यापर्यन्तचा भाग चित्रीकरणाचे दृष्टीने छान आहे. बेणारेला हळूवारपणे बाजूला काढण्यातही दूबे यशस्वी झाले आहेत. चित्रपटाला जो एक Sharpness ' अपेक्षीत होता, तो मात्र खचीतच आलेला नाही. छायाचित्रण पद्धती, प्रकाशयोजना, या बाबी ' सिनेमाशी ' जवळीक करणाऱ्या तर काम करणारे कलावंत ' स्टेजशी ' नाते सांगणारे–यामुळे सतत जाणवणारी एक विचित्र विसंगती निर्माण झाली आहे.

## कलावंत

सुलभा देशपांडे यांची लिला बेणारे, चांगली असली, तरी चित्रपट माध्यमातून बेणारे जितकी प्रभावी ठरावयास पाहिजे होती तितकी प्रभावी ठरत नाही. अन्य कलाकारांमध्ये वकीलाचे काम करणारे अरविन्द देशपांडे विशेष प्रभावी वाटतात. संपूर्ण टीममध्ये सिनेमा ज्यांना मानवण्याची शक्यता आहे असे जवळजवळ देशपांडे हे एक मात्र कलावंत वाटतात. अमोल पालेकर, नारायण पै ठीक आहेत. परंतु चित्रपटामध्ये सर्वात लक्षणिय कामगिरी छायालेखक गोविन्द निहाळती यांनी

बजावली आहे. त्यांचे छायालेखन, विषयाचे गांभिर्य फुलवणारे. आहे. अचूक प्रकाश योजनेमुळे त्यांनी अनेक प्रसंग विलक्षण प्रभावीपणे चित्रीत केले आहेत.

सत्यदेव दुबे यांनी दिग्दर्शक या नात्याने बजावलेली कामगिरीही कौतुकास्पद आहे. हाती घेतलेला अवघड विषय त्यांनी जास्तीत जास्त प्रभावीपणे रुपेरी पडद्यावर आणला आहे. चित्रपटाचा विषय आणि त्याची मांडणी पाहता, सर्व साधारण प्रेक्षकांसाठीच चित्र केले असल्याचा श्री. दुबे यांचा दावा मान्य करता येण्यासारखा नाही. शांततेला, जो प्रेक्षक अभिप्रेत आहे, त्यांनी नाटक पाहिले आहे, कदाचित् चित्रपटही ही सर्व मंडळी पाहतील, पण राहून राहून एक शंका मनात येतेच, की हा विषय या पद्धतीने घ्यायचाच होता, तर त्यांनी मराठीपेक्षा हिन्दीतून चित्र तयार केले असते तर उपकारक ठरले असते, मराठीच्या व्यवसाय मर्यादा आणि चित्रपटाचे स्वरूप पाहता कलात्मक तोल संभाळणारी ही शांतता व्यावसाईक तोल मात्र सांभाळू शकणार नाही. ◻

## बालकलाकार अंजली गोखले : नृत्यांजली

शालेय अभ्यासक्रमाबरोबर अन्य क्षेत्रामध्ये मुलांची प्रगती व्हावी म्हणून त्यांचा कल पाहून त्यांना त्यांचे विशेष शिक्षण देण्याची वृत्ती वाढत आहे. 'आफ्रीका ड्रग हाऊस' या औषधाचे दुकानाचे मालक प्रभाकरपंत व सौ. विजया गोखले यांची अंजली ही मुलगी. वयाच्या सहाव्या वर्षापासून छोटी अंजली नृत्याचे शिक्षण घेत आहे. गुरुपुजेच्या कार्यक्रमानिमित्त अंजलीने नृत्यांजली हा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाच्या पुर्वार्धामध्ये शास्त्रीय नृत्ये व उत्तरार्धामध्ये मारवाडी घुमर, शिवपार्वती, वंजारी, यासारखी हलकी–फुलकी नृत्ये अशी विभागणी करण्यात आली होती.

अंजलीने लहान वयातच मोठी कौतुकास्पद तयारी केली आहे. केवळ अकरा वर्षांच्या मुलीने सलग दोन अडीच तासाचा कार्यक्रम देणे हीच मुळी कौतुकाची बाब. त्यात कार्यक्रमाला सुत्रबद्धता, सुंदर लय असेल तर उत्तमच. अंजलीच्या कार्यक्रमामध्ये या सर्वांचा सुरेख-मेळ जमून आल्याने कार्यक्रम विलक्षण रंगला. शरीराचा लवचिकपणा, तालाची समज आणि रेखीव हालचाली, यामुळे शास्त्रोक्त नृत्याचा कार्यक्रम रंगला, तर अनोखे भावदर्शन हे वंजारी व मारवाडी घुमर नृत्याचे वैशिष्ट्य होते.

एक आगळा वेगळा कार्यक्रम म्हणून अंजलीचे नृत्य लक्षात राहील. अंजलीच्या शिक्षणाच्या केवळ पहिल्या टप्याचे दर्शन अंजलीच्या या नृत्यांजली कार्यक्रमामध्ये पाहावयास मिळाले. सध्या केवळ सहाव्या इयत्तेत शिकणाऱ्या अंजलीच्या शालेय–महाविद्यालयीन शिक्षणाच्या टप्प्यांबरोबरच नृत्य–शिक्षणही गतीमान राहिले तर आपल्याकडे काहीशा दुर्लक्षलेल्या या कला-क्षेत्रामध्ये एका चांगल्या ताकदीच्या कलावंताचा उदय होईल. ◻ ◻ ◻

नजरेसमोरून जाऊ लागते. हिच्यातले पॅसेंजर्स आपल्याकडे तुच्छतेने बघत नसतात. उलट त्यांच्या डोळ्यात आश्चर्य असते, कुतूहलमिश्रीत भीती असते. आपल्याविषयी थोडा आदरही वाटतो.

अशा गाड्या जात येत राहतात. मध्येच एक नुसतेच भोंडे एंजिन भन्नाट वेगाने येऊन पुटुक्कन पळून जाते. मागे त्याला त्या डब्यांची शेपटी नसते. त्यामुळे त्याचा वेग भलताच वाटतो. पण हसू येते. एखाद्या बुटक्या माणसाने तुरुतुरु पळावे तसे त्या एंजिनाचे कौतुक वाटते. उगाचच पळते आहे बेटे, शाळेला जाणाऱ्या छोट्या मुलीसारखे. खरं म्हणजे त्याला एवढी घाई करण्याची गरज नाही, असे वाटते.

तेवढ्यात एक डुगडुगत मालगाडी येते. नीरस, रटाळ, लांबच लांब बंद डबे. गडांग–गडांग करीत ती एखाद्या गर्भवती प्रौढेसारखी निघून जाते. लांबच लांब आणि कंटाळवाणी आपण एक जांभई देतो.

आणि मग महाराजा आतापर्यंत मोठ्या दिमाखाने ज्या फास्ट ट्रॅकवरून आपल्याला अंगठे दाखवीत गाड्या उन्मादाने शिट्या फुंकीत निघून गेल्या त्याच रुळावर अशीच एक सुपरफास्ट गाडी येते. त्या गाडीला या स्टेशनाचा स्पर्श नको असतो. जसा सतत मऊ गाद्यांच्या कारमधून हिंडणाऱ्या गर्भरेशमी सुंदरींना रस्त्या-वरच्या भिकाऱ्यांचा नको असतो तसा त्या गाडीचा उद्देश असतो या स्टेशनाच्या बाजूने झळाळत निघून जाण्याचा. त्यासाठी तो मोटरमन पोंग्यावर पोंगे वाजवीत असतो. सागरयुद्ध जिंकल्यावर युद्धनौकांचे ताफे कसे उन्माद चढल्यासारखे भोंगे वाजवतात ना तसे. (म्हणजे सिनेमात पाहिल्याप्रमाणे.) गाडीतली मंडळी आपल्याला खिजविण्यासाठी अंगठे सरसावून ठेवतात. काहींची बोटे शिट्यांसाठी तोंडाकडे जातातही.

पण काय होते कुणास ठाऊक. स्टेशनजवळ येण्यापूर्वीच पोटात खड्डा पडल्या-सारखी गाडी खडाक् असा गचका खाते. करार...कर्र्रार–कराक–क्रीऽऽऽक असा ब्रेकचा कर्कश आवाज होतो. वेग कमी होतो. मोटरमन पोंगे वाजवीत असतो. पण आता हे पोंगे म्हणजे विजयी चित्कार वाटत नाहीत. तो एक आक्रस्ताळी आरडाओरडा वाटतो. लहान, हट्टी मुलाने चॉकलेट न दिल्यावर केल्यासारखा, किंवा कुत्र्याच्या पेकाटात लाथ हाणल्यावर ते केकाटते तसा, किंवा बुडणाऱ्या जहाजाने मदतीसाठी भोकाड पसरावे तसा केविलवाणा.

अजून गाडी थांबलेली नसते. उतारूंना अद्याप आशा असते की घेईल, गाडी वेग घेईल. पण गाडी कसली वेग घेते आहे. ती आपली रडत खडत झटके खाते आहे. शेवटी अगदीच नाईलाज होतो तेव्हा ती एक जोरदार गचका खाऊन थांबते.

तिच्या चेहऱ्यावर भयंकर अपमान झाल्यासारखा भाव असतो. आतले प्रवासी अद्याप खट्टू झाल्याचे दाखवायला तयार नसतात. चेहऱ्यावर अजून खोटे हसू असते. काही जण उगाचच शिट्या मारून प्लॅटफॉर्मवरच्या लोकांना खोटे खोटे चिडवून घेतात. पण आपण चिडत नाही. उलट हसण्याची पाळी आता आपली असते. आणखी थोडा वेळ गेला की, गाडीतल्या लोकांचे पडेल चेहरे आणि त्यांची चुळबूळ लपू शकत नाही. नक्षा पार उतरलेला.

आणि मग संगीताच्या ताफ्याच्या उंच एकवटलेल्या सुरांच्या तालावर एखाद्या महाराणीने डौलाने पावले टाकीत यावे तशा थाटात आपल्या स्लो ट्रॅकवरची गाडी येते. काय तिचा थाट. आणि मग त्या फास्ट गाडीतल्या लोकांचा जळफळाट विचारू नका. ज्यांना दूर जायचे असते ते बिचारे नुसतेच दातओठ खात राहतात. काही मानापमानाची पर्वा न करता त्या गाडीतून खुशाल उड्या टाकतात, धडपडत फास्ट ट्रॅक ओलांडतात. हातापायावर जोर मारून, कपडे खराब करून घेऊन प्लॅट-फॉर्म चढतात आणि मान खाली घालून मुकाटपणे आपल्या स्लो गाडीत जागा धरतात. काय फजिती होते म्हणता ?

मग आपली स्लो गाडी धीमेपणाने एकच पोंगा मारते. त्या उतावळ्या फास्ट गाडीसारखी बोंबाबोंब नाही. एकच संयमी, गंभीर, इशारादर्शक, आत्मविश्वासपूर्ण शिटी –भूऽऽम्ऽऽ– वस्म्. आणि मग राजहंसाच्या डौलाने पुढे निघते. अहाहा – मारडाला ! त्या फास्ट गाडीसारखा क्षुद्र थयथयाट नाही. धीरगंभीर आत्म-विश्वास ! बास, जीव ओवाळून टाकावा.

आता मात्र त्या बिचाऱ्या सुपर-फास्ट गाडीची कीव येऊ लागते. तिच्यातल्या लोकांचे चेहरे रडवेले होऊ लागतात. इकडे आपल्या अशा एक-दोन स्लो गाड्या




मजेत येऊन गेल्या की मग तर विचारायलाच नको. अखेर पोंगे वाजवून मोटरमन थकल्यावर गाडीला सिग्नल मिळतो. ती एक धक्का मारल्यासारखा गचका खाते आणि कुरकुरत सरकू लागते. प्रवासी हुश्श करतात. पण गाडी ढेपाळलेलीच असते. ती तशीच डुगडुगत निघते. अधून-मधून गचके खातेच. आणि गर्वहरण झालेल्या पुरंध्रीसारखी मुकाटपणे निघून जाते.

असा मजा येतो म्हणता. गंमत बघायला चिंचपोकळीसारखेंच स्टेशन निवडायला हवे. गरीबसे, एकच प्लॅटफॉर्म असलेले.

आता स्टेशनवर एवढा ड्रामा चालू असताना बऱ्याचशा लोकांचे तिकडे लक्ष नसते. बोअर होतात म्हणून आपण आपले कोणाला सांगायचे नाही झाले. आपली गंमत आपल्यासाठी.

दुसरे आपले आवडीचे ठिकाण आहे बोरीबंदरचे लोकल स्टेशन. किंवा चर्चगेट. वेळ संध्याकाळी साडेपाच ते साडेसात. सकाळीही साडेआठ ते साडेदहा चालते. पण संध्याकाळची वेळ अधिक बरी. इथे बोरीबंदरच्या बरोबर मधल्या इंडिकेटरच्या समोरच्या घड्याळाखाली उभे रहावे. पण त्या आधी जरा आजूबाजूला शांतपणे भटकून यावे. सारेजण झपाझप पावले टाकीत बोरीबदरकडे येत असतात. आणि आपणच वाट चुकल्यासारखे शांतपणे भटकत असतो. एखाद्या यात्रेला रीघ लागावी तसा प्रकार असतो. फोर्टात यावेळी दोनच प्रवाह असतात. एक असतो बोरीबंदरच्या दिशेनी आणि दुसरा चर्चगेटच्या. एखाद्या उंच इमारतीवरून यावेळी फोर्टातल्या रस्त्याकडे बघितले की आपण थक्क होऊन जातो. दूरवरून पावलांच्या किंवा बोलण्याचा कसलाच आवाज येत नाही. फक्त शांत यंत्रमय स्त्री-पुरुषांनी एकाच दिशेने दुथडी भरून वाहणारे फूटपाथ ! यावेळी या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जावे म्हणजे नदीच्या दिशेच्या उलटी होडी वल्हवीत जाण्यासारखेच त्रासदायक असते.

पुढचे दृश्य असते चर्चगेट किंवा बोरीबदर समोरच्या सिग्नलचे. पादचारी ओलांडण्याच्या पांढऱ्या पट्टीच्या बाजूला लाल दिवा लागला की क्षणार्धात तिथे मोहोळ तयार होते. क्षणाक्षणाला हे मोहोळ वाढून अगदी फुटू पाहते. आणि दिव्याचा रंग बदलला की फुटलेल्या धरणातील पाण्याप्रमाणे मार्गात येईल त्याचा फडशा पाडीत ही गर्दी स्टेशनाच्या दिशेने वाहते. यावेळी सिग्नलवर जो उलट्या दिशेने येईल तो संपला.

आणि बोरीबंदरच्या मधल्या इंडिकेटसमोरच्या घड्याळाखाली संध्याकाळी उभे राहणे हाही एक चक्रावून टाकणारा अनुभव आहे. यावेळची चर्चगेटवरची गर्दी आणि बोरीबंदरची गर्दी यांच्यात एक फरक असतो. चर्चगेटचे तीनच प्लॅटफॉर्मस आहेत आणि रेल्वेची दिशा एकच आहे. तसेच चर्चगेटला प्रवेशही मुख्यत: एकाच बाजूने आहे. त्यामुळे येणारे लोंढे एकाच दिशेने येऊन तिन्ही प्लॅटफॉर्मवर विखुरतात. बोरीबंदरचे तसे नाही. आठ प्लॅटफॉर्मस्, तीन दिशांना जाणाऱ्या लायनी

आणि चारी बाजूंनी प्रवेशातही गर्दी. त्यामुळे इथल्या गर्दीत एक भयानक गुंतागुंत माजलेली असते. उलटसुलट प्रवाह एकमेकांवर आदळत असतात. आणि मध्यवर्ती घड्याळाखाली जिथे आपण उभे आहोत तिथे एक भयंकर गरगरणारा भोवरा तयार झालेला असतो. थोडा वेळ तिथे उभे राहिले की डोळे फिरू लागतात. आणि नाकातोंडात पाणी जाऊन गुदमरल्यासारखं वाटू लागते. पण त्या भोवऱ्यातून बाहेर पडता येत नाही. तिथेच आपण गोल गोल फिरत राहतो. वाट सापडणेच कठीण.

चर्चगेटवर तसे नाही, तिथे एका ठिकाणी उभेच राहता येत नाही. प्रवेशद्वाराशी, स्वतःला सोडून द्यावे. म्हणजे बरोबर वाहत वाहत आपण एखाद्या प्लॅटफॉर्मवर पोचतो. आणि विरोध केला नाही तर एखाद्या गाडीतही अलगद चढविले जातो.

स्टेशनात भराभर गाड्या येत असतात आणि सुटत असतात. स्त्री-पुरुष येतात आणि गाड्यांमध्ये गडप होतात. एक लोंढा संपला की दुसरा येतो. दुसरा संपला की तिसरा असा प्रचंड व्यवहार चालू असतो. आणि मध्येच एक क्षणभर सारी पृथ्वी गोठल्यासारखी स्टेशनात एक महाप्रचंड मरणप्राय शांतता पसरते.

त्या प्रचंड गर्दीच्या कोलाहलात असा हा गोठलेला क्षण. अर्ध क्षण अचानक येऊन जातो. भीतीचे सनातन स्वरूप आपल्या लक्षावधी जीभा वळवळवीत आणि दाढा करकरवीत त्या क्षणभरात आपल्या अंगावर झपाट्याने चाल करून येते. आणि आपण भेदरतो. डोक्यावर कुणी प्रचंड दगड आपटल्यासारखे सुन्न होतो.

हे टिकत क्षण-अर्ध क्षण. पुन्हा प्रवाह जसाचा तसा चालू होतो. कदाचित तो अनादि क्षण आपल्या कल्पनेतलाही असेल. पण आपल्याला मात्र इकडे घाम फुटलेला असतो. गर्दी तशीच असते. अप्रतिहत ! आपल्यासारखे बरेचजण त्या भोवऱ्यात गरगरत सापडले असतात. कुणी उगाचच सिगरेट फुंकीत. तर कुणी कुणाची वाट पाहत. त्या गर्दीत खरे म्हणजे वाट पाहण्यासारखे काय आहे ? पण तरीही त्या रोमहर्षक गर्दीला स्पर्शही न करता अनेक अरसिक दुसऱ्या अरसिकांची वाट बघत असतात.

असो. तर अशी गर्दी आणि असे काल्पनिक क्षण. या काही प्रवाशांना दाखवायच्या वस्तू नसतात. या गोष्टी आपण आपल्या अनुभवायच्या आणि आपल्याच जवळ ठेवायच्या—

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर



# ' रुपया पुस्तक ' योजनेसंबंधी आणखी थोडे

' रुपया पुस्तक ' योजनेची मुदत १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर १९७१ पर्यंत आहे.

योजनेत सहभागी होणाऱ्यांनी पाच वर्षांची वर्गणी रुपये शंभर फक्त प्रथम जमा करावयाची आहे. म्हणजे ' माणूस ' अंक पाच वर्षांसाठी चालू राहील.

रक्कम मनीऑर्डरने किंवा ड्राफ्टने ' साप्ताहिक माणूस ' या नावावर पाठवावी. चेक असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवणे अवश्यक आहे. सोबतच्या पत्रात ' रुपया योजना ' असा स्पष्ट खुलासा असावा.

वर्गणी जमा झाल्यावर ' रुपया पुस्तक ' योजनेतील पहिल्या पाच पुस्तकांच्या गटाचे (पुरंदरे वाङ्मय) वाटप ताबडतोब होईल.

कार्यालयात शंभर रुपये रोख वर्गणी वरील मुदतीत भरणाऱ्यास या योजनेतील ' पुरंदरे ' गटाची पाच पुस्तके प्रत्येकी एक रुपया याप्रमाणे पांच रुपये किंमत वेगळी जमा केल्यावर जागच्याजागीच देण्यात येतील.

या पुस्तकांचा पाठवणी खर्च (टपाल व पॅकिंग इत्यादी) वर्गणीदारांनी भरावयाचा आहे. हा खर्च अधिक प्रत्येकी एक रुपया प्रमाणे होणारी पाच पुस्तकांची पाच रुपये ही किंमत मिळून एकूण रकमेची व्ही. पी. वर्गणीदारांकडे जानेवारी अखेर पाठवली जाईल. ही व्ही. पी. सोडवून घेण्याचे बंधन वर्गणीदारांवर आहे.

योजनेतील दुसऱ्या पाच पुस्तकांचा गट एक किंवा दोन हप्त्यात ऑक्टोबर १९७२ पूर्वी वर्गणीदारांच्या हाती पडेल. पुस्तके घेताना प्रत्येकी रुपया याप्रमाणे होणारी किंमत वर्गणीदारांनी भरावयाची किंवा सोसावयाची आहे. टपाल पॅकिंग इ. खर्च वर्गणीदारांकडे.

' सलामी योजना ' व ' रुपया योजना ' या दोन स्वतंत्र योजना असल्याने या दोन्ही योजनेतील पुस्तकांचे गट वेगवेगळे आहेत. गटातील पुस्तकांची अदलाबदल होऊ शकणार नाही.

' माणूस 'चे चालू वार्षिक वर्गणीदार पुढील पाच वर्षांसाठी शंभर रुपये वर्गणी भरून या ' रुपया पुस्तक ' योजनेत सहभागी होऊ शकतील.

साप्ताहिक माणूस, नागनाथपाराजवळ, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० / दूरध्वनी · ५७३५९

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH 649




" खरं म्हणजे पन्नास रुपयाच्या तिकिटाचा आताचा भाव दोनशे आहे. पण केवळ बांगला देश मदतीसाठी कार्यक्रम आहे म्हणून मी दीडशेला देतोय् तुम्हाला...."